# महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय

(संसद द्वारा पारित अधिनियम 1997, क्रमांक 3 के अंतर्गत स्थापित केंद्रीय विश्वविद्यालय)

Mahatma Gandhi Antarrashtriya Hindi Vishwavidyalaya

(A Central University Established by Parliament by Act No. 3 of 1997)


ज्ञान शांति मैत्री

## बी.एड. पाठ्यक्रम

**सत्र-2021-23**

## पाठ्यक्रम कोड : BEd - 012



## द्वितीय सेमेस्टर

## पंचम पाठ्यचर्या

## पाठ्यचर्या कोड : BEd- 025

## पाठ्यचर्या का शीर्षक : विद्यालय विषय शिक्षण II (मराठी शिक्षण)

---


## दूर शिक्षा निदेशालय

महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय

पोस्ट- हिंदी विश्वविद्यालय, गांधी हिल्स, वर्धा - 442001 (महाराष्ट्र)

## मार्गदर्शन समिति

प्रो. गिरीश्वर मिश्र
कुलपति
म.गां.अं.हिं.वि., वर्धा

प्रो. आनंद वर्धन शर्मा
प्रतिकुलपति
म.गां.अं.हिं.वि., वर्धा

प्रो. अरबिंद कुमार झा
निदेशक, दूर शिक्षा निदेशालय
म.गां.अं.हिं.वि., वर्धा

## पाठ्यचर्या निर्माण समिति

प्रो. अरबिंद कुमार झा
अधिष्ठाता, शिक्षा विद्यापीठ
म.गां.अं.हिं.वि., वर्धा

डॉ. गोपाल कृष्ण ठाकुर
सह प्रोफ़ेसर, शिक्षा विद्यापीठ
म.गां.अं.हिं.वि., वर्धा

श्री ऋषभ कुमार मिश्र
सहा प्रोफेसर, शिक्षा विद्यापीठ
म.गां.अं.हिं.वि., वर्धा

## संपादन मंडल

प्रो. अरबिंद कुमार झा
निदेशक, दूर शिक्षा निदेशालय
म.गां.अं.हिं.वि., वर्धा

डॉ. दीपक पुनसे
सह प्रोफ़ेसर
स्वालंबी शिक्षण महाविद्यालय,वर्धा

डॉ. रामार्चा पाण्डेय
सह प्रोफ़ेसर, शिक्षा विद्यापीठ
म.गां.अं.हिं.वि., वर्धा

डॉ. गुणवंत सोनोने
सहा प्रोफ़ेसर, शिक्षा विद्यापीठ
म.गां.अं.हिं.वि., वर्धा

श्री धर्मेंद्र शंभरकर
सहा प्रोफ़ेसर, शिक्षा विद्यापीठ
म.गां.अं.हिं.वि., वर्धा

## इकाई लेखन

समन्वयक -श्री धर्मेंद्र शंभरकर

इकाई -1
श्री धर्मेंद्र शंभरकर

इकाई -2
श्री धर्मेंद्र शंभरकर

इकाई -3
डॉ. गुणवंत सोनोने

इकाई-4
डॉ. गुणवंत सोनोने

इकाई- 5
डॉ. गुणवंत सोनोने

# मुख्य संपादकाच्या लेखणीतून.....

# संपादकाच्या लेखणीतून.....

# मराठी भाषा शिक्षण

**घटक 1 : मराठी भाषेची उत्पत्ती, जीवनातील व अभ्यासक्रमातील स्थान व महत्त्व**

भाषेचा अर्थ, स्वरूप व उत्पत्ती. भाषेची वैशिष्ट्ये, तत्त्व व प्रकार. मराठी भाषा शिक्षणाचे जीवनातील व अभ्यासक्रमातील स्थान व महत्त्व. मराठी भाषेचा इतर शालेय विषयांशी सहसंबंध (संस्कृत, हिंदी, इंग्रजी, इतर भाषा, सामाजिक शास्त्र, विज्ञान, गणित इ.)

**घटक 2 : भाषा कौशल्य**

भाषा कौशल्य (श्रवण, भाषण, वाचन, लेखन), भाषा कौशल्याच्या (श्रवण) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन, भाषा कौशल्याच्या (भाषण) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन, भाषा कौशल्याच्या (वाचन) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन, भाषा कौशल्याच्या (लेखन) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन.

**घटक 3 : अध्यापन पद्धती व तंत्र**

व्याख्यान, स्पष्टीकरण, कथाकथन, पर्यवेक्षित अभ्यास, संभाषण, भूमिका अभिनय, परिसंवाद, बुद्धिमंथन, आगमन- निगमन, भाषा प्रयोगशाला पद्धती. अध्यापन प्रक्रीयेत आधुनिक अध्यापन पद्धतीचा उपयोग.

**घटक 4 : अध्यापन अनुभवाचे नियोजन**

सूक्ष्म नियोजन, दैनंदिन पाठ नियोजन, घटक नियोजन, वार्षिक नियोजन. मूल्यांकन- मूल्यांकनाचे तंत्र, परीक्षा पद्धती -लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रश्न प्रकार, परीक्षा पद्धतीचे गुणदोष.

**घटक 5 : मराठीचा अभ्यासक्रम व पुस्तके**

माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील मराठी पाठ्यपुस्तकाचे परीक्षण. पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाचे महत्त्व व वैशिष्ट्ये. पाठ्यपुस्तकाची समीक्षा व तुलनात्मक विश्लेषण. अभ्यासपुरक कार्यक्रम. मराठीत प्रसार माध्यमाची भूमिका.

| क्र. | घटक | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | घटक 1 | मराठी भाषेची उत्पत्ती, जीवनातील व अभ्यासक्रमातील स्थान व महत्त्व | 7-23 |
| 2 | घटक 2 | भाषा कौशल्य (श्रवण, भाषण, वाचन, लेखन) | 24-51 |
| 3 | घटक 3 | अध्यापन पद्धती व तंत्र | 52-69 |
| 4 | घटक 4 | अध्यापन अनुभवाचे नियोजन | 70-88 |
| 5 | घटक 5 | मराठीचा अभ्यासक्रम व पुस्तके | 89-110 |

## घटक रचना

### घटक 1 : मराठी भाषेची उत्पत्ती, जीवनातील व अभ्यासक्रमातील स्थान व महत्त्व

**1.0 घटक परिचय**
**1.1 शिक्षणाचे उद्देश**
**1.2 विषय विश्लेषण**
**1.2.1 भाषेचा अर्थ, स्वरूप व उत्पत्ती**
**1.2.2 भाषेची वैशिष्ट्ये, तत्त्व व प्रकार**
**1.2.3 मराठी भाषा शिक्षणाचे जीवनातील स्थान व महत्त्व**
**1.2.4 मराठी भाषा शिक्षणाचे अभ्यासक्रमातील स्थान व महत्त्व**
**1.2.5 मराठी भाषेचा अन्य शालेय विषयाशी सहसंबंध-**
**(संस्कृत, हिंदी, इंग्रजी, इतर भाषा, सामाजिक शास्त्र, विज्ञान, गणित इ.)**
**1.3 सारांश**
**1.4 आपल्या प्रगतीच्या पडताळणी करिता अपेक्षित उत्तरे**
**1.5 कार्य वितरण**
**1.6 कार्य**
**1.7 प्रकरण अभ्यास (केस स्टडी)**
**1.8 संदर्भ पुस्तके**

### 1.0 घटक परिचय

भाषा ही अभिव्यक्तीचे एक महत्त्वाचे साधन आहे. "दोन माणसांना एकत्र आणणारा, विचारांचे संप्रेषण म्हणजेच देवाण–घेवाण करणारा दुवा म्हणजे भाषा होय." अर्थात एकमेकांची भाषा न समजणारी दोन माणसे एकत्रित आली तर त्यांचे व्यवहार ठप्प होतील असे नाही खाणाखुणांनी ते कदाचित आपल्याला काय हवे आहे ते सांगतिल पण जे हवे आहे त्यासाठी जर शब्द वापरले तर आशय समजणे सोपे जाते. म्हणूनच भाषा आणि मानवी जीवन एकमेकांमध्ये पूर्णपणे मिसळून गेलेले दिसते. म्हणून भाषा ही मानवी जीवनामध्ये अभिव्यक्तीचे महत्त्वाचे साधन ठरते आहे.

### 1.1 शिक्षणाचे उद्देश

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला पुढील कौशल्यात व क्षमतेत समर्थ होता येईल.

1. भाषेचा अर्थ उत्पत्ती व स्वरूप या विषयी माहिति अवगत करणे.
2. भाषेच्या वैशिष्ट्याचे ज्ञान अवगत करणे.
3. भाषा शिक्षणाच्या तत्त्वाची माहिती मिळविणे.
4. भाषेच्या प्रकारांचे ज्ञान प्राप्त करणे.
5. भाषेचे जीवनातील व अभ्यासक्रमातील स्थान व महत्त्व याचे ज्ञान अवगत करणे.

## 1.2 विषय विश्लेषण

### 1.2.1 भाषेचा अर्थ, स्वरूप व उत्पत्ती

#### 1.2.1.1 भाषेचा अर्थ व उत्पत्ती :

दोन माणसांना एकत्र आणणारा, विचारांचे संप्रेषण म्हणजेच देवाण-घेवाण करणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे भाषा होय. अर्थात एकमेकांची भाषा न समजणारी दोन माणसे एकत्रित आली तर त्यांचे व्यवहार ठप्प होतील असे नाही. खाणाखुणांनी ते कदाचित आपल्याला काय हवे आहे ते सांगतीलही; पण जे हवे त्यासाठी जर शब्दच वापरले तर आशय समजणे सोपे जाते. म्हणूनच भाषा आणि मानवी जीवन एकमेकांमध्ये पूर्णपणे मिसळून गेलेले दिसते. पण मुळात भाषा म्हणजे काय हे बघू ?

'भाष्' या धातूचा अर्थ बोलणे असा होतो.भाषा म्हणजे बोलण्याची विशिष्ट पद्धती माणूस बोलतो म्हणजेच वेगवेगळे ध्वनी,आवाज काढतो. कंठ, ओठ, जीभ यांच्या साहाय्याने हे ध्वनी काढले जातात. ध्वनींना अर्थ प्राप्त होणे म्हणजेच भाषेची निर्मिती होणे होय. भाषेची फक्त निर्मिती होऊनच थांबली नाही तर माणसाने त्यावर संस्कार केले. भाषा सांकेतिक असते. प्रत्येक शब्द एक प्रतीक असते. या संस्कारातच पुढे फक्त बोलली जाणारी भाषा जी 'मौखिक' स्वरूपात होती; तिच्यावर लिपिबद्धतेचे संस्कार झाले तिला दृश्य स्वरूप मिळाले. लिखित भाषेला महत्त्व प्राप्त झाले तरी मौखिक भाषाही तितकीच महत्त्वाची आहे. कारण माणूस लिहितो कमी, बोलतो अधिक. लिहिणाऱ्यांपेक्षा बोलणाऱ्या माणसांची संख्या जास्त आहे. म्हणूनच मौखिक भाषेचा वापर सर्वच लोक (अपवाद मूक-बधीर) करू शकतात. लिखित भाषेला मात्र काही किमान प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

काही माणसांच्या मते, परमेश्वराची विशेष कृपा म्हणून मानवाला भाषेचे वरदान मिळाले. या वरदानामुळेच आपण भाषा बोलू शकतो. मात्र शास्त्रज्ञांच्या मते, मानवाने प्राण्यांचे वेगवेगळे स्वर ऐकले, त्या स्वरांचे अनुकरण केले आणि त्याला भाषा बोलतो येऊ लागली. काही शास्त्रज्ञ भावनावेगातूनच ध्वनीची निर्मिती झाली आणि माणसाला भाषा बोलता येऊ लागली असे मानतात. मत कोणाचे काहीही असो, मात्र 'भाषेचा जन्म हा चमत्कार आहे' हे प्राध्यम विल्सन यांचे उदगार अतिशय सत्य आहेत. आदिमानवापासून ते मंगळावर मानवी वस्तीची स्वप्ने पाहणारा माणूस हा पल्ला केवळ भाषेमुळेच गाठू शकला हे नक्कीच.'अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा' हे केवळ भाषेमुळेच शक्य झाले.

#### 1.2.1.2 भाषेचे स्वरूप :

भाषा, ही अभिव्यक्तीचे एक महत्त्वाचे साधन, मौखिक भाषेत वाक्यांची, शब्दांची देवाण-घेवाण होते. पण अभिव्यक्तीसाठी काही अन्य युक्त्या-प्रयुक्त्यांचाही वापर केला जातो. त्यासाठी अंगिक अभिनय खूप उपयोगी पडतो. हातवारे करणे, भुवयांच्या हालचाली करणे, भावनुकूल चेहरा बदलणे, डोळयांच्या खूणांनी भाव दर्शविणे, वेगवेगळया चिन्हांच्या साहाय्याने विचार प्रकट करणे ही सगळी अभिव्यक्तीची साधनेच असतात. अभिव्यक्तीची काही साधने माणसांबरोबरच प्राण्यांनीही अंगिकारलेली दिसतात. जंगलात जर साळुंक्या थव्याने ओरडायला लागल्या तर तिथे जवळपास साप आहे असे खेडयातील माणसे

समजतात. आदिवासी समाजामध्ये ढोलाच्या साहाय्याने संदेशवहनाचे काम केले जात असे. भाषेचे स्वरूप थोडे अधिक स्पष्ट होण्यासाठी आपण भाषेच्या काही व्याख्या अभ्यासू.

**क्रोचे** या भाषाशास्त्रज्ञाच्या मते, ''भाषा अभिव्यक्तीच्या दृष्टीने उच्चारण व ठरावीक ध्वनींचे संघटन होय.''

**स्वीट** नावाच्या भाषाशास्त्रज्ञानेही याच्या जवळचीच व्याख्या केली आहे."ध्वनिमय शब्दाद्वारा विचारांचे प्रकटीकरण म्हणजेच भाषा होय.''

वरील दोन्हीही व्याख्यांमध्ये ध्वनीला, विचारांना महत्त्व आहे. निरर्थक ध्वनींना भाषेत स्थान नसते. त्यामुळेच भारतीय भाषा शास्त्रज्ञ सुकुमार सेन यांनी केलेली व्याख्याही वरील दोन व्याख्यांसारखीच आहे. ते म्हणतात, ''कंठाद्वारे निघालेला सार्थ ध्वनी समुच्चय म्हणजे भाषा होय.''

थोडक्यात –

1. भाषेचे स्वरूप ध्वनिमय आहे.
2. ध्वनींना अर्थ असेल तरच अभिव्यक्ती योग्य होईल.

## 1.2.2 भाषेची वैशिष्ट्ये, तत्वे व प्रकार

### 1.2.2.1 भाषेची वैशिष्ट्ये :

भाषेची अभिव्यक्ती मौखिक व लिखित अशा दोन्हीही पद्धतीने होते. मौखिक भाषा जेव्हा लिपिबद्ध केली जाते तेव्हा ती लिखित स्वरूपात येते. लिखित भाषेचा उपयोग समाज व संस्कृतीच्या संवर्धनासाठी केला जातो. आपला वारसा एका पिढीकडून दुसऱ्यापिढीकडे सोपविण्याचा सोपा मार्ग म्हणजे लिखित भाषा होय. जनमानसात वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही भाषेची काही वैशिष्ट्ये असतात. ती पुढीलप्रमाणे :

**(अ) अनुकरणशीलता :**

बालकाचा जन्म झाल्यावर आपल्या घरातील भाषेचेच ते अनुकरण करते. घरात बोलली जाणारी भाषा बालक ऐकते, बोलायला शिकते. घरातही त्याच्या कानावर पडणारे बोल साधारणत: मातेचेच असतात. बालकाच्या मातृभाषेचा उगम येथे होतो. घरानंतर ते बालक शेजारी जाते. तेथेही भाषा ऐकते, बोलते, त्याचेही अनुकरण करते. भाषाशिक्षणाचे हे अनुकरण शाळेमध्येही सुरूच असते. म्हणून 'शिक्षक'या नात्याने आपण वैशिष्ट्यांची दखल घेणे आवश्यक आहे.

**(ब) भाषेची समाज सापेक्षता:**

भाषा ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. परंपरेनुसार चालत आलेली भाषा व्यक्ती बोलतो. समाजात काळानुरूप भाषेचा विकास होतो. एकीकडे व्यक्ती समाजाकडून भाषा शिकतो, तर दुसरीकडे भाषेमुळे समाजाचा विकास होतो.

**(क) भाषेची परिवर्तनशीलता :**

देशाकाल स्थितीनुसार भाषेतही परिवर्तन होत असते. भाषेतील हे परिवर्तन ध्वनी, शब्द, पदबंध तसेच वाक्यरचनेच्या संदर्भात होते. भाषेच्या या बदलत्या स्वरूपामुळे असे म्हणता येते की, भाषेचे एकच एक रूप

किंवा अंतिम रूप नसते, ती काळानुसार बदलत जाते. ज्ञानेश्वरीच्या ओव्यांमधील मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा ही याचीच उदाहरणे किंवा शिवाजीराजांनी व्यंकोजींना लिहिलेल्या पत्रातील मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा ही काळानुरूप बदलते हे याचेच उदाहरण होय.

### 1.2.2.2. भाषा शिक्षणाची तत्त्वे :

भाषा शिक्षणाच्याही मानसशास्त्रीय, तात्त्विक व शास्त्रीय बाजू असतात. म्हणजेच भाषेचे अध्ययन करताना भाषेवर प्रभाव गाजविणाऱ्या या तात्विक, सामाजिक आणि मानसशास्त्रीय घटकांची दखल घ्यावी लागते. मानसशास्त्र व समाजशास्त्र यांचा संबंध खूपच जवळचा असतो. त्या-त्या समाजाची एक भाषा असते. सामाजिक परिसराचा परिणाम भाषेवर होतो. म्हणून तर मराठी ही एकच भाषा असली तरी सांगली, कोल्हापूरच्या भाषेचे काही वेगळे वळण असते. सोलापूर, नगरची मराठी आणखीनच वेगळी वाटते तर मराठवाडयातील मराठी खानदेशात कुतूहलाचा विषय ठरते. यातूनच भाषा अध्ययनाचे ‘सामाजिक तत्त्व‘उदयाला येते. मानसशास्त्राचा प्रभाव ही भाषेवर खूपच असतो. स्वयं अध्ययन, अध्यापन सूत्रे, सरावाचे महत्त्व, अनुकरणाचे महत्त्व, बालकेंद्रित अध्ययन, अभिरूचीचे महत्त्व, वैयक्तिक भिन्नतेचे महत्त्व, भाषा अध्ययनात खूप असते. यामधूनच भाषा अध्ययनाची काही तत्त्वे ठरतात. मानसशास्त्र माहीत असेल तर ती तत्त्वे अधिक चांगली समजतात आणि भाषेचे अध्ययन सहज होते. पण मानसशास्त्र माहीत नसेल तरी तत्वे समजून भाषेचे अध्ययन अध्यापन झाले तर दोन्हीचाही प्रभाव वाढतो. काही विषयात घटनांना अधिक महत्त्व असते. संकल्पनांना अधिक महत्त्व असते तर भाषा अध्यापनात सामान्यीकरणाचे महत्त्व अधिक असते. म्हणूनच घटक किंवा संकल्पना याकडून आपल्याला तत्त्वाकडे जावे लागते. या तत्त्वांचाच भाषा अध्यापनात खूप उपयोग होतो. त्यातील काही नमुनादाखल तत्त्वे येथे दिली आहेत. यापेक्षाही अधिक तत्त्वे असू शकतात. सामान्यीकरण प्रक्रियेमुळे त्यामध्ये अधिकाधिक भरच पडत जाणार आहे; परंतु तोपर्यंत पुढील काही तत्त्वांचा आपण अभ्यास करणार आहोत. ती तत्त्वे शिकण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे मूल भाषा जरी अनुकरणाने कुटुंबात शिकत असले तरी भाषा शिकताना काही घटक त्याला मदत करतात तर काही विघातक घटकांमुळे भाषा अध्ययनात अडथळे येतात. मूल भाषा कशी शिकते ? या प्रक्रियेत कोणते नियम, तत्त्वे येतात हे बघणे गरजेचे ठरते.

**भाषा शिक्षणाची तत्त्वे पुढीलप्रमाणे :**

1. प्रारंभिक अवस्थेचे तत्त्व.
2. पक्वतेचे तत्त्व.
3. स्वाभाविकता, अनुकरण व स्वयंसंशोधनाचे तत्त्व.
4. प्रयत्नांचे तत्त्व.
5. स्वयं अध्ययनाचे तत्त्व.
6. आधी मौखिक कौशल्ये, नंतर लेखनकौशल्याचे तत्त्व.
7. स्वातंत्र्याचे तत्त्व.
8. व्यक्तिभिन्नतेचे तत्त्व.

9. बाल केंद्रिततेचे तत्त्व.
10. प्रक्रियाशीलतेचे तत्त्व.
11. पुनररावृत्तीचे तत्त्व.
12. बहुमुखी (अनेकांच्या) प्रयत्नांचे तत्त्व.
13. उपयोजनाचे तत्त्व.

**1. प्रारंभिक अवस्थेचे तत्त्व :**

मुलाला भाषा बोलता आल्याशिवाय भाषा अध्ययनाला प्रारंभ करता येत नाही. ते मूल जरी घरात मातृभाषा बोलत असले तर ऐकणे, बोलणे, प्रत्युत्तर करणे (श्रवण, भाषण, संभाषण) इतपत त्याची प्रगती झालेली असते. मूल जी भाषा घरात बोलते, त्यावर घरातील बोलीभाषा व परिसराचे संस्कार होतात. त्यामुळे न/ण चा गोंधळ, जोडाक्षरांच्या उच्चारातील कमतरता, सदोष वाक्यरचना असे दोष कधी-कधी आढळतात. त्यामुळे वय वर्ष 6 ते 10 च्या दरम्यान शाळेत मुलाच्या भाषा अध्ययनास सुरूवात होणे इष्ट. कारण याच वयात मुलांची वाग्इंद्रिये कार्यक्षम होतात. कान, ओठ, जीभ, घशाची पोकळी, स्वरयंत्र ही इंद्रिये त्याला बोलण्यासाठी, उच्चारासाठी मदत करतात. त्यांचा विकास या वयात झाल्याने प्रारंभिक अवस्था महत्त्वाची ठरते. या वयात ही वाग्इंद्रिये अधिक संस्कारक्षम व लवचिक असतात. त्यामुळे वय वर्षे 4 ते 6 च्या दरम्यान मूल बालणे, ऐकणे ही मूलभूत कौशल्ये, दैनंदिन जीवनास आवश्यक अशी शब्दसंपत्ती, भाषेची रचना, वैशिष्टये व त्यांचे नियम आत्मसात करू शकते. त्यामुळे 6 ते 10 वर्षांपर्यंत शाळेत शुद्ध उच्चारांची सवय लावणे, अक्षराला वळण लावणे, बोलण्याच्या योग्य पद्धतींचा सराव देणे, पाठांतराची सवय लावणेइत्यादी गोष्टी प्रारंभिक अवस्थेत सहज शक्य होतात. त्यामुळे भाषा शिक्षणाचा प्रारंभिक काळ महत्त्वाचा मानला जातो.

**2. पक्वतेचे तत्त्व :**

भाषा शिकणे हे एक कौशल्य आहे आणि कोणतेही कौशल शिकण्यासाठी शारीरिक व मानसिक किमान पक्वतेची गरज असते. बाळाने खूप लवकर बोलावे असे आईला वाटत असले तरी ठरावीक काळानेच ते बोबडे बोल बोलू लागते. त्यासाठी घाई करून उपयोग नसतो. मुलाची इंद्रिये जोपर्यंत सक्षम होत नाहीत तोपर्यंत उच्चार, वाचन, लेखन ही कौशल्ये शिकवून उपयोग नसतो. जशी शारीरिक पक्वता तशीच मानसिक पक्वताही महत्त्वाची. विद्यार्थ्यांच्या वयोगटाचा विचार करून त्यांना नवे शब्द शिकवावे लागतात. इयत्ता तिसरीत विघार्थ्यांना गीतेतील शब्द समजावयाचा प्रयत्न केला तर ते त्यांच्या आकलन क्षमतेच्या पलीकडचे असतील. म्हणजेच शब्दसंपत्ती वाढविणे, रसग्रहण क्षमता निर्माण करणे, वेगवेगळया प्रकारचे लेखन करणे यासाठी योग्य मानसिक पक्वता आवश्यक असते. बुध्दिमत्तेत मागास असनाऱ्या विद्यार्थ्यांनाही अपेक्षित भाषिक क्षमता गाठताना त्रास होतो. म्हणून विद्यार्थ्यांना भाषा शिकविताना त्यांची आकलन क्षमता, बौध्दिक क्षमता, शारीरिक व मानसिक क्षमतांचा, त्यांच्या पक्वतेचा विचार करावाच लागतो.

**3. स्वाभाविकता, अनुकरण व स्वयंसंशोधनाचे तत्त्व :**

भाषा शिकण्याची शक्ती प्रत्येकात नैसर्गिकरीत्या असते. मूल सहजपणे भाषा शिकते व ऐकून बोलून त्याचा भाषिक विकास होतो. ऐकणे, ऐकलेले समजण्याची कला त्याला आपोआप येते. बोलण्याची कला आपल्याला निसर्गाने दिली नसती तर भाषेच्या अमोल शक्तीपासून आपण वंचित राहिलो असतो. ही शक्ती मातृभाषेपुरतीच न राहता अन्य भाषेच्या संपर्कात मूल आले तर ती भाषाही ते सहज स्वाभाविकपणे शिकते. मुलांमध्ये भाषा शिकण्याची स्वयंस्फूर्त योग्यता असते. प्रौढ व्यक्तींमध्ये ही शक्ती कमी-कमी होत जाते. भाषा शिक्षणात अनुकरणाचे महत्त्वही विशेष आहे. बालक अतिशय अनुकरणशील असते; बालकच नव्हें तर किशोरांमध्येही अनुकरणाची प्रवृत्ती दिसते. पुढे ही प्रवृत्ती कमी-कमी होत जाते. शब्दांचे उच्चार, वाक्यरचना, त्यांचा उपयोग मूल अनुकरणाने शिकते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अनुकरणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांचा आदर्श असावा आणि म्हणूनच शिक्षकाने भाषेचा उपयोग, वापर योग्य प्रकारेच केला पाहिजे.

**4. प्रयत्नांचे तत्त्व :**

भाषा गुंतागुंतीचा व सूक्ष्म विषय आहे. त्यामुळे भाषा शिकताना नैसर्गिक शक्तीबरोबरच प्रयत्नांचीही गरज असते. वाढत्या वयाबरोबरच विद्यार्थ्यांना भाषेतील साहित्य प्रकारांचा अभ्यास करावा लागतो. अलंकारिक व कलात्मक भाषा त्यांना प्रयत्नामुळेच शिकता येते. श्रृतलेखन, वाक्यरचना, तालासुरात पाठांतर, अनुवाद यासाठी प्रयत्न व सरावाची आवश्यकता असते. शुद्ध भाषेसाठीही प्रयत्नांची गरज असतेच.

**5. स्वयंअध्ययनाचे तत्त्व :**

भाषा शिकताना बालक स्वत: आपल्या चुका दुरुस्त करीत असते. बोलताना मूल जर इकडे ऐवजी इकले म्हणत असेल, 'ड' ऐवजी 'ल' अक्षराचा वापर करीत असेल आणि इतर त्याला चिडवत असतील तर ती चूक मूल दुरुस्त करते. शब्द, वाक्य, त्यांचे उच्चार, त्यातील तृटी मूल स्वत: दुरुस्त करीत भाषा शिकते. स्वयंसंशोधन पद्धतीचा वापर शिक्षकांनी करून घेतला पाहिजे. विशेषत: विद्यार्थ्यांचे उच्चारणातले दोष त्याला योग्य शब्दात दाखवून दिले, त्याच्या अहंला न दुखावता चुका सांगितल्या तर स्वयंसंशोधनाच्या तत्त्वानुसार'पच्चीम' चे 'पश्चिम', 'आनी' चे 'आणि' हे उच्चार तो दुरुस्त करील.

**6. आधी मौखिक कौशल्ये, नंतर लेखन कौशल्याचे तत्त्व :**

मूल आधी बोलायला शिकते म्हणून भाषा अध्यापनात आधी तोंडी (मौखिक) कौशल्ये शिकवावीत. मौखिक कार्यानंतर लेखन शिकवावे. वर्णमाला लिहिण्यास शिकविण्याआधी वर्णमाला वाचन शिकविले पाहिजे. मादामा मॉटेसरींचा या तत्त्वाला विरोध होता. परंतु भाषेचे स्वरूप बघता मौखिक कार्य आधी, नंतर लेखन हा क्रम निश्चितपणे सांगता येतो.

**7. स्वातंत्र्याचे तत्त्व :**

विद्यार्थ्याने भाषेवर प्रभुत्व मिळवावे, असे शिक्षकांना वाटत असते. त्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भाषा बोलण्याचे, लिहिण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. परंतु स्वतंत्रपणे भाषा वापरीत असताना त्यांनी काही चुका

केल्या तर त्या न रागावता दुरुस्तही केल्या पाहिजेत. उदा. एल. एम. या इंग्रजी वर्णांचा उच्चार यल, यम, असा केला तर त्या विद्यार्थ्यांना न हसता चूक समजावून द्यावी. अन्यथा न्यूनगंडामुळे तो ती भाषा बोलणेच सोडून देईल. मराठी शिकवितानाही आपण अनेक प्रश्न विद्यार्थ्यांना विचारतो. त्या प्रश्नांची उत्तरे त्यांना हवी तशी देऊ देत, नंतर सुधारणा करणे शक्य आहे. बोलण्यासाठी, लिहिण्यासाठी स्वतंत्र वातावरणाची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांची जिज्ञासा जागृत करणे, त्या अनुरोधाने त्याने विचार करणे,प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित असते. उदा. शहरातल्या शाळेत 'पाऊलवाटा' हा लघुनिबंध शिकवायचा असेल तर तुम्ही रोज शाळेत डांबरी रस्त्याने जाता, हे रस्ते आखून तयार केले जातात, पण काही रस्ते आपोआप होतात, कोणते ?यासारखी उत्सुकतापूर्ण पार्श्वभूमी तयार केल्यास विद्यार्थी स्वत: विचार करतो, वाक्याची जुळणी करून उत्तरे देतो. विचार भावना प्रकट करतो. परंतु वर्गातील वातावरण मोकळे नसेल तर विद्यार्थ्यांच्या आत्मप्रकटीकरणात अडथळे येतात. यासाठी वादविवाद, संभाषण, चर्चा, पत्रव्यवहार यातून विद्यार्थ्याला स्वतंत्रपणे आपली मते मांडण्याची संधी दिली पाहिजे. निबंधाचेही मुद्दे त्यांच्यावर न लादता एखादा विद्यार्थी स्वतंत्रपणे लेखन करू शकत असेल तर त्याच्या अभिव्यक्तीला वाव दिला पाहिजे. स्वातंत्र्याचे तत्त्व भाषा अध्यापनात विद्यार्थ्यांला नवनिर्मितीकडे घेऊन जाते.

**8. व्यक्तिभिन्नतेचे तत्त्व :**

एक व्यक्ति बौध्दिक क्षमता, आवड,वृत्ती, प्रवृत्ती, शारीरिक क्षमता, भावनिक उत्तेजन याबाबत दुसऱ्या व्यक्तीइतकी तंतोतंत सारखी नसते. हे मानसशास्त्राचे तत्त्व शिक्षणशास्त्रातही मान्यता पावले आहे. परंतु वर्गअध्यापनात सर्वच विद्यार्थी वरील सर्व बाबतीत सारखेच आहेत, असे धरून अध्यापन चालते. भाषा शिकणे हे एक कौशल्य आहे आणि कौशल्य प्राप्त करणे हे ज्याच्या त्याच्या मगदुरावर अवलंबून असते. त्यामुळे व्यक्तिभेदाचे तत्त्व लक्षात घेऊन शिक्षकाने प्रत्येक विद्यार्थ्यांच्या भाषिक त्रुटी व्यक्तिगत स्तरावर समजावून घेतल्या पाहिजेत व त्या दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्यात काही शारीरिक व्यंग – उदा. तोतरे बोलणे, कमी ऐकू येणे असेल तर त्यावरही उपचार करणे गरजेचे असते. थोडक्यात, भाषा अध्यापनात व्यक्तिगत मार्गदर्शनाची गरज भासते.

**9. बाल केंद्रिततेचे तत्त्व :**

आजची शिक्षणपद्धती बालकेंद्रित आहे. बालकासाठी शिक्षण आहे. त्यामुळे भाषिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी बालकाला सक्षम बनविणे हे भाषा शिक्षकाचे उद्दिष्ट असले पाहिजे. कधी कधी वर्गात भाषा शिकविताना शिक्षक आनंदविभोर होतात, परंतु आपल्या अध्यापनातून तोच आनंदाचा ठेवा विद्यार्थ्यापर्यंत पोहोचतो की नाही याची शिक्षकांना फारशी चिंता नसते. खरे तर विद्यार्थ्यांनाही त्या पाठातून तितकाच आनंद मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे भाषा अध्यापन करताना विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील उदाहरणे द्यायला हवीत. भाषा शिकविताना विद्यार्थ्यांचे स्वभाव, त्यांचा परिसर, त्यांची बौध्दिक कुवत, त्यांची आवड लक्षात घ्यावी लागते. उदा. छोटया गटाचे शब्दभांडार वाढवायचे असेल तर त्याचे शरीर, घरातील मंडळी, त्यांची नाती, आवडते पशुपक्षी, शेजारी, त्यांचे गाव यासंबंधी शब्दावलीची भर पाडण्यास शिक्षकाने मदत केली पाहिजे.

**10. क्रियाशीलतेचे तत्त्व :**

भाषा अध्ययनात जर विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले तर ते सक्रिय राहतात व भाषा चटकन शिकतात. परंतु त्यांना निष्क्रिय केले, फक्त श्रवण भक्ती करायला सांगितली तर बालक भाषा शिकत नाही. शिक्षक सक्रिय असून भागत नाही. बालकानेही भाषेचा वापर, उपयोग, प्रयोग वर्गात केला पाहिजे. म्हणून तर प्रश्नोत्तर पद्धतीचा वापर भाषा अभ्यापनात केला जातो. प्रश्नांची उत्तरे देताना, व्यक्तीचे वर्णन करताना, स्वत:च्या शब्दात म्हणी, वाक्यप्रचारांचा उपयोग करताना विद्यार्थी सक्रिय होतो. विचार करतो, भाषेचा स्वत:च्या मर्जीनुसार प्रयोग करतो व भाषेचा वापर योग्य प्रकारे करतो. फक्त प्रश्नोत्तर पद्धतीचाच वापर न करता, शिक्षकाने वर्गात नाट्यीकरण पद्धती, चर्चा पद्धती, वादविवाद इत्यादी पद्धतींचा वापर केला तर विद्यार्थी क्रियाशील होतील व अध्यापनात अधिक रूची घेतील.

**11. पुनरावृत्तीचे तत्त्व :**

'प्रयत्न वाळूचे कण रगडिता तेलही गळे'या उक्तीने थॉर्नडाईकचा पुनरावृत्तीचा (सरावाचा) नियम स्पष्ट होतो.भाषा एक कौशल्य आहे आणि जितके प्रयत्न अधिक, सराव जास्त, तितका भाषिक विकास जास्त, सराव नसेल तर भाषेवरील प्रभुत्व कमी होते. बरेच मराठी भाषिक लोक बंगाली, गुजराती, फ्रेंच, रशियन, उडिया, तेलगू या भाषा प्रयत्नपूर्वक शिकतात. पण पुढे त्याचा सराव न राहिल्याने त्या भाषा बोलणे, वाचणे, लिहिणे त्यांना जमत नाही. भाषा अध्यापनात भाषासामग्री कंठस्थ (पाठ) करण्याचे महत्त्व यासाठीच आहे. त्यामुळे भाषा बोलताना वाटणारी लाज, संकोच, अशुद्धतेची भीती दूर होते. म्हणून काही जोडाक्षरे, म्हणी, वाक्यप्रचार, संवाद, कविता विद्यार्थ्यांकडून पाठ करवून घेतल्या पाहिजेत. सततच्या सरावाने, पुनरावृत्तीने पाठांतर सोपे होते व पाठ केलेल्या म्हणी, वाक्प्रचारांचा लेखन, भाषणात सहज उपयोगही करता येतो. महर्षी पतंजलींनी भाषा अभ्यासाच्या संदर्भात तीन आवश्यक बाबी सांगितल्या आहेत. त्या म्हणजे रुची, नैरंतर्य व वैराग्य होय. निरंतर म्हणजे सतत अभ्यास (प्रयत्न) करणे, अभ्यासात रुची निर्माण करणे, आवड असणे गरजेचे आहे. अभ्यासातील बाधक तत्त्वांबाबत वैराग्य भाव ठेवावा. म्हणजे बाधक तत्त्वे दूर करावीत. तृटी कमी कराव्यात. अशा प्रकारे केलेला सराव अंतिम लक्ष्याप्रत जातो. खेळाच्या संदर्भातही फुटबॉल, हॉकी या खेळातही सामान्य खेळाडू आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त करू शकतो. त्यामुळे कोणतेही कौशल्य शिकण्यासाठी सरावाचे, पुनरावृत्तीचे तत्त्व महत्त्वाचे ठरते.

**12. बहुमुखी (अनेकांच्या) प्रयत्नांचे तत्त्व :**

भाषा शिक्षणासाठी एकटया भाषा शिक्षकाने प्रयत्न करून भागत नाही. इतर विषयांच्या शिक्षकांनीही त्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असते. कारण एका तासिकेत भाषा शिक्षकाने शुद्ध उच्चारणासाठी प्रयत्न केले आणि त्यानंतर इतिहास, भूगोलसारख्या विषयात विद्यार्थी पच्चीम, हाये, आनी म्हणत राहिला व शिक्षकांनी त्या अशुद्धतेकडे किंवा लिखाणातील चुकांकडे दुर्लक्ष केले तर विद्यार्थी भाषेचा उपयोग योग्य प्रकारे करू शकणार नाही. उलट तो काही बाबतीत गोंधळात पडेल. जे शब्द इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्रात चुकत नाहीत ते भाषेतच कसे चुकतात असा प्रश्न त्याला सतावत राहील. त्यामुळे भाषेच्या तासाला शुद्धतेवर भर व उरलेल्या सात तासांत तिकडे दुर्लक्ष असे करून चालणार नाही. त्यासाठी सर्व शिक्षकांनी सांघिक प्रयत्न करणे गरजेचे ठरते. इतकेच नव्हे तर पाठयक्रमाव्यतिरिक्त सहशालेय कार्यक्रम,

सांस्कृतिक कार्यक्रम, अनौपचारिक गप्पा यातही सर्व शिक्षकांनी शुद्ध उच्चारण 'स्वत:चे' व विद्यार्थ्यांचे इकडे लक्ष दिल्यास विद्यार्थ्यांचा भाषिक विकास योग्य प्रकारे होईल.

**13. उपयोजनाचे तत्त्व :**

उपयोजन म्हणजे मिळविलेले ज्ञान व्यवहारात उपयोगात आणता येणे, त्या ज्ञानाचा वापर करता येणे, विद्यार्थी बेरीज-वजाबाकी शिकला की त्याला तोंडी हिशेब यावेत हे गणितातले उपयोजन होय. तो विद्यार्थी 14 रूपये घेऊन भाजी आणायला गेला तर किती पैसे झाले हे त्याला तोंडी हिशेबाने समजावे, त्यासाठी पेन-पेन्सिलीचा वापर न करता यावा. याच प्रकारे भाषेतही शिकलेली कौशल्ये उपयोजित करता आली पाहिजेत. विद्यार्थ्याला चिन्हांचा वापर करून प्रगट वाचन करता आले पाहिजे. कवितेचे सुस्वर गायन करता आले पाहिजे. थोडक्यात, शिक्षकांनी जो पाठ शिकविला असेल त्याला अनुसरून उपयोजन घेतले तर विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासाबरोबर त्यांचा वाड्.मयीन विकासही होईल.

**1.2.2.3.भाषेचे प्रकार :**

संस्कृत, लॅटिन या प्राचीन भाषा मूळ भाषा आहेत. या भाषांतून अनेक भाषा निर्माण झाल्या. भारतात संस्कृत या मूळ भाषेपासून हिंदी, मराठी यांसारख्या भाषा निर्माण झाल्या. अशा प्राचीन मूळ भाषांना **अभिजात भाषा**(Classical language) असे म्हणतात.

ज्या भाषा प्राचीन काळात प्रचलित होत्या पण आधुनिक काळात दैनंदिन व्यवहारात त्या वापरल्या जात नाहीत अशा भाषांना **प्राचीन भाषा** म्हणतात. पाली, प्राकृत, अर्धमागधी इत्यादी भाषांचा समावेश आपणास प्राचीन भाषांत करता येईल.

लहान मूल ज्या घरात जन्माला आले असेल त्या घरात बोलत्या जाणाऱ्या भाषेचा संस्कार त्या बालकावर अगोदर होतो. अशी भाषा विनासायास त्याच्या कानावर पडते व अनुकरणाने त्याला शिकता येते. ती भाषा त्या बालकाची **मातृभाषा** होय. मातृभाषेतून आपण विचार करीत असतो.

परकीय देशांत बोलल्या जाणाऱ्या भाषा म्हणजे **परकीय भाषा** होत. परकीय भाषा शिकणे ऐच्छिक असते.

कोणत्याही भाषेचा वापर केला जात असताना त्या भाषेच्या उपयोगात त्याच्या व्यक्तिगत लकबिचा मोठा वाटा असतो. भाषा बोलताना उच्चारले जाणारे स्वर भिन्न भिन्न असतात. भाषा बोलताना लयीत फरक असतो. या भाषेला **व्यक्तिबोली** असे म्हणतात.

विस्तृत भूप्रदेशावर पसरलेल्या भाषेस तेथील स्थानिक परिस्थितीनुसार काही वैशिष्टये प्राप्त होतात. मराठी भाषा विस्तृत प्रदेशावर बोलली जात असताना कोकणी, अहिराणी, खानदेशी, कोल्हापुरी, वऱ्हाडी अशा बोली निर्माण झाल्या. अशा भाषांचा समावेश बोलीभाषेत (Dialect) होतो. मराठी भाषेप्रमाणे हिंदी भाषेच्या खडी, व्रज, अवधी अशा अनेक बोलीभाषा आहेत.

विविध बोलीभाषांपैकी एका बोलीस राजकीय तसेच सामाजिक कारणामुळे महत्त्व प्राप्त होते. अशा भाषेला शिक्षणक्षेत्रात व सामाजिक व्यवहारात प्रमुख स्थान मिळते. अशा भाषेस प्रमाणित भाषा (Standard language) असे म्हणतात.

सरकारी कारभारात वापरण्यात येणाऱ्या भाषेस राजभाषा असे म्हणतात. एखादे राष्ट्र विशिष्ट भाषांना राष्ट्राची भाषा म्हणून घोषित करते त्यावेळी त्या भाषांना **राष्ट्रभाषा** असे संबोधले जाते. महाराष्ट्रात मराठी या भाषेला राजभाषेचा दर्जा आहे तर भारताची हिंदी ही राष्ट्रभाषा आहे.
संपूर्ण जगात जास्तीत जास्त उपयोगात येणाऱ्या भाषेस **जागतिक भाषा** म्हणतात.

राष्ट्राराष्ट्रांत ज्या भाषांचा उपयोग केला जातो त्या आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून ओळखल्या जातात. इंग्लिश, फ्रेंच, रशियन, चिनी या आंतरराष्ट्रीय भाषा आहेत.

राज्य सरकारे व केंद्र सरकार आपापसातील व्यवहारासाठी ज्या भाषांचा वापर करतात त्या भाषांना **संपर्क भाषा** (Link language) असे म्हणतात. भारतात इंग्लिश व हिंदी या संपर्क भाषा म्हणून ओळखल्या जातात. असे भाषांचे विविध प्रकार आहेत.

### 1.2.3 मराठी भाषा शिक्षणाचे जीवनातील स्थान व महत्त्व

भाषा शब्द 'भाष' या धातूपासून बनला आहे. भाष् याचा मूळ अर्थ बोलणे. मानव स्वत:चे भाव, विचार इत्यादी मानसिकक तथ्ये प्रामुख्यांनी बोलण्याच्या माध्यमातून व्यक्त करतो. अथवा समजावून घेतो. तसेच भाषेचे मूळ स्वरूप म्हणजे बोलणे वा भाष्य होय.

'जननी जन्मभूमी स्वर्गाआपी गरिअसी' (आई आणि जन्मभूमी स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ आहेत) येथे कवीने आईचा व जन्मभूमीचा गौरव केलेला आहे. आधुनिक काळात भाषेच्या माध्यमाशिवाय मानवी जीवन अपूर्ण आहे. त्यामुळे आई आणि जन्मभूमी इतकेच महत्त्व मातृभाषेला आहे.

आईच्या दुधावर बालकाची शारीरिक वाढ होते. बालकाचा मानसिक विकाससुद्धा आईच्याच ममतेने होतो. त्याचप्रमाणे व्यक्तीच्या जीवनात मातृभाषेला महत्त्व आहे.

जन्मभूमीतील पिकांवर व्यक्तीचे पोषक होते. पण मातृभाषेतील साहित्य, ज्ञान, माहिती यामध्ये व्यक्तीचा मानसिक व भौतिक विकास होतो. मातृभाषेच्या संस्काराचे क्षेत्र मोठे व्यापक आहे. प्रत्येक व्यक्ती मातृभाषेच्या सांस्कृतिक वातावरणात वाढते आणि राहते. या सांस्कृतिक वातावरणातूनच व्यक्तीला जीवनरस मिळतो. मन:पिंड घडतो. व्यक्तीच्या अंत:करणातील भावनांचा प्रथम उद्रेक हा मातृभाषेतूनच घडतो. म्हणून 'मातृभाषा मराठी ही हृदयाची भाषा आहे'. (Mother tongue is the language of heart) असे इंग्लिश कवी कोलरिज ह्यांनी म्हटले आहे.

आईचे दूध ज्याप्रमाणे व्यक्तीच्या रक्तात असते. त्याचप्रमाणे जन्मभूमीच्या अन्नाने तयार झालेले रक्त शरीरात असते. त्याचप्रमाणे व्यक्तीच्या शरीरात मातृभाषेचे स्वत्त्वसुद्धा सळसळत असते. मातृभाषा व्यक्तीच्या थेट नेणीवेपर्यंत जावून बसलेली असते. मातृभाषेचे संस्कार व्यक्तीच्या मेंदूवर रूजलेले असतात. व्यक्तीला तीव्र वेदना, आनंद झाला तर अंत:करणातून मातृभाषेचेच सहजोद्गार निघतात मातृभाषा ही अशा रितीने शरीरात आणि मनात भिनलेली असते. म्हणूनच तिचे जीवनातील महत्त्व अनन्यसाधारण आहे.

### 1.2.4 मराठी भाषेचे अभ्यासक्रमातील स्थान व महत्त्व

**क) प्रथम भाषा मराठी :**

महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठी मातृभाषेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्राथमिक स्तरावरील सामाजिक शास्त्रे, विज्ञान व गणित हे विषय शिकण्याचे महत्त्वपूर्ण साधन म्हणूनही मराठी भाषेचे

अभ्यासक्रमास मोठे योगदान आहे. महाराष्ट्रात मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळेत मराठी भाषेचा दर्जा उच्चस्तरीय आहे. विद्यार्थी मराठी भाषा ही प्रथम भाषा म्हणून शिकतात. प्राथमिक शिक्षणाचे ध्येय हे श्रवण, वाचन, संभाषण, प्रकटीकरण हे आहेत.

मानवी जीवनात भाषेला अनन्यसाधारण स्थान आहे. भाषा हा आपल्या समाजाकडून मिळालेला महत्त्वाचा वारसा आहे. विचारांची देवाण-घेवाण करणे हे भाषेचे प्रधान कार्य आहे. आपण आपले व्यवहार प्रामुख्याने मातृभाषेतून करतो आणि गरज भासली तर अन्य संपर्क भाषांचा वापर करतो. आपल्या व्यवहारात चैतन्याचा प्रवाह मातृभाषेमुळेच येतो. ज्ञानग्रह ज्ञानसंवर्धन, ज्ञानप्रसार ही कार्ये भाषेमुळेच शक्य होतात. प्रथम भाषा मराठीच्या अभ्यासक्रमात शुद्ध वाक्ये, शब्दांचे अर्थ व वाक्यसबंधाच्याद्वारे व्यक्त होणाऱ्या अर्थाची सूक्ष्मता, भाषेच्या विविध अंगावर मिळवावयाच्या प्रभुत्त्वाचा समावेश होतो. तसेच भाषेतील शुद्ध आणि वाक्यबंधाचा सूक्ष्मपणे वापर करण्याची क्षमताही निर्माण होणे अपेक्षित असते.

**ख) मराठी द्वितीयभाषा :**

इयत्ता पाचवीपासून मराठी भाषा द्वितीय स्तरावर शिकवण्याची योजना केलेली आहे. या स्तरावरील अभ्यासक्रमात मराठी भाषा बोललेली व लिहिलेली समजावी. भाषा बोलता यावी व गरजेपुरती लिहिता यावी असे अपेक्षित आहे. मराठी भाषेबद्दल प्रेम निर्माण व्हावे, मराठी भाषिकाबद्दल आत्मीयता वाटावी आणि महाराष्ट्रीय जीवनसंस्कृतीशी समरस होता यावे हाही त्यातील एक प्रमुख हेतू आहे.

**ग) मराठी-हिंदी संयुक्त अभ्यासक्रम :**

मराठी ही आपल्या राज्याची, राजभाषा आहे. राज्यातील बहुसंख्य शाळा ह्या मराठी माध्यमांतून शिक्षण देतात. तसेच महाराष्ट्रात मराठी भाषिकांबरोबरच गुजराथी, सिंधी, उर्दू, कन्नड, तेलगू लोक राहतात. त्यांच्या शिक्षणाची सोय त्यांच्या मातृभाषेच्या माध्यमातून केलेली आहे. परंतु दैनंदिन जीवन सुकर होण्यासाठी केवळ मातृभाषेचा अभ्यास पुरेसा नाही. महाराष्ट्राची राज्यभाषा म्हणून मराठी आणि भारताची राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. म्हणून मराठी, हिंदी, इंग्रजी माध्यमाच्या शाळाव्यतिरिक्त, तसेच उर्दू माध्यम असलेल्या काही शाळांव्यतिरिक्त अन्य भाषा माध्यमांच्या शाळांतील सहावी ते आठवी या इयत्तांसाठीच्या अभ्यासक्रमात प्रामुख्यांनी मराठी भाषा बोललेली समजावी, ती बोलता-लिहिता यावी, मराठी भाषिकांशी संपर्क साधता यावा, त्यांच्याविषयी आपुलकी व प्रेम वाटावे आणि मराठी भाषेबद्दल आदर निर्माण व्हावा हा या अभ्यासक्रमाचा हेतू आहे.

**घ) प्राथमिक शाळेत मराठी भाषा ही माध्यम भाषा:**

मराठी मातृभाषा असलेल्या विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण हे मराठी मातृभाषेतूनच मिळते. इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान या सर्व विषयांचे माध्यमही मराठीच आहे म्हणून मराठी हा केवळ विषय नसून मराठी भाषेला शिक्षणाच्या माध्यमाचा दर्जा प्राप्त झालेला आहे.

### 1.2.5 मराठीचा इतर विषयांशी सहसंबंध

शाळा आणि महाविद्यालयात आपण जे विविध विषय शिकवितो त्यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध असतो. वास्तविक पाहता ही एकाच जीवनाची अंगोपांगे आहेत. सर्व विषयांच्या अभ्यासातून संपूर्ण जीवन साकार होत असते. अभ्यास करण्याच्या दृष्टीने आपण आपल्या सोईसाठी असे वेगवेगळे भाग केले आहेत व त्यांना इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, गणितशास्त्र, मराठी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र इत्यादी नावे दिली आहेत. त्यामुळे वर्गाध्यापनाच्या वेळी एखादा विषय महत्त्वाचा, दुसरा विषय गौण किंवा एक विषय श्रेष्ठ, दुसरा कनिष्ठ असे काहीही असत नाही. सर्व विषय आपापल्या परीने महत्त्वाचे आहेत. जीवनाचे दर्शन एका विशिष्ट अंगाने समजून सांगणारे आहेत.

शालेय किंवा उच्च माध्यमिक शाळेत सर्वच विषय आपणास तुटकपणे शिकवायचे नाहीत तर त्यातील सहसंबंध किती घनिष्ठ आहे, सर्वच विषय कसे एकमेकांना जोडलेले आहेत हे वेळोवेळी दाखवून द्यावयाचे आहे. प्रत्येक विषयात शिकविणारे शिक्षक वेगवेगळे असल्यामुळे विषयांत असलेला परस्परसंबंध चटकन ध्यानात येत नाही. त्यामुळे एकूण जीवन जाणण्यातच तुटकपणा निर्माण होतो. हा तुटकपणा कमी करून त्यांच्यातील संबंध विद्यार्थ्यांच्या ध्यानात आणून देण्याचे महत्त्वाचं कार्य शिक्षकांना करावयाचे आहे.

एका विषयाचा दुसऱ्या विषयाशी जसा जवळचा संबंध आहे तसाच प्रत्येक विषयाचा जीवनाशी अत्यंत निकटचा संबंध आहे. एका विषयाचा दुसऱ्या विषयाशी तसाच प्रत्येक विषयाचा जीवनाशी संबंध जेव्हा आपण जोडत असतो तेव्हा त्याला समवाय असे म्हणतात. एकदा आपण हा समवाय प्रस्थापित केला की मग एका विषयात संपादित केलेली कौशल्ये दुसऱ्या विषयातही उत्तम प्रकारे उपयोगी पडतात हे ध्यानात येते. हे सहसंबंध दोन प्रकारचे असतात. एक तर विषयात अंतर्गत सहसंबंध असतात आणि दुसरे असे की एका विषयाचा इतर विषयांशी सहसंबंध असतो. मातृभाषा – मराठी या विषयाच्या संदर्भात हे अंतर्गत सहसंबंध कसे आहेत व अन्य विषयांशीही मातृभाषेचे सहसंबंध कसे आहेत हे आपणास आता विस्ताराने पाहावयाचे आहे.

विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या भाषेला प्रादेशिक भाषा असे म्हणतात. त्या त्या प्रदेशाची वैशिष्टये त्या त्या भाषेतून व्यक्त होत असतात. प्रादेशिक भाषेतून साहित्यनिर्मिती होत असते. त्या प्रदेशातील वास्तवतेच्या चित्रणाचे प्रतिबिंब साहित्यात पडलेले असते. प्रादेशिक भागात लोक जशी भाषा बोलतात तसेच लिहिलेले असल्यामुळे प्रादेशिक भाषेतील उतारे विद्यार्थ्यांच्या अंत:करणापर्यंत जाऊन भिडतात. अशा उताऱ्यातून विद्यार्थ्यांवर संस्कार होतात. प्रादेशिक भाषेतील पाठ पाठयपुस्तकात समाविष्ट करावेत. वऱ्हाड, खानदेश, कोकण इत्यादी प्रदेशांत बोलल्या जाणाऱ्या वऱ्हाडी, खानदेशी तसेच कोकणी भाषेतील पाठ काही प्रमाणात पाठयपुस्तकांत समाविष्ट केले आहेत. प्रमाणभाषेतील पाठ आणि प्रादेशिक भाषेतील पाठ यांत वापरल्या गेलेल्या भाषेत बरेच साम्य असते. काही विशिष्ट शब्दांतील तसेच वाक्यरचनेतील फरक लक्षात घेतले की ते पाठ लगेच समजतात.

प्रादेशिक भाषेच्या श्रेष्ठत्वावरून एखादया वेळी वाद निर्माण होण्याची शक्यता असते. प्रमाणभाषाच कशाला हवी आम्ही वऱ्हाडी भाषेतच बोलू असा तंटा निर्माण झाल्याने राष्ट्रीय ऐक्याला तडा जाण्याचा धोका असतो. पण त्या भाषांत असलेला सहसंबंध ध्यानात आणून दिल्यास त्यातून भावनिक ऐक्य साधता येते. दर दोन कोसांवर भाषा बदलत असते. भाषा मराठीच पण त्यात थोडा-थोडा फरक होत जातो. या पूर्वीच्या पाठयपुस्तकातील बहिणाबाईंच्या कविता, लक्ष्मण माने यांचा 'शाळंत जायचं' हा पाठ,

विठ्ठल वाघांची 'तिफन'ही कविता भाषेतील वेगळेपण असूनही विद्यार्थिप्रिय असलेल्या दिसून येतात. विविधता आहे पण त्यातून एकता प्रस्थापित करणे ही शिक्षकांची भूमिका असली पाहिजे.

प्रादेशिक भाषा, बोलीभाषा, प्रमाणभाषा, पोटभाषा यांवरून भांडत न बसता त्यांत असलेल्या सहसंबंध प्रस्थापित करणे अगत्याचे असते. त्यामुळे त्यांच्यामधील असलेल्या वेगळेपणाचा आस्वाद विद्यार्थी घेऊ शकतील.

**1. मराठी आणि संस्कृत :**

आपली मराठी भाषा ही संस्कृतपासून निर्माण झालेली भाषा आहे. मराठी भाषेतील बरेचसे शब्द संस्कृतमधून आले आहेत. काही शब्द थोड्याफार फरकाने मराठी भाषेत समाविष्ट झाले आहेत. मराठीतील प्राचीन वाड्.मयावर संस्कृत भाषेची छाप पडलेली दिसते. विशेषत: पंडिती काव्य संस्कृत काव्यासारखे बोजड आहे. मराठी भाषा आणि संस्कृत भाषा यांच्या व्याकरणात बरेचसे साम्य आहे. वाक्यरचनाही कर्ता, कर्म आणि नंतर क्रियापद अशीच आहे. संस्कृतप्रमाणे मराठीतही तीन लिंगे आहेत. संस्कृत आणि मराठी या भाषांची लिपी देवनागरी आहे. संस्कृतमध्ये श्रेष्ठ दर्जाचे साहित्य आहे. त्या साहित्याचे भाषांतर मराठीत झाले आहे. संस्कृतमध्ये उत्तम रचना करणारे कालिदास, भवभूती, मराठी मनास भावतात. मराठीच्या आधारे संस्कृत भाषेचा परिचय करून घेणे सोपे आहे. त्या भाषांत असलेल्या सारखेपणाचा उपयोग करून घेता येईल. संस्कृतमध्ये 'सुभाषिते'हा खास वाड्.मयप्रकार आहे. त्या सुभाषितांचा उपयोग मराठी भाषेतील साहित्यात दागिन्यांसारखा करून घेता येतो. संस्कृतमधील प्रमुख वचनांचा अवतरणे म्हणून वापर करता येतो. संस्कृत भाषा ही मराठीची माता आहे. संस्कृतच्या अभ्यासाने मराठी समृद्ध होईल.

**2. मराठी आणि हिंदी :**

मराठी ही राज्यभाषा तर हिंदी राष्ट्रभाषा! हिंदी ही राष्ट्रभाषा असली तरी देशाचा कारभार इंग्रजीतून चालतो यासारखी दुर्दैवाची गोष्ट नाही. जगातील बहुतेक राष्ट्रे आपल्या भाषेला मानाचे स्थान देतात. सर्व व्यवहारासाठी अगदी माध्यमाची भाषा म्हणूनही राष्ट्रभाषेचा उपयोग करतात. पण आमच्या देशात 'हिंदी हटाव' ची मोहीम हाती घेतली जाते. सर्व राज्यांत हिंदी भाषेचा आदर केला पाहिजे. कोणतेही राज्य त्याला अपवाद असता कामा नये.

मराठी भाषेप्रमाणे हिंदी भाषा ही संस्कृतोद्भव आहे. एका आईच्या या दोन मुली आहेत. त्यांच्यात खूप साम्य आहे. हिंदीतही बरेचसे शब्द संस्कृतमधून आलेले आहेत. हिंदीत संस्कृत शब्दांचा वापर अधिक केला तर ती संस्कृतप्रचुर हिंदी म्हणून ओळखली जाते. हिंदी आणि मराठी व्याकरणात बरेच साम्य आहे. वाक्य संपल्यावर चरणदंड देण्याची पद्धत होती. आता नवभारत टाईम्सची सर्व प्रकाशने चरणदंडाऐवजी संस्कृत-मराठीतील पूर्णविरामाचा वापर करतात. हिंदी-मराठी वाक्यरचनेत साम्य आहे. मराठी भाषेप्रमाणेच हिंदी साहित्य समृद्ध आहे. हिंदी साहित्यातील संतकाव्य अजरामर आहे.

हिंदी साहित्यातील काही प्रसिद्ध रचनांचे मराठीत भाषांतर करून विद्यार्थ्यांपर्यंत ते पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून पोहोचविले पाहिजे. मराठी शिकविताना हिंदी साहित्यातले दाखले द्यावेत. अवतरणांचा वापर करावा. महाराष्ट्रात भाषाभ्यासात मराठी, इंग्रजी या भाषांबरोबर विद्यार्थी हिंदीचा आवडीने अभ्यास करतात. राज्यांतील संपर्क भाषा म्हणून हिंदीचे स्थान अढळ आहे. राष्ट्रपती, पंतप्रधानांसारख्या महत्त्वाच्या व्यक्तींनी

राष्ट्राशी हिंदीतूनच बोलले पाहिजे. इंग्रजीची गुलामगिरी टाकून देऊन राष्ट्रभाषेच्या माध्यमातून राष्ट्रप्रेम जागृत केले पाहिजे. देशात एकता व प्रेम निर्माण करावयास हिंदी भाषेसारखे दुसरे माध्यम नाही !

**(भ) मराठी आणि इंग्रजी :**

इंग्रजी भाषा ही जगातील श्रेष्ठ भाषा आहे. इंग्रजी भाषेचे शब्दभांडार विपुल आहे. इंग्रजी भाषेला थोर परंपरा आहे. या भाषेत उत्कृष्ट साहित्याची रेलचेल आहे. इंग्रजी भाषेच्या या वैभवाकडे, या श्रीमंतीकडे पाहिले तर मराठी भाषा त्या मानाने फारच अपुरी वाटते. सर्व शास्त्रांचे ज्ञान इंग्रजी भाषेतून उपलब्ध आहे हे इंग्रजी भाषेचे खास वैशिष्टय म्हणून नमूद करता येईल.

इंग्रजांमुळे आपला देश इंग्रजी भाषेच्या संपर्कात आला . भारतीयांचे अगदीच काही फायदे झाले नाहीत असे म्हणता येणार नाही पण इंग्रजीमुळे देशाचे जे तोटे झाले त्याचे पारडे जड आहे यात तिळमात्र संशय नाही. इंग्रजी भाषेच्या संपर्काने आम्ही भारतीय इतके दिपून गेलो की तेव्हापासून आजपर्यंत आमच्या भाषेवर खऱ्या अर्थाने आम्हास प्रेम करता आले नाही. हिंदीवरही नाही आणि मराठीवरही नाही ! इंग्रजी शब्दांचा मारा आमच्या भाषेवर इतक्या मोठया प्रमाणावर झाला की आमच्या भाषेतील शब्द वापरण्यापेक्षा आम्ही इंग्रजीतीलच शब्द अधिक वापरून मराठी बोलू लागलो. इंग्रजीचे वर्चस्व इतके वाढले की 'शुभप्रभात' म्हणणे किंवा 'नमस्कार' म्हणणे आम्हाला अवघड वाटू लागले. 'गुड मार्निंग', 'गुड आफ्टरनून सर', 'गुड नाईट', 'बाय-बाय' या शब्दांनी आम्हाला अक्षरश: वेडे केले. मेज शब्दाबद्दल टेबल शब्द वापरणे आम्हाला सोपे वाटू लागले. 'गुरूजी' शब्द आम्हाला अगदीच खेडवळ वाटू लागला. त्याऐवजी 'टीचर' ऐटबाज व रूबाबदार वाटू लागला !

हे असे सगळे विलक्षण घडले असले तरी विद्यार्थ्यांना आम्ही इंग्रजी साहित्यिकांचा व इंग्रजी साहित्याचा परिचय करून दिलाच पाहिजे. भाषा ही शेवटी मानवाच्या कल्याणासाठी असते. इंग्रजी-मराठी सहसंबंध प्रस्थापित करून विद्यार्थ्यांच्या विकासाचा मार्ग खुला करून देणे हे आम्हा शिक्षकांचे आद्य कर्तव्य आहे. साहित्याप्रकारांचे उत्तमोत्तम नमुने इंग्रजीमध्ये आहेत. ते भाषांतरित स्वरूपात विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावेत. इंग्रजी भाषेचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवला तर मराठी भाषा निश्चितपणे प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू शकेल.

**(म) मराठी आणि इतर भाषा :**

संस्कृत, हिंदी, इंग्रजी या तीन भाषांप्रमाणे कानडी, तेलगू, उर्दू, गुजरती, सिंधी या भाषांचा सहसंबंध ही महत्त्वाचा आहे. या भाषांची धाटणी वेगळी असली तरी त्या भाषांपासून मराठी भाषेचे बरेच काही घेतले आहे. उर्दू भाषेतून आम्ही शेर, गझल हे वाड्.मय प्रकार मराठी साहित्यात आणले आणि ते चांगलेच लोकप्रिय झाले. कानडी आणि गुजराती भाषेतील शब्द आम्ही मराठीत घेतले व ते शब्द आता आमचे होऊन गेले. तेलगू साहित्याला खूप मोठी परंपरा आहे. त्या भाषेतील साहित्य श्रेष्ठ दर्जाचे आहे. तेलगू भाषेतील काही नमुने मराठी भाषेत भाषांतरित करून ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविले पाहिजेत. या भाषेत लेखन करण्याचा श्रेष्ठ साहित्यिकांचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला पाहिजे. महाराष्ट्राला कर्नाटक आणि गुजरात तसे जवळचे आहेत. त्यांच्या साहित्याशी व भाषांशी आमची मुळात जवळीक आहेच. सहसंबंधातून ही जवळीक अधिक दृढ होईल.

**(य) मराठी आणि सामाजिक शास्त्र :**

मराठी विषय शिकवितांना पाठ्यपुस्तकांत ऐतिहासिक संदर्भ असलेले पाठ समाविष्ट केलेले असतात. इ.10 वीच्या कुमारभारती या पाठ्यपुस्तकात माधवराव पेशवे आणि न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांच्यावर आधारलेला रणजित देसाई लिखित ‘न्याय’ हा पाठ समाविष्ट केला आहे. त्याचप्रमाणे ‘अपेश मरणाहून वोखटे’ या पाठात दत्ताजी शिंदे यांच्या स्वभावाचे वर्णन आहे. पाठ्यपुस्तकातून ऐतिहासिक नाटकातील उतारेही दिसून येतात. हे पाठ शिकविताना शिक्षकांना इतिहासाचा उपयोग होतो.

इतिहासाच्या तासाला इतिहासाचे शिक्षक ऐतिहासिक घटना, समर प्रसंग, युध्दांची वर्णने, थोर पुरूषांची चरित्रे विद्यार्थ्यांना रंगवून सांगतात. हा इतिहास, ही वर्णने विद्यार्थ्यांना मराठी भाषेचा उपयोग करून सांगितली जातात. असा मराठी-इतिहास या विषयांचा संबंध अतिशय जवळचा आहे. मराठी विषयाच्या शिक्षकाला इतिहासाचा आधार घ्यावा लागतो. इतिहासातील काही घटना, प्रसंग, संदर्भ शिक्षकांना माहीत असणे आवश्यक आहे. इतिहास या विषयाचा अभ्यास मराठी विषय शिकविताना पोषक ठरतो.

मराठी विषय शिकविताना जसे ऐतिहासिक संदर्भ सहजगत्या येतात तसे भूगोल या विषयातील परिस्थिती, हवामान, मानवी जीवन, पिके, पाणी, देश, भूप्रदेश आदींचे संदर्भ पाठात येतात. मराठी शिकविताना भौगोलिक संदर्भही आपणास सांगावे लागतात. मराठीत प्रवासवर्णन या वाड्.मय प्रककारांतर्गत पाठात देशाचे लोकजीवनाचे संदर्भ येतात. पर्यावरणविषयक पाठ पाठ्यपुस्तकात असतात. भूकंपावर आधारित पाठ पाठ्यपुस्तकात असतात. अशा वेळी भौगोलिक माहिती शिक्षक विद्यार्थ्यांना पुरवितात. मराठी आणि भूगोल या विषयांत असलेला सहसंबंध ध्यानात घेतला पाहिजे. याप्रमाणे अन्य समाजशास्त्रांचे संदर्भही पाठ्यपुस्तकात असतात. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांसारखे विषयही समाजाशी निगडित आहेत. त्या विषयांचा संदर्भ असलेले पाठ विद्यार्थ्यांना मराठीच्या पाठ्यपुस्तकांतून अभ्यासावे लागतात. हे विषय अधिक स्पष्टपणे मांडताना शिक्षकांना या विषयांची मदत घ्यावी लागते.

**(र) मराठी आणि विज्ञान :**

मराठी भाषांसारख्या भाषाभ्यासातून विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण व्हावा असे आपले उद्दिष्ट असते. समाजातील अपसमज, अंधश्रद्धा दूर व्हाव्यात असाही मराठी अध्यापनाच्या वेळी आपला हेतू असतो. वर्गातकाही पाठ शिकविताना शास्त्र विषयास धरून आपणास काही माहिती विद्यार्थ्यांना पुरवावी लागते. लेखकाचा त्या लेखनामागील हेतू, दृष्टिकोण स्पष्ट करावा लागतो.

वैज्ञानिक दृष्टिकोण विद्यार्थ्यांत निर्माण व्हावा या हेतूने मराठीच्या प्रत्येक पाठ्यपुस्तकात एक-दोन शास्त्रीय पाठांचा समावेश करण्यात आला आहे. शास्त्र मला माहीत नाही असे शिक्षकास म्हणून चालणार नाही. मराठी आणि शास्त्राचा (विज्ञानाचा) अन्योन्य सहसंबंध आहे. दि. व्यं. जहागीरदार यांचा ‘राधिका’, गजानन क्षीरसागर यांचा ‘उर्जाराणी’, निरंजन घाटे यांचा ‘सौरऊर्जा’, प्राणिजीवन शास्त्रविषयक माहिती देणारा प्रकाश गोळे यांचा ‘बगळा’ हा पाठ पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्यात आला आहे. मराठी अध्यापन करताना विज्ञानविषयक संदर्भ, तपशील शिक्षकांना द्यावे लागतात. यासाठी विज्ञान विषयाचा आधार घ्यावा लागतो. पाठ्यपुस्तकात शास्त्र विषयासंबंधी काही उतारे विद्यार्थ्यांना भाषांतर करून द्यावे लागतात. शास्त्रज्ञांची चरित्रे विद्यार्थ्यांना अभ्यासावयास सांगता येतील. शास्त्रातील काही संकल्पना मराठी विषयाच्या अभ्यासातून जाणून घेता आल्या तर पुढील ज्ञान मिळविणे विद्यार्थ्यांना अधिक सोपे जाईल.

**(ऱ्) मराठी आणि गणित :**

मराठी आणि गणित या विषयाचा अतिशय निकटचा संबंध आहे. मराठी भाषेतील वैचारिक लेखाचे वाचन करतांना तार्किक शक्ती, चिंतनशीलता, विविधांगी विचार क्षमता इत्यादीचा विकास मराठी व गणित विषयाच्या अभ्यासातून घडून येतो. गणित विषयातून व्यवहारीक क्षमतांचा विकास घडून येतो तर याचे उपयोजन भाषेच्या माध्यामातून केल्या जाते. वेळचे नियोजन, जीवनाचे नियोजन करतांना गणिताचा आधार घ्यावा लागतो. गणित विषयाचे अध्यापन करतांना मातृभाषेतून (मराठी) केलेले अध्यापन अत्यंत प्रभावी होवून आकलन सहज होते.

एकंदरीत शाळेत शिकविले जाणारे विविध विषय भाषा, सामाजिक शास्त्रे, गणित-विज्ञान या प्रत्येक विषयाचा दुसऱ्या विषयाशी घनिष्ठ सहसंबंध आहे. एकूण समग्र जीवन माहीत करून घेण्यास हे विविध विषय एकमेकांस पूरक आहेत. तेव्हा विषय तुटक स्वरूपात न शिकविता ते सलगपणे शिकविले गेले पाहिजेत. विषयांतील सहसंबंध विद्यार्थ्यांना समजले तर त्या विषयांतील कौशल्ये अन्य विषयात उपयोगी पडतात व जीवनाचे सम्यक दर्शन घडू शकते.

## 1.3 सारांश :

भाषा ही मानवी जीवनाचे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. भाषेमुळे मानवी व्यवहार सुरळीत पार पडतात. भाषेचा अर्थ व उत्पती आणि स्वरूपावरून आपल्याला भाषेचा इतिहास माहित पडतो त्याच प्रमाणे भाषेचे वैशिष्ट्ये, तत्वे, भाषेचा इतर विषयाशी असलेला संबंध यांची माहिती प्राप्त होते. भाषेचे मानवी जीवनात व अभ्यासक्रमात स्थान व महत्त्व किती आवश्यक आहे या घटकावरून लक्षात येते.

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

1. भाषा म्हणजे काय ? भाषेचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा ?
2. भाषेचा अर्थ व उत्पत्ती यांची संक्षिप्त माहिती स्पष्ट करा ?
3. भाषेची वैशिष्ट्ये कोणती ? त्यापैकी कोणतीही दोन वैशिष्ट्ये स्पष्ट करा ?
4. भाषेचे प्रकार थोडक्यात स्पष्ट करा ?

## 1.4 आपल्या प्रगतीच्या पडताळणीकरिता अपेक्षित उत्तरे :

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

**उत्तर :** मुद्दा क्र. 1.2 अभ्यासा.

## 1.5 कार्य वितरण :

मराठी विषयांचा इतर विषयाशी सहसबंध स्पष्ट करा ?

## 1.6 कार्य :

भाषा शिक्षणाची तत्वे सविस्तर स्पष्ट करा ?

## 1.7 प्रकरण अभ्यास (केस स्टडी) :

मराठी भाषेचे जीवनातील व अभ्यासक्रमातील स्थान व महत्त्व सविस्तर स्पष्ट करा ?

## 1.8 संदर्भ पुस्तके :


- अकोलकर, ग. वि. आणि पाटणकर, ना. वि., (1970), “मराठीचे अध्यापन”, पुणे, व्हीनस प्रकाशन.
- इंदुरकर, कल्याणी, (1998), “मराठीचे अध्यापन”, नागपूर, मंगेश प्रकाशन.
- करंदीकर, सुरेश आणि मंगरुळकर, मीना, (2004), “मराठी –आशय अध्यापन पद्धती”, पुणे, फडके प्रकाशन.
- कुंडले, म. बा., (1974), “मराठीचे अध्यापन”, पुणे, विद्या प्रकाशन.
- घोरमोडे, कला, (2008), “मराठी अध्यापन पद्धती”, नागपूर, विद्या प्रकाशन.
- पवार, ना. ग., (2006) “मातृभाषा मराठीचे आशययुक्त अध्यापन”, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.

## घटक 2 : भाषा कौशल्य

**भाषा कौशल्य (श्रवण, भाषण, वाचन, लेखन), भाषा कौशल्याच्या (श्रवण) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन, भाषा कौशल्याच्या (भाषण) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन, भाषा कौशल्याच्या (वाचन) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन, भाषा कौशल्याच्या (लेखन) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन.**

### घटक रचना

**2.0 घटक परिचय**
**2.1 शिक्षणाचे उद्देश**
**2.2 विषय विश्लेषण**
**2.2.1 भाषा कौशल्य (श्रवण, भाषण, वाचन, लेखन)**
**2.2.2 भाषा कौशल्याच्या (श्रवण) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन**
**2.2.3 भाषा कौशल्याच्या (भाषण) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन**
**2.2.4 भाषा कौशल्याच्या (वाचन) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन**
**2.2.5 भाषा कौशल्याच्या (लेखन) अभिव्यक्तीचे महत्त्व, उद्दिष्ट, विकासाचे उपक्रम, मूल्यमापन**
**2.2.3 मूल्यमापन**
**2.3 सारांश**
**2.4 आपल्या प्रगतीच्या पडताळणीकरिता अपेक्षित उत्तरे**
**2.5 कार्य वितरण**
**2.6 कार्य**
**2.7 प्रकरण अभ्यास (केस स्टडी)**
**2.8 संदर्भ पुस्तके**

### 2.0 घटक परिचय

प्रामुख्याने श्रवण, भाषण, वाचन व लेखन ही भाषा विषयाची प्रमुखक्षेत्रे असून त्यांचा विकास दैनदिन अनुभवातून सतत होत असतो. श्रवण हे भाषा शिकविण्याचे सर्वात महत्त्वाचे क्षेत्र आहे. म्हणून नवीन भाषा शिकतांना आपण ती भाषा जास्तीत जास्त ऐकतो. शालेय जीवनात देखील भाषा विकासाला अनन्य साधारण महत्त्व आहे.

## 2.1 शिक्षणाचे उद्देश

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला पुढील कौशल्यात व क्षमतेत समर्थ होता येईल.
1. श्रवणाची उदिष्ट्ये व क्षमता अवगत करणे.
2. श्रवण क्षमतेच्या विकासाचे उपक्रम आयोजित करणे.
3. भाषणाची उदिष्ट्ये व क्षमताचे ज्ञान प्राप्त करणे.
4. भाषण विकासासाठी उपक्रम आयोजित करणे.
5. वाचनाचे विविध प्रकार व पद्धतीचे ज्ञान प्राप्त करणे.
6. वाचनाचे महत्त्व व उदिष्ट्ये, वाचनदोष व उपाय याचे ज्ञान प्राप्त करणे.
7. लेखन क्षमतेचे ज्ञान प्राप्त करणे.
8. लेखन क्षमतेचे उद्देश व विकास उपक्रमाचे ज्ञान प्राप्त करणे.

## 2.2 विषय विश्लेषण

### 2.2.1 भाषा कौशल्य

#### 2.2.1.1 मराठी विषयाची क्षेत्रे व क्षमता :

क्षमताधिष्ठित प्राथमिक अभ्यासक्रमानुसार मराठी विषयाची एकूण 9 क्षेत्रे निश्चित करण्यात आली आहे. ठराविक आशयाचे एकत्रीकरण करून एक क्षेत्र, याप्रमाणे मराठी विषयाच्या 9 क्षेत्रांमध्ये आशय एकवटला आहे. प्रत्येक इयत्तेमध्ये, प्रत्येक क्षेत्रामध्ये विद्यार्थ्याला कोणत्या बाबी आल्या पाहिजेत हे दर्शविणाऱ्या क्षमता निश्चित केल्या आहेत. मराठी भाषेची 9 क्षेत्रे खालीलप्रमाणे आहेत.

1. श्रवण
2. भाषण
3. वाचन
4. लेखन
5. आकलन
6. कार्यात्मक आकलन
7. स्वयं अध्ययन
8. भाषेचा व्यवहारात उपयोग
9. शब्द संपत्तीवर प्रभूत्व

### 2.2.2 श्रवण कौशल्य

कानाद्वारे विविध ध्वनी ऐकता येणे म्हणजे श्रवण नव्हे. तर श्रवण या क्रियेत, ऐकणे, त्याचा अर्थ समजणे व समजलेल्या अर्थाविषयी स्वत:ची प्रतिक्रिया निर्माण होणे, इत्यादी बाबींचा समावेश असतो. ऐकण्याची क्रिया कान या ज्ञानेंद्रियाकडून होते. कान आवाज ध्वनी ग्रहण करून मेंदूकडे पाठवतो. मेंदू त्या ध्वनींचे

वर्गीकरण व विश्लेषण करून त्या ध्वनींना निश्चित अर्थ प्राप्त करून देतो. त्या प्राप्त झालेल्या अर्थाविषयीच्या प्रतिक्रिया मनात निर्माण होतात. या सर्व प्रक्रिया म्हणजेच श्रवण होय.

**श्रवणाची अंगे :**

श्रवण कौशल्य विकासांच्या सर्व अंगाचा विकास म्हणजेच श्रवण कौशल्याचा परिपूर्ण विकास होय. या अंगाचा विकास विद्यार्थ्यांमध्ये टप्प्या-टप्प्याने होतो. श्रवण कौशल्य विकासाची अंगे पुढीलप्रमाणे आहेत-

1. लक्षपूर्वक ऐकणे.
2. संदर्भ लक्षात घेऊन ऐकणे.
3. ध्वनींचे विश्लेषण करणे.
4. शब्दांचा परस्पर संबंध लक्षात घेणे.
5. शब्दसमूहाचा अर्थ लावणे.
6. मुख्य मुद्दे ग्रहण करणे.
7. वाच्यार्थ, लक्ष्यार्थ व ध्वन्यार्थ ग्रहण करणे.
8. भाषा व शैली सामर्थ्य लक्षात घेऊन अर्थ ग्रहण करणे.
9. भाषेतील चुका व विशिष्ट सवयी लक्षात घेणे.
10. ऐकलेल्या मजकुरानुसार विचारपूर्वक प्रतिसाद देणे.

**श्रवणाचे महत्त्व :**

श्रवण ही भाषिक विकासाचची पहिली पायरी आहे. कारणा श्रवण या कौशल्याच्या विकासातून भाषण, वाचन व लेखन या कौशल्याचा क्रमाने विकास होतो. या चार कौशल्यांचा विकास म्हणजेच भाषिक विकास होय. त्यामुळे श्रवण हा भाषा विकासाचा पाया ठरतो. भाषा विकास अनुकरणावर अवलंबून असतो. पूर्वप्राथमिक व प्राथमिक स्तरावर मुलाला जे ऐकायला मिळते त्यातूनच त्याचा भाषा विकास होत असतो. कोणतीही भाषा अवगत होण्यासाठी ती सतत कानावर पडावी लागते. मुलाला भाषा ऐकायला मिळाली नाही तर तो बालू शकणार नाही, भाषा समजू शकणार नाही. लहान मुले जितक्या जास्त प्रमाणात ऐकतील तितक्या प्रमाणात त्यांची ग्रहणक्षमता व आकलन क्षमता वाढेल. त्यांच्या विचारशक्तीचा विकास होईल.

**श्रवणाची सर्वसामान्य उद्दिष्टे :**

श्रवण म्हणजे अर्थपूर्ण ऐकणे. हे श्रवण का केले जाते याची वेगवेगळी उत्तरे आहेत. याचा अर्थ श्रवणाचे अनेक हेतू आहेत. सर्वसाधारणपणे श्रवणाचे उद्दिष्टये खालीलप्रमाणे सांगता येतात.

**1) ज्ञानप्राप्ती :**

श्रवण करून ज्ञान मिळवणे हा श्रवणाचा प्रमूख हेतू आहे. बरेचसे ज्ञान हे श्रवणाद्वारे प्राप्त होते. वर्ग अध्यापनात शिक्षकांच्या स्पष्टीकरण, कथन, वर्णन इत्यादी कृतींचे विद्यार्थ्यांनी केलेले श्रवण, रेडिओ व

दूरदर्शनवरील बातम्यांचे श्रवण, व्याख्यानाचे श्रोत्यांनी केलेले श्रवण. इत्यांदीच्या श्रवणातून श्रवण करणाऱ्याला ज्ञानप्राप्ती होत असते.

**2) मनोरंजन/ आनंदप्राप्ती:**

ज्ञानप्राप्तीप्रमाणे आनंदप्राप्ती हा सुद्धा श्रवणाचा हेतू आहे. अनेक प्रकारच्या श्रवणातून श्रवण करणाऱ्याचे मनोरंजन होत असते. गाणी, सुरेल कविता जितक्या वेळा श्रवण केल्या जातात. तितक्या वेळा श्रवणातील आनंद वाढत जातो. कथा, नाटक यांच्या श्रवणातून मनोरंजन होते.

**(आ) विश्लेषण व वर्गीकरण करणे :**

हे श्रवणाचे महत्त्वाचे शालेय उद्दिष्ट आहे. श्रवण ही केवळ शारीरिक क्रिया नाही तर ती मानसिक क्रियाही आहे. कानाद्वारे ग्रहण केलेल्या ध्वनींचे मेंदू द्वारे विश्लेषण होऊन त्याचे वर्गीकरण केले जाते. मराठी आपली मातृभाषा असल्यामुळे श्रवणात येणाऱ्या मराठी ध्वनींचे विश्लेषण व वर्गीकरण नकळत घडते. परंतु इंग्रजी भाषेतील संवाद श्रवण करताना विश्लेषण व वर्गीकरणाची प्रक्रिया आपणास प्रकर्षाने जाणवते.

**(इ) आकलनशक्तीचा विकास करणे :**

श्रवणातून अर्थग्रहण होते. या अर्थग्रहणाच्या क्रियेतून श्रवण करणाऱ्यांच्या आकलनशक्तीचा विकास होतो. श्रवणाद्वारे जे ऐकले त्याचा अर्थबोध होऊन त्याचे पूर्ण आकलन झाले पाहिजे. त्यामुळेच विद्यार्थ्यांना अर्थग्रहण करण्याची सवय लावणे व त्याच्या आकलनशक्तीचा विकास करणे हे श्रवणाचे महत्त्वाचे शालेय उद्दिष्ट्ये मानले आहे.

**(ई) सर्जनशीलता : नवनिर्मिती :**

अर्थपूर्ण श्रवण हे नवनिर्मितीस चालना देत असते. नाटकाचे श्रवण नाटयलेखनास प्रवृत्त करते. चांगल्या गीतांचे श्रवण गीत गाण्यास प्रवृत्त करते. उत्कृष्ट कथांचे श्रवण कथालेखनास प्रवृत्त करते. चांगल्या भाषाशैलीचे श्रवण स्वत:ची भाषाशैली निर्माण करते. म्हणी, वाक्प्रकार, सुभाषिते यांचे श्रवण त्यांचा वापर भाषणात, लेखनात करण्यास प्रवृत्त करते. विद्यार्थ्यांकडून काही नवीन निर्माण व्हावे अशी अपेक्षा असेल तर विद्यार्थ्यांना चांगल्या कलाकृती ऐकविल्या पाहिजेत.

**(उ) भाषा अभ्यासाची पूर्वतयारी :**

भाषेचा अभ्यास म्हणजेच भाषण, वाचन व लेखन होय. श्रवण या कौशल्यातूनच भाषण, वाचन व लेखन ही कौशल्य विकसित होतात. त्यामुळे भाषा अभ्यासाची पूर्वतयारी म्हणून पूर्व प्राथमिक व प्राथमिक शालेय स्तरावर श्रवणाला महत्त्व दिले आहे. या स्तरावरील विद्यार्थ्यांना श्रवणाच्या जास्त संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

**सहेतूक श्रवण :**

एका संशोधनात असे दिसून आले की, विद्यार्थ्यांचा एकूण शालेय वेळेपैकी 45% वेळ ऐकण्यात, 30% बोलण्यात, 16% वाचण्यात व 9% लिहिण्यात जातो. याचा अर्थ एकूण शालेय वेळेपैकी जवळपास अर्धा

वेळ विद्यार्थी फक्त श्रवण करतात. हे सर्व श्रवण हेतुपूर्वक केले गेले तर विद्यार्थ्यांच्या श्रवण सामर्थ्यात वाढ होईल. श्रवणाचे अनेक हेतू असतात. उदा. गाणी ऐकण्यापाठीमागे शब्दोच्चार, आवाजातील चढ उतार, नादमाधूर्य या बाबी लक्षात याव्यात हा हेतू असतो. नवीन अपरिचित शब्दांच्या श्रवणातून शब्दसंपत्तीचा विकास व्हावा हा हेतू असतो. गोष्टी, कथा यांच्या श्रवणातून त्यातील बोध आकलन व्हावा हा हेतू असतो. वर्णन, कथाकथन, वादविवाद इत्यादी भाषणांचे प्रकार विद्यार्थ्यांना श्रवण करायला लावण्यापाठीमागे विद्यार्थ्यांनाही ते भाषणाचे प्रकार करता यावे हा हेतू असतो. वर्गाध्यापनात कथन, स्पष्टीकरण या शिक्षक कृतीच्या श्रवणातून विद्यार्थ्यांना आशयाचे आकलन व्हावे हा हेतू असतो. इतकेच नव्हें तर लहान मुलाने जे ऐकले त्याचे अनुकरण करून बोलावे हा हेतू असतो. श्रवण ही भाषा अभ्यासाची पूर्वतयारी असते. त्यामुळेच ते सहेतूक असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी केलेले श्रवण सहेतूक व्हावे याची शिक्षकांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

**श्रवण क्रियेसंबंधीचे शिष्टाचार :**

श्रवण करणाऱ्या व्यक्तींनी श्रवण करताना पुढील शिष्टाचार पाळावेत.

1. बोलणाऱ्या व्यक्तीचे बोलणे लक्षपूर्वक व शांतपणे ऐकावे.
2. बोलणारा व्यक्ती बोलत असताना मध्येच बोलणे, एकमेकांत कुजबूज करणे इत्यादी कृती न करणे.
3. बोलणाऱ्या व्यक्तीविषयी आदर बाळगणे. बोलणाऱ्याकडे तुच्छतेने पाहणे, अपशब्द वापरणे, टोमणे मारणे इत्यादी अनादर दर्शविणाऱ्या कृती न करणे.
4. श्रवण करणाऱ्याने दुसरीकडे, पाठीमागे न पाहता बोलणाऱ्याकडे पाहावे.
5. बोलणाऱ्या व्यक्तीच्या बोलण्यास प्रतिसाद देणे. उदा. प्रसंगानुसार चेहऱ्यावर हावभाव आणणे, टाळ्या वाजविणे इत्यादी.
6. श्रवण करणाऱ्याने आळस देणे, जांभया देणे, मध्येच उठून जाणे इत्यादी कृतीन करणे.
7. आवश्यक व शक्य असल्यास ऐकताना महत्त्वाचे मुद्दे लिहून घेणे.
8. बोलणाऱ्याचे बोलणे संपल्यावर त्याचे आभार मानणे.

**श्रवणदोष व उपाय :**

श्रवण ही ‘शरीर-मानस’ प्रक्रिया आहे. श्रवणदोष निर्माण होण्यास शारीरिक व मानसिक दोष कारणीभूत असतात. कानाचे आजार, बहिरेपणा या शारीरिक दोषामुळे निर्माण होणाऱ्या श्रवणदोषावर वैद्यकीय उपाय प्रभावी असतात. पण मानसिक कारणामुळे निर्माण होणाऱ्या श्रवणदोषांचे निराकरण शिक्षक करू शकतो. ते श्रवणदोष पुढीलप्रमाणे आहेत.

**1) अर्थहीन श्रवण (अश्रवण) :**

श्रवण करत असताना अवधान स्थिर नसणे, कानाने ऐकूनही न ऐकणे, ऐकलेल्याचे भान नसणे, श्रवणासाठी फक्त शारीरिक उपस्थिती असणे, मन दुसरीकडे भटकत असणे, यामुळे ऐकलेल्याचा अर्थबोध होत नाही. याला अर्थहीन किंवा अश्रवण म्हणतात.

**2) अर्धश्रवण :**

श्रवण करत असताना जितका वेळ श्रवणात लक्ष असेल तितकेच समजते. लक्ष विचलित झाले की श्रवणातील शब्दातील काही अक्षरे ऐकली जात नाहीत. उदा. 'बंदर' या शब्दऐवजी 'बंद' एवढेच ऐकले जाते. त्याचप्रमाणे वाक्यातील काही शब्द ऐकण्यातून सुटतात. उदा. 'मी त्याला मारले नाही' ऐवजी 'मी त्याला मारले' असे श्रवण होते. याप्रकारे पूर्णार्थाने जेव्हा श्रवण होत नाही त्याला अर्धश्रवण म्हणतात.

**3) अशुद्ध श्रवण (अपश्रवण) :**

बोलणारा बोलतो एक व श्रवण करणारा ऐकतो वेगळे, बोलणाऱ्या व्यक्तीच्या बोलण्यात आलेल्या शब्दाऐवजी, शब्दातील अक्षरांऐवजी चुकीचे शब्द, चुकीची अक्षरे ऐकली जातात. उदा. 'मला' ऐवजी 'माला', 'खडू' ऐवजी 'कडू', 'राम' ऐवजी 'रान' इत्यादी. जेव्हा शुद्ध श्रवण होत नाही त्याला अशुद्ध श्रवण (अपश्रवण) म्हणतात.

**विद्यार्थ्यांचे श्रवणदोष निराकरणासाठी उपाय :**

1. विद्यार्थ्यांना अवधान केंद्रीकरण करण्याची सवय लावणे.
2. श्रवण करते वेळी वातावरण शांत ठेवणे.
3. विद्यार्थ्यांना एका वेळी एकानेच बोलण्याची व इतरांनी ते बोलणे पूर्णपणे ऐकण्याची सवय लावणे.
4. श्रवणदोष निर्माण होण्यास बोलणाराही जबाबदार ठरतो. त्यामुळे त्याने बोलताना स्पष्ट व शुद्ध उच्चार, पुरेसा मोठा आवाज, बोलण्याची गती इत्यादींची दक्षता घ्यावी.
5. विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढविणे ज्यामुळे अर्थहीन व अर्धश्रवण होणार नाही.
6. शिक्षकाचे किंवा बोलणाऱ्यांचे बोलणे कंटाळवाणे नसावे. ते रंजक व आकर्षक असावे.
7. श्रवणदोष दूर करण्यासाठी रेडियो, टेपरेकॉर्डर इत्यादी श्राव्य साधनांचा वापर करणे.
8. श्रवणातील महत्त्वाचे मुद्दे वहीत लिहून घेण्याची विद्यार्थ्यांना सवय लावणे.

**श्रवण विकासाचे उपक्रम (अध्ययन अनुभव) :**

श्रवण क्षेत्रातील क्षमता विकसित करण्यासाठी व त्या क्षमता विद्यार्थ्यांला प्राप्त होण्यासाठी पुढील उपक्रमांच्या माध्यमातून अध्ययन अनुभव देता येतात.

1. बडबडगीते, गाणी, कविता गाऊन दाखविणे.
2. विद्यार्थ्यांच्या वयानुसार गोष्टी, कथा सांगणे.
3. संवाद, नाट्यउतारे यांचे प्रकटवाचन करणे.
4. संवाद, छोटी नाटय यांचे सादरीकरण करून ते विद्यार्थ्यांना श्रवण करायला लावणे.
5. विद्यार्थ्यांना हेतुपूर्वक सूचना देणे. या सूचना वैयक्तिक व सामूहिकरित्या देणे.
6. शिक्षकाने वर्णन,कथन या तंत्राचा वापर श्रवण विकासासाठी करणे.
7. विद्यार्थ्यांना वर्णन, कथन, सोपी भाषणे करण्याची संधी देऊन ते इतर विद्यार्थ्यांना श्रवण करायला लावणे.

8. शिक्षकाने उताऱ्यांचे प्रभावी प्रकटवाचन करणे. एका एका विद्यार्थ्यांकडून प्रकटवाचन करून घेणे व इतर विद्यार्थ्यांना ते श्रवण करण्याची संधी देणे.
9. वादविवाद, चर्चा घडवून आणणे व ते श्रवण करण्याची संधी देणे.
10. गाण्यांच्या भेंडया, बालसभेचे आयोजन, म्हणी व वाक्प्रचार यांचा उपयोग इत्यादींचे आयोजन करणे.
11. रेडिओ, टेपरेकॉर्डर इत्यादी श्राव्य साधनांचा वापर करणे. उदा. रेडिओवरील बातम्या, बालमित्रांसाठीचे कार्यक्रम, शै. कार्यक्रम, टेपरेकॉर्डवर गाणी, कविता, नाटयछटा इत्यादींचे श्रवण करण्याची संधी देणे.

**श्रवणाचे मूल्यमापन व श्रवण मूल्यमापनाची तंत्रे :**

विद्यार्थ्यांनी श्रवण या क्षेत्रातील क्षमता किती संपादन केलेल्या आहेत हे पाण्यासाठी खालील तंत्राचा वापर केला जातो.

**ध्वनी ओळखणे :**

या मूल्यमापन तंत्रात विद्यार्थ्यांना श्रवणासाठी काही शब्द दिले जातात. विद्यार्थ्यांच्या ध्वनिज्ञानाचे मूल्यमापन केले जाते.

उदा. अ) प्रश्न - शब्द ऐका व शब्दातील समान ध्वनी ओळखा ?

रमन, नमन, कविता, सविता

ब) प्रश्न – शब्द ऐका व ‘क’ ध्वनी असलेला शब्द सांगा ?

पतंग, कमळ, रतन

**ध्वनिभेद करणे :**

विद्यार्थ्यांच्या ध्वनीतील फरक ओळखण्याच्या क्षमतेचे मूल्यमापन या तंत्राद्वारे केले जाते.

उदा. अ) शब्द ऐका व दीर्घ ईकार-ऊकार ओळखा ?

दीन, दिन, सूर, सुर

ब) शब्द ऐका व ‘प’ ध्वनी नसलेले शब्द सांगा ?

नयन, पलंग, विमल, पतंग

**शब्दसंपत्ती :** श्रवणातून शब्दसंग्रहाचे मूल्यमापन तंत्र

उदा. अ) शब्द ऐका व त्याचे समानार्थी शब्द सांगा ?

आई, वडील

ब) शब्द ऐका व त्याचे विरुद्धार्थी शब्द सांगा ?

मित्र, विजय

**वाक्यरचना :** श्रवणातून वाक्यरचनेच्या ज्ञानाचे मूल्यमापन तंत्र

उदा. वाक्य ऐका व वाक्यातील दोष सांगा ?

ती मुलीचे नाव शीला आहे.

**आकलन :** श्रवणातून आकलन मूल्यमापन तंत्र

उदा. एखादा उतारा विद्यार्थ्यांना श्रवण करायला लावून प्रश्न विचारणे.

**नोंदी व पडताळा सूची :**

वरील श्रवण मूल्यमापनाच्या तंत्राद्वारे मिळालेली विद्यार्थ्यांच्या श्रवण कौशल्याची प्रगती शिक्षकाने नोंदवून त्याची पडताळा सूची तयार करावी.

**श्रवण (पडताळा सूची)**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाम | ध्वनी ओळखणे | ध्वनिभेद करणे | शब्दसंपत्ती | वाक्यरचना | आकलन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अ, ब, क | ओळखतो | करतो | समानार्थी ओळखतो | ओळखतो | योग्य |
| 2 | ब, क, ड | ओळखत नाही | करता येत नाही | विरुद्धार्थी ओळखत नाही | ओळखता येत नाही | अयोग्य |

### 2.2.3 भाषण कौशल्य

कानाने ऐकणे म्हणजे श्रवण नव्हे त्याचप्रमाणे तोंडाला येईल ते बोलणे म्हणजे भाषण नव्हे. भाषण म्हणजे बोलणाऱ्याच्या शब्दातून त्याच्या स्वत:च्या मनोवृत्तीचे व विचारांचे अर्थपूर्ण प्रकटीकरण होय. प्रत्येक व्यक्तीला काहीतरी सांगायचे असते. त्या सांगण्यातून त्याला मनोगत व्यक्त करायचे असते, भावना प्रकट करायच्या असतात, विचार मांडायचे असतात. हे सांगणे किंवा बोलणे म्हणजेच भाषण होय.

**भाषणाची अंगे :**

'भाषण' या क्रियेची अनेक अंगे आहेत. या सर्व अंगांचा विकास म्हणजेच भाषण कौशल्याचा विकास होय. भाषणाची अंगे पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**1) उच्चार :**

भाषण म्हणजे अर्थपूर्ण बोलणे. हे बोलणे बहुतांशी दूसऱ्यासाठी असते. ते दुसऱ्याना समजले पाहिजे. त्यामुळे उच्चार हे शुद्ध आणि स्पष्ट असावे लागतात. प्रत्येक वर्णांचा, शब्दांचा उच्चार अचूक असला पाहिजे.

**2) विराम :**

बोलतांना श्वास घेण्यासाठी थांबणे आवश्यक असते. हा विराम विरामचिन्हांच्या ठिकाणी घ्यावा लागतो. प्रत्येक विरामाला एक अर्थ प्राप्त असतो.

**3) स्वराघात :**

बोलतांना अर्थाच्या दृष्टीने विशिष्ट वर्णांवर किंवा शब्दावर दिला जाणारा आघात महत्वाचा असतो. स्वराघात आवश्यक त्या ठिकाणी दिला नाही तर बोलण्याचा अर्थ बदलू शकतो.

**4) आवाजातील चढ उतार :**

एखाद्या चित्राचा परिणाम त्याच्या रंगाच्या कमी-जास्त गडदपणात होतो. एखादया गाण्याचा परिणाम त्याच्या कोमल – तीव्र स्वरात होतो. त्याचप्रमाणे भाषणाचा परिणाम त्याच्या आवाजातील चढ-उतारात होतो . आवाजातील चढ-उतार हा बोलण्याच्या आशयावर असतो. आवाजातील चढ-उतारामुळेच त्या आशयाची परिणामकारकता वाढते.

**5) गती व उंची :**

बोलण्याची गती ही योग्य असली पाहिजे. अति वेगवान गती किंवा अति संथ गती हानीकारक असते. बोलण्याच्या आशयानुसार गतीचा वापर करावा लागतो. त्याचप्रमाणे आशयाच्या मागणीनुसार आवाजाला उंची द्यावी लागते.

**भाषणांची उद्दिष्टये :**भाषणाची दोन प्रकारे उद्दिष्ट्ये ठरवता येतात.

1. भाषणाचे सर्वसामान्य किंवा व्यावहारिक उद्दिष्ट्ये व
2. भाषणाची शालेय किंवा शैक्षणिक उद्दिष्ट्ये.

**अ) भाषणाची सर्वसामान्य / व्यावहारिक उद्दिष्ट्ये :**

सर्वसामान्यपणे किंवा व्यवहारात भाषण करण्याचे अनेक हेतू आहेत. या सर्व उदिदष्टांचा आढावा घेतल्यास भाषणाचे मानवी जीवनातील महत्त्व सुद्धा स्पष्ट होते. ही सर्वसामान्य किंवा व्यावहारिक उद्दिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**1) आत्मविष्कार :**

स्वत:चे मनोगत, मनातील भावना, कल्पना, विचार योग्य शब्दातून व्यक्त करणे म्हणजे आत्मविष्कार होय. हा आत्मविष्कार प्रत्येक व्यक्तीची गरज असते. प्रत्येकाला व्यक्त होणे आवडत असते. त्यामुळे भाषण हे आत्मविष्काराचे प्रभावी साधन आहे.

**2) आनंदप्राप्ती व मन:शांती :**

स्वत:चे विचार, कल्पना श्रोत्यांसमोर मांडून वक्त्यालाही आनंद प्राप्त होत असतो. आपल्या आनंदाचे अनुभव दुसऱ्यांना सांगण्यामुळे आनंद द्विगुणीत होत असतो. त्याचप्रमाणे आपल्या मनाला टोचणारे-बोलणारे, अनुभव, प्रसंग दुसऱ्यांना सांगून त्याद्वारे आपले मन मोकळे करणे व मन:शांती प्राप्त करणे. याप्रमाणे आनंदप्राप्ती व मन:शांतीसाठी भाषणाचा वापर केला जातो.

**3) स्वमताचा प्रचार :**

आपले जे मत आहे, विचार आहेत. ते किती योग्य आहेत,ते विचार इतरांनीही मान्य करावेत म्हणून भाषणाद्वारे ते विचार इतरांपुढे प्रभावीपणे मांडले जातात व स्वत:च्या मताचा प्रचार केला जातो.

**4) सर्जनशीलता :**

बोलताना काहीतरी नवनिर्मिती होत असते. ही नवनिर्मिती शब्दांच्या उच्चारातून, शब्दांच्या वापरातून, बोलण्याच्या शैलीतून, विषय मांडण्याच्या पद्धतीतून घडत असते. म्हणून बोलणारा आपले भाषण आकर्षक, मनोरंजक व प्रभावी होईल यादृष्टीने बोलत असतो.

### 5) सामाजिक आंतरक्रिया :


समाजामध्ये व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात. प्रत्येकाचे विचार वेगवेगळे असतात. प्रत्येकाच्या विचाराचा एकमेकांशी मेळ घालणे. एकमेकांत विचारांची ‘देवाणघेवाण’ घडवण्याचे कार्य भाषणाद्वारे केले जाते.

### ब) भाषणाची शैक्षणिक/ शालेय उद्दिष्टये :

आपण यापूर्वी भाषणाची सर्वसामान्य उद्दिष्टये पाहिली. भाषणाची शैक्षणिक उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

1. विद्यार्थ्यांना शुद्ध व स्पष्ट उच्चार करता येणे.
2. विद्यार्थ्यांना योग्य ठिकाणी आघात व विराम घेता येणे.
3. विद्यार्थ्यांना आवाजात योग्य चढ उतार ठेवून बोलता येणे;
4. विद्यार्थ्यांना योग्य गती ठेवून बोलता येणे.
5. विद्यार्थ्यांना बोलतांना योग्य शब्दांची निवड करता येणे.
6. विद्यार्थ्यांना आपले भावविचार सुसंगतपणे मांडता येणे.
7. विद्यार्थ्यांना सहजपणे, धीटपणे व आत्मविश्वासाने बोलता येणे.

**भाषणाचे प्रकार :** भाषणाचे प्रकार खालीलप्रमाणे सांगता येतात.




### अ) अनौपचारिक भाषण :

बोलण्याला हेतू, नियमबद्धता, शास्त्रशुद्धता नसणे, विषय, वेळ व स्थळांचे बंधन नसणे, मनावर दडपण न आणता मनमोकळेपणे बोलणे म्हणजे अनौपचारिक भाषण होय.अनौपचारिक भाषणाचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

**1) कौटुंबिक संवाद :**

कुटुंबातील लहान मुलापासून ते वृद्धापर्यंतच्या सर्व बोलण्याचा समावेश यात असतो. घरगुती चर्चा, आज्ञा, सूचना, विनंती, विनोद इत्यादी कौटुंबिक संवादाचा यात समावेश असतो.

**2) गप्पागोष्टी :**

मित्रा-मित्रांमध्ये, समवयस्कांमध्ये गप्पागोष्टी होत असतात. गप्पागोष्टींना वेळेचे, विषयाचे तसेच स्थळाचे बंधन नसते. एकमेकांची खुशाली विचारणे, सुख दु:खे सांगणे, मनोविनोद करणे, आनंदाचे क्षण वाढविणे इत्यादींचा समावेश गप्पागोष्टी या प्रकारात होतो.

**3) संदेशवहन :**

आपले बोलणे कोणालाही कळू नये. ते बोलणे फक्त समवयस्क मित्रांना, गटांना त्यांचा अर्थ कळावा म्हणून विशिष्ट पद्धतीने बोलले जाते. उदा. गुप्तहेरांची भाषा, सांकेतिक भाषा इत्यादी.

**ब) औपचारिक भाषण :**

शास्त्रशुद्ध, नियमबद्ध, रचनात्मक व सहेतूक भाषण म्हणजे औपचारिक भाषण होय. औपचारिक भाषणाचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**1) वर्णन :**

आपण अनुभवलेली एखादी व्यक्ती, वस्तू, प्रसंग, प्रवास, निसर्गइत्यादींचा अनुभव अप्रत्यक्षरित्या दुस-यांना देणे म्हणजे वर्णन होय. वर्णन हे सजीव, स्वाभाविक, हुबेहूब व प्रभावी असले पाहिजे.

**2) निवेदन :**

निवेदन म्हणजे जाणून घेऊन सांगणे. निवेदन वाचून दाखविता येते व सांगताही येते. निवेदन हे प्रमाणीत भाषेत असते. निवेदनात निवेदकाला आपल्या भावना व्यक्त करता येत नाहीत. घटनेचे अलिप्तपणे निवेदन केले जाते. उदा. रेडिओ, दूरदर्शनवरील बातम्या.

**a. चर्चा :**

एखादया विषयाचे निरनिराळे पैलू चर्चेद्वारे उलगडून दाखविले जातात. चर्चेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला बोलावेही लागते व ऐकावेही लागते. एकमेकांचे विचार समजून घेणे, नेमकेपणाने आपले विचार मांडणे इत्यादी बाबींचा चर्चेत समावेश होतो. चर्चा म्हणजे वादविवाद नव्हे तर चर्चेतून समस्या निराकरणाचे उत्तर मिळू शकते.

**b. व्याख्यान :**

सभेत, लहान-मोठया व्यक्तींच्या समूहाला उद्देशून केलेल्या भाषणास व्याख्यान म्हणतात. व्याख्यानातून वक्ता हा एकाच वेळी अनेक श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत असतो. व्याख्यान हे मनोरंजक, प्रभावी व परिणामकारक असले पाहिजे. व्याख्यान करणा-याला समोरच्या श्रोत्यांचे मानसशास्त्र जाणता आले पाहिजे. ज्या विषयावर बोलायचे त्याची सखोल माहिती असली पाहिजे व तो विषय सोपा करून सांगता आला पाहिजे

**c. वादविवाद :** या भाषण प्रकारात विषयाशी अनुकूल व प्रतिकुल असे दोन पक्ष भाग घेत असतात. कोणत्याही विषयाला दोन बाजू असतात. उदा.'दूरदर्शन शाप की वरदान' दोन्ही पक्ष आपआपल्या मतांचे समर्थन करतात.

त्यासाठी तर्कसंगत विचार, ते पटविण्यासाठी उदाहरणे व दाखल्यांचा वापर करतात. त्याचप्रमाणे दुसऱ्या पक्षाचे मत खंडण करतात.

**d. कथाकथन :**

सहज व हुबेहूब गोष्ट सांगणे म्हणजे कथाकथन होय. कथाकथन जिवंत वाटले पाहिजे. कथेतील घटना, पात्रे ऐकणाऱ्यासमोर स्पष्ट उभ्या राहिल्या पाहिजेत. कथाकथन करताना भाषेचा ओघ, आवाजात चढ उतार, स्वराघात, चेहऱ्यावर हावभाव इत्यादी गोष्टींना महत्त्व दयावे लागते.

**e. स्पष्टीकरण :**

व्याख्या, संज्ञा, संकल्पना, तत्त्वे, नियम, घटनेमागील कारणे इत्यादी अवघड भागांचे स्वरूप स्पष्ट करून दाखविणे म्हणजे स्पष्टीकरण होय. स्पष्टीकरणात सोप्या शब्दांचा वापर असतो, मुद्यांची क्रमवार मांडणी केलेली असते.

**f. संवाद :**

नाटकातील संभाषणाला संवाद असे म्हणतात. पात्रांच्या या संवादातूनच नाटकाचे कथानक, पात्रांचे स्वभावचित्र स्पष्ट होते. या संवादाच्या उच्चारात स्पष्टता व शुद्धता, आवाजात चढ उतार, स्वराघात असला पाहिजे. या संवादफेकीतून नाटकातील भाव-भावना जिवंत झाल्या पाहिजेत.

**g. मुलाखत :**

दोन व्यक्ती मुलाखतीत एकमेकांशी बोलत असतात. मुलाखत ही राजकीय, सामाजिक, कला, क्रीडा, उद्योग, शिक्षण, साहित्य इत्यादी क्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्तींची घेतली जाते. त्याचप्रमाणे नोकरीसाठीही मुलाखत घेतली जाते. मुलाखतीतून तूया व्यक्तीच्या आवडी-निवडी, एखादया विषयांसंबंधीचे विचार-मत, त्याच्यातील आत्मविश्वास इत्यादी बाबी समजतात. मुलाखत घेणाऱ्यांच्या अंगी सुद्धा 'मुलाखत घेणे' हे भाषण कौशल्य असावे लागते.

**भाषण दोष व उपाय :**

स्वत:चे विचार चांगल्या भाषेद्वारे व्यक्त करता येणे ही बाब भाषण कौशल्यात येते. शुद्ध व स्पष्ट उच्चार हे भाषणाचे अंग आहे. योग्य व अचूक ध्वनींचा उच्चार न करता आल्याने उच्चारदोष निर्माण होतात.
उच्चारदोष निर्माण होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

1. शारीरिक दोषामुळे
2. मानसिक कमकुवतपणामुळे
3. अज्ञान व अनुकरणामुळे

**1) शारीरिक दोषामुळे निर्माण होणारे उच्चार दोष :**

ध्वनीच्या उच्चारासाठी जीभ, दात, ओठ, नाक या शारीरिक अवयवांचा वापर होतो. या अवयवांत दोष निर्माण झाल्यास उच्चार दोष निर्माण होतात.

**2) जीभेचे दोष :**

जीभ जड असणे, जीभेला शेंडा नसणे, जीभ टाळूला चिटकणे यामुळे च, छ, द, ध, ट, ठ इत्यादी वर्णांचे उच्चार चुकीचे होतात.

**ब) दातांचे दोष :**

वरच्या, समोरच्या दोन दातांची वेडीवाकडी वाढ असणे किंवा ते दात नसणें यामुळे त, थ, द, ध इत्यादी वर्णांचे उच्चार चुकीचे होतात.

**क) नाकाचे दोष :**

नाकातील हाड वाढणे व मास वाढणे यामुळे न, ण इत्यादी वर्णासोबत इतर अनेक वर्णांचे उच्चार अस्पष्ट होतात.

**ड) ओठांचे दोष :**

ओठ फाटणे, ओठाला ओठ चिटकणे यामुळे प, फ, ब, भ, म इत्यादी वर्णांचे उच्चार चुकतात.

**उपाय :**

शारीरिक दोषामुळे निर्माण होणाऱ्या उच्चार दोषांचे निराकरण करण्यासाठी वैद्यकीय उपचार घेऊन शारीरिक दोष दूर करणे.

**2) मानसिक कमकुवतपणामुळे निर्माण होणारे उच्चार दोष :**

मानसिक कमकुवतपणा व आत्मविश्वास नसल्यामुळे तोतरेपणा, हेल काढून बोलणे, बोलण्याची पुनरावृत्ती करणे अडखळत बोलणे हे दोष निर्माण होतात.

**उपाय :**

अ) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.

ब) सतत सराव देऊन दोष दूर करणे.

क) आवश्यकता वाटल्यास मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घेऊन दोष दूर करणे.

**3) अज्ञानातून व अनुकरणामुळे निर्माण होणारे दोष :**

मुळाक्षर, जोडाक्षर यांच्या उच्चाराचे अचूक ज्ञान नसणे तसेच परिसर, कुटूंब इत्यादी ठिकाणी कानावर पडलेले चुकीचे उच्चार, या उच्चारांचे अशुद्ध स्वरूपात अनुकरण यामुळे वर्णांचे चुकीचे उच्चार,-ऱ्हस्व–दीर्घचे चुकीचे उच्चार, अनुस्वरांचे चुकीचे उच्चार, जोडाक्षरांचे चुकीचे उच्चार इत्यादी उच्चारदोष निर्माण होतात.

**उपाय :**

अ) विद्यार्थ्यांना वर्णांच्या उच्चार स्थानांची माहिती देणे.

ब) शिक्षकांनी व पालकांनी शुद्ध व स्पष्ट उच्चारात मुलांशी बोलणे.

क) शुद्ध उच्चारांचा सराव घेणे.

ड) रेडिओ, टेपरेकॉर्डच्या साहाय्याने शुद्ध उच्चारांची नमुने विद्यार्थ्यांना ऐकवणे.

इ) शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे उच्चारदोष शोधून त्यावर उपाय करणे.

**भाषण-संभाषण उपक्रम (अध्ययन-अनुभव ) :**

विद्यार्थ्यांमध्ये भाषण या क्षेत्रामधील क्षमतांची संपादणूक होण्यासाठी खालील उपक्रम राबविता येतात.

1. विद्यार्थ्यांना मातृभाषेतील सर्व ध्वनींचा उच्चार करण्याचा सराव देणे.
2. विद्यार्थ्यांकडून सामूहिक व वैयक्तिकरित्या बडबडगीते, गाणी, कविता गाऊन घेणे.
3. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त प्रश्न विचारून त्यांना उत्तरे देण्याची संधी देणे.
4. विद्यार्थ्यांसोबत गप्पागोष्टी करणे.
5. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करणे.
6. विद्यार्थ्यांना सोपे विषय देऊन त्यावर भाषण करण्याची संधी देणे.
7. विद्यार्थ्यांना परिचित वस्तू, पदार्थ दाखवून वर्णन करायला लावणे, छोटे प्रसंग, घटना यावर वर्णन करायला लावणे.
8. विद्यार्थ्यांना सोपे विषय देऊन त्यावर वर्गचर्चा घडवून आणणे.
9. नाटकातील छोटे संवाद बोलण्याची विद्यार्थ्यांना संधी देणे, बालनाट्यांचे आयोजन करणे.
10. वादविवाद, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना संधी देणे.

**भाषण क्षमतेचे मूल्यमापन :**

भाषण क्षेत्रातील क्षमता विद्यार्थ्यांनी कितपत प्राप्त केल्या हे पडताळून पाहण्यासाठी खालील साधने व तंत्रांचा वापर केला जातो.

**अ) तोंडी परीक्षा :**

तोंडी परीक्षेद्वारे भाषण क्षमतेचे मूल्यमापन पुढीलप्रमाणे करता येते.

i. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून त्याची उत्तरे घेणे.

ii. विद्यार्थ्यांकडून वर्ण, जोडाक्षरे, शब्द, वाक्य यांचे उच्चारण करून घेणे.

iii. विद्यार्थ्याला गोष्ट सांगायला लावणे, कविता म्हणायला लावणे, वर्णन करायला लावणे, नाटय उता-यातील संवाद म्हणायला लावणे, कवितेच्या ओळी म्हणायला लावणे.

वरील प्रकारचे विद्यार्थ्यांचे तोंडी परीक्षेद्वारे मूल्यमापन केल्यास विद्यार्थ्यांचे उच्चार, आघात, आवाजातील चढ-उतार, शब्दसंपत्ती, आकलन क्षमता, भाषणाचे प्रकार हाताळण्याची क्षमता इत्यादींचे मूल्यमापन करता येते.

**ब) निरीक्षण व नोंदी :**

भाषण क्षमतेच्या मूल्यमापनासाठी तोंडी मूल्यमापनाप्रमाणे सातत्यपूर्ण निरीक्षण व नोंदींना महत्त्व आहे. तोंडी परीक्षेद्वारे भाषण क्षमतेचे केलेले मूल्यमापन, इतर वेळी सातत्यपूर्ण विद्यार्थ्यांच्या भाषण क्षमतेचे केलेले निरीक्षण, यांच्या नोंदी शिक्षकाला वेळोवेळी कराव्या लागतात. या नोंदीसाठी पडताळा सूचीचा वापर करता येतो

**पडताळा सूची**

**भाषण क्षमता**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | उच्चार | आघात | चढ-उतार | गती व विराम | शब्दरचना | विषयांची मांडणी | आत्म-विश्वास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.<br>2. | अ, ब, क.<br>ब, क, ड. | अशुद्ध<br>शुद्ध | योग्य<br>अयोग्य | क्वचित<br>योग्य | योग्य<br>योग्य | योग्य<br>अयोग्य | ठीक<br>चांगली | ठीक<br>चांगला |

**2.2.4 वाचन कौशल्य**

वाचन हे महत्त्वाचे भाषिक कौशल्य आहे. साक्षरतेचे एक अंग आहे. लिहिलेल्या किंवा छापलेल्या मजकुराचे आपण डोळयांद्वारे ग्रहण करतो. या मजकुरातील अक्षरे आपण ओळखतो. ध्वनी-ज्ञानांच्या मदतीने आपण अक्षरांचे उच्चार करतो. पण केवळ डोळयांनी अक्षरे पाहून त्यांचे उच्चार करणे म्हणजे वाचन नव्हे. तर वाचनात अर्थ समजणे खूप महत्त्वाचे असते. जॅगर यांच्या मते, 'वाचन म्हणजे केवळ अक्षरे वाचणे नव्हे तर वाचलेल्या अक्षरांच्या मदतीने विचार करणे होय.'

'वाचन' ही एक प्रक्रिया वाटत असली तरी त्यामध्ये तीन क्रिया घडत असतात.

शब्दांचे डोळयांकडून ग्रहणशब्दांच्या अर्थाचे आकलन शब्दांचे उच्चारण या क्रिया वरील क्रमाने वेगाने घडतात.

**वाचनाचे महत्त्व :**

मनुष्याच्या व्यक्तित्वाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी वाचन हे महत्त्वाचे साधन आहे. मानवाच्या जीवनाला आवश्यक असणारे ज्ञान वाचनातून मिळते. ग्रंथाच्या वाचनातून मानवाला जगण्याची, विकासाची प्रेरणा मिळते, संस्काराची देणगी मिळते, भावनेचा विकास होतो, ज्ञानाची प्राप्ती होते. निर्भेळ आनंद मिळतो. एवढे प्रचंड सामर्थ्य ग्रंथाच्या वाचनात आहे. म्हणूनच ग्रंथांना 'आपल्याच राखेतून पुन्हा जन्म घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्याची उपमा दिली जाते.' जगात घडवणाऱ्या घडामोडी, अद्ययावत ज्ञान, तंत्रज्ञान इत्यादींची माहिती वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके यांच्या वाचनातून मिळते. वाचनाशिवाय मानवाचे जीवन अपूर्ण आहे. मानवाच्या जीवनात 'वाचाल तर वाचाल' हे तत्त्व महत्त्वाचे आहे.

शैक्षणिक प्रक्रियेतही वाचनाला महत्त्वाचे स्थान आहे. वाचन हे शिक्षणाचे प्रमुख साधन आहे. विद्यार्थ्याच्या ज्ञान मिळविण्याच्या क्षमतेत, आकलन क्षमतेचा विकास करण्यात, बौध्दिक व भावनिक विकास घडवण्यास वाचनाचा मोठा वाटा आहे. विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याच्या विकासावरच त्याच्या लेखन या कौशल्याचा विकास अवलंबून आहे.

**वाचनाची उद्दिष्टये :**

**अ) वाचनाची सर्वसामान्य/व्यावहारिक उद्दिष्टये:**

**1) ज्ञानप्राप्ती :**

ग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्र, मासिके इत्यादींच्या वाचनामागील काही हेतूपैकी भूतकाळ व वर्तमानकाळाचे सखोल ज्ञान मिळविणे हा हेतू असतो. मनुष्य स्वत:ला असणारी विविध विषयांतील ज्ञान मिळवण्याची इच्छा व आवश्यकता वाचनाद्वारे पूर्ण करत असतो.

**2) आनंदप्राप्ती/ मनोरंजन :**

काही प्रकारच्या वाचनातून वाचकाला आनंद मिळत असतो. त्या वाचनाने त्याचे मनोरंजन होत असते. ते वाचन त्याचा एक विरंगुळा असतो. कथा, कादंबरी, कविता इत्यादीचे वाचन तो फावल्या वेळेत करतो. अशा अनेक रहस्यकथा, साहसकथा, विनोदीकथा, कादंबऱ्या आहेत. ज्या 'कोळयाच्या जाळयाप्रमाणे' आहेत. वाचक त्यात अडकत जातो. वाचकाला आनंद व मनोरंजन देण्याचे प्रचंड सामर्थ्य वाचनात आहे.

**a. आकलनशक्तीचा विकास :**

वेगवेगळया प्रकारच्या सतत वाचनाने आकलन शक्तीचा विकास होत असतो. अवांतर वाचनाची पुस्तके, वर्तमानपत्रातील अग्रलेख इत्यादींच्या वाचनातून आकलनशक्तीचा विकास होतो. इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांपेक्षा दहावीतील विद्यार्थ्यांची आकलनशक्ती वाचनातूनच विकसित झालेली असते.

**b. संस्कारप्राप्ती :**

वाचनाने चांगले संस्कार होऊन मनुष्य सुसंस्कृत व्हावा हा वाचनाचा एक हेतू असतो. वाचनातून चांगली तत्त्वे, सुविचार, नीतिमूल्य, आदर्श चरित्रे, संस्कृती इत्यादी वाचकाच्या मनात रूजतात व त्याला संस्कार प्राप्त होतात.

**c. नवनिर्मिती/सर्जनशीलता :**

वाचनातून नवनिर्मिती व्हावी हा वाचनाचा एक हेतू असतो. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या वाचनात येणारे विचार, कल्पना, सुभाषिते, सुविचार, नवीन शब्द, वाक्प्रचार व म्हणी इत्यादींचा वापर विद्यार्थी भाषण व लेखनात करतो. काव्यवाचन, कथावाचन, कादंबरीवाचन, नाटयवाचन इत्यादी साहित्यप्रकारांचे वाचन ते साहित्यप्रकार लेखनास प्रवृत्त करते. इतकेच नव्हे तर इतर क्षेत्रात नवनवीन संशोधनाद्वारे जी नवनिर्मिती झाली, शोध लागले त्या सर्वांचा पाया सखोल वाचनात आहे.

**a. वाचनाची शालेय/शैक्षणिक उद्दिष्टये :**

1. शब्दांचा शुद्ध उच्चार करून प्रकट वाचन करता येणे.
2. अर्थपूर्ण मूकवाचन करता येणे.
3. योग्य चढ-उतार, स्वराघात यांच्या साहाय्याने वाचता येणे.
4. लेखातील आशय, भावविचार वाचनातून समजणे.
5. वाचनातून शब्दसंपत्तीचा विकास करणे.
6. चांगले ग्रंथ वाचण्याची आवड निर्माण करणे.
7. अवांतर वाचनाची सवय लावणे.
8. विविध साहित्य प्रकारांचा आस्वाद घेण्याची क्षमता निर्माण करणे.

**वाचनाचे प्रकार :** वाचनाचे त्याच्या रीतीवरून दोन प्रकार पडतात.

1. प्रकटवाचन

2. मूकवाचन

**अ) प्रकटवाचन :**

प्रकटवाचन ही एक कला आहे. प्रकटवाचन हे नेहमी दुसऱ्यांसाठी केले जाते. त्यामुळे प्रकटवाचन सूव्यवस्थित, स्पष्ट व शुद्ध असावे लागते. त्याचप्रमाणे ते प्रभावी असावे लागते. साधारणपणे, गद्यपाठ, कविता, नाट्य, वृत्त इत्यादींचे प्रकटवाचन केले जाते. चांगल्या प्रकटवाचनासाठी निकष खालीलप्रमाणे सांगता येतात.

1. अक्षरांचे, शब्दांचे स्पष्ट व शुद्ध उच्चार करता येणे.
2. आवाजात सहजता असणे, योग्य चढ-उतार असणे.
3. योग्य विरामचिन्हासहित वाचने.
4. सुयोग्य गतीने वाचन येणे.
5. लेखनातील भावनेशी समरस होऊन वाचता येणे व त्या भावना वाचनात प्रतिबिंबित करता येणे.

**आ) मूकवाचन :**

अक्षरांचे डोळयांद्वारे ग्रहण करून मेंदूद्वारे त्याचे अर्थग्रहण करणे, उच्चार करतांना मनातल्या मनात वाचणे याला मूकवाचन म्हणतात. मूकवाचन हे दुसऱ्यांसाठी नसून स्वत:साठी केले जाते. त्यामुळे मूकवाचनातून अर्थग्रहण करण्याची जबाबदारी स्वत:ची असते. वाचन, अवांतर वाचन, विस्तृत वाचन हे सुद्धा मूकवाचनच असते. चांगल्या मूकवाचनाचे निकष पुढीलप्रमाणे सांगता येतात.

1. एकाच दृष्टीत जास्तीत जास्त शब्द सामावून शीघ्र गतीने वाचता येणे.
2. वाक्यातील विविध शब्दांचा संदर्भानुसार असणारा अर्थ चटकन लक्षात घेणे.
3. शब्दाचा वाच्यार्थ, लक्षार्थ व ध्वन्यार्थ लक्षात येणे.
4. एका परिच्छेदाचा दुसऱ्या परिच्छेदाशी असणारा संबंध लक्षात ठेवून वाचता येणे.
5. वाचत असताना उताऱ्यातील प्रमुख विचारांची, कल्पनांची, भावनांची नोंद मनात करता येणे.

**वाचनाच्या अध्यापन पद्धती :** वाचन शिकवण्याच्या काही पद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

**1) मूळाक्षर पद्धती :**

या पद्धतीत लेखन व वाचन एकदाच शिकवले जाते. प्रथम पाटीवर एक एक मूळाक्षर काढून ते विद्यार्थ्यांकडून गिरवून घेतले जाते. ते गिरवतांना त्याच उच्चार करून घेतला जातो. मूळाक्षरानंतर बाराखडी, जोडाक्षर, शब्द व वाक्य यांचे क्रमाने वाचन शिकविले जाते.

**दोष :** (1) मुळाक्षरावर भर असल्यामुळे विद्यार्थी एक एक अक्षर सुटे सुटे वाचतात. यामुळे शब्दांचा योग्य उच्चार व स्वराघात चुकतो. (2) अर्थाला महत्त्व नाही. (3) वाचन कौशल्याचा विकास मंद गतीने होतो.

**1) गटपद्धती :**

मूळाक्षर पद्धतीची सुधारलेली आवृत्ती म्हणजे गटपद्धती होय. या पद्धतीत सारख्या आकारांच्या अक्षरांचे गट पाडले जातात. या गटातील प्रत्येक अक्षरांची स्वतंत्रपणे ओळख करून दिली जाते. चित्रांच्या साहाय्याने एकेका अक्षरांचा अर्थ कृत्रिमरित्या आणला जातो.

उदा. न – नळाचा, ग – गवताचा.

गटातील सर्व अक्षरांचे लेखन व उच्चारांचे कार्य पूर्ण झाल्यावर त्या-त्या गटातील अक्षरांचा वापर करून शब्दांचे वाचन शिकविले जाते. उदा. नमन

**2) शब्दपद्धती :**

या पद्धतीत एक एक अक्षर किंवा गट घेण्याऐवजी एकेक अर्थपूर्ण शब्द घेतला जातो. 'अ' 'आ' 'इ' असे अक्षरज्ञान देण्यापेक्षा अननस, आगगाडी, इमारत या शब्दातून अक्षरज्ञान दिले जाते.

**3) वाक्यपद्धती :**

या पद्धतीत शब्दाऐवजी विद्यार्थ्यांसमोर वाक्य ठेवले जाते. त्यासाठी शब्दपट्ट्यांचा वापर करून लहान लहान वाक्ये जुळवून वाचन शिकविले जाते. या वाक्याचे वाचन शिक्षक करतात. त्यानंतर विद्यार्थ्यांचे सामूहिक व वैयक्तिक वाचन होते. त्यानंतर वाक्यातील प्रत्येक शब्द वेगळा करून त्याचा परिचय करून दिला जातो.

**4) प्रसंग पद्धती :**

या पद्धतीत एखादा शैक्षणिक प्रसंग निवडून किंवा तसे वातावररण तयार करून विद्यार्थ्यासमोर छोटी-छोटी वाक्य चित्रित केली जातात. पूर्ण वाक्य देऊन त्यावर वाचन शिकविले जाते. यासाठी प्रत्यक्ष प्रसंग निर्माण केला जातो किंवा चित्राच्या साहाय्याने प्रसंगाचे वातावरण तयार केले जाते. उदा. कमल नमन कर – विद्यार्थ्यांकडून नमन करण्याचा प्रसंग घडवून आणणे.

**वाचन दोष व उपाय :** प्रमुख वाचनदोष पुढीलप्रमाणे आहेत.

**1) अपुरे संवेदन :**

जे वाचले त्याला पूर्ण अर्थ लक्षात न येता अर्धवट अर्थ लक्षात येणे म्हणजे अपुरे संवेदन होय. हा दोष कमी शब्दसाठा असल्यामुळे निर्माण होतो.

**उपाय :** दृष्टीची कक्षा वाढविण्याची सवय लावणे, शब्दसंग्रह वाढविणे.

**2) निकृष्ट संवेदन :**

अवघड, आशय, कमी विषयज्ञान असल्यामुळे जे वाचले त्याच्या अर्थाचे आकलन होत नाही. त्याला निकृष्ट संवेदन म्हणतात.

**उपाय :** विषयज्ञान वाढविणे, शब्दसंग्रह वाढविणे.

**3) सदोष उच्चारण :**

वाचत असताना अस्पष्ट व चुकीचे उच्चार करणे म्हणजे सदोष उच्चारण होय. दृष्टिदोष, वाचादोष, अज्ञान व निष्काळजीपणामुळे हा दोष निर्माण होतो.
**उपाय :** उच्चारांचे ज्ञान देणे, उच्चारांचा सराव करून घेणे, उच्चार करतांना काळजी घेणे.

**4) एकेक शब्द वाचणे :**

सलग वाचन न करता एकेक शब्द तुटकपणे वाचणे. मर्यादित दृष्टिकक्षा, अज्ञान व सवय यामुळे हा दोष निर्माण होतो.
**उपाय :** वाचनाच्या निकोप सवयी शिकविणे, दृष्टिकक्षा वाढविण्यास शिकवणे.

**3. शब्दावरून बोट फिरविणे :**

सवय व अज्ञानपणामुळे वाचन करत असताना शब्दावरून बोट फिरविणे.
**उपाय :** वाचनाच्या निकोप सवयी शिकवणे.

**4. शब्द गाळणे :**

वाचनातील काही शब्द गाळणे, दृष्टिदोष, निष्काळजीपणा व घाईगडबड करणे यामुळे दोष निर्माण होतो.
**उपाय :** सूक्ष्म वाचनाची सवय लावणे, योग्य गतीने वाचनाची सवय लावणे.

**5. सदोष विराम :**

वाचन करत असताना विरामचिन्हांच्या ठिकाणी विराम न घेता इतर ठिकाणी घेणे. हा दोष अज्ञानामुळे निर्माण होतो.
**उपाय :** विरामचिन्हांचे ज्ञान देणे.

**वाचन विकासासाठी उपक्रम (अध्ययन अनुभव):**

वाचन क्षेत्राच्या विकासासाठी खालीलप्रमाणे उपक्रम राबवता येतात.

1. शब्दपट्टया, वाक्यपट्टया तयार करून त्यावर अक्षर, शब्द व वाक्यांचे वाचन करून घ्यावे.
2. शब्दचित्र मालिका व भित्तिपत्रके तयार करून त्यावर विद्यार्थ्यांचे वाचन घेणे.
3. वर्तमानपत्रातील निवडक बातम्यांचे परिपाठात वाचन करून घेणे.
4. कविता, गाणी व छोटया गोष्टींचे विद्यार्थ्यांकडून मोठयाने वाचन करून घेणे.
5. परिसरातील दुकानावरील पाटया वाचून त्यांची यादी करण्यास सांगणे.
6. विद्यार्थ्यांच्या गृहपाठांच्या वह्यांची आदलाबदल करून त्यांचे वाचन करून घेणे.
7. कथावाचन, नाटयवाचन, निबंधवाचन, कविता वाचन हे उपक्रम घेणे.
8. सूचना फलक, वार्ता फलक, वर्गफळा यांचा वापर कौशल्या विकासासाठी करून घेणे.
9. विद्यार्थ्यांकडून मूकवाचन करून घेणे.
10. वर्तमानपत्रे, विद्यार्थ्यांसाठी तयार केलेली नियतकालिके यांचे अवांतर वाचन करून घेणे

**पुरवणी वाचन :**

विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याचा विकास व्हावा, त्याला वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी पाठ्यपुस्तकांशिवाय इतर पुस्तके, ग्रंथ यांचे वाचन करणे म्हणजे पुरवणी वाचन होय. हे वाचन विद्यार्थ्यांने मोकळ्या वेळेत करायचे आहे. पुरवणी वाचनाचे दोन प्रकार आहेत. पाठयपुस्तकात स्वाध्यायात दिलेले पुरवणी वाचन व विद्यार्थ्यांने स्वत: प्रेरणेने केलेले पुरवणी वाचन. पाठयपुस्तकात स्वाध्यायात विद्यार्थ्यांनी करावयाचे पुरवणी वाचन त्यांचा वर्ग, वय, बौध्दिक क्षमता यांचा विचार करून दिलेले असते. कथा, कांदबरी, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी साहित्य प्रकारांचा समावेश यात असतो. प्रत्येक इयत्तेनिहाय पुरवणी वाचनासाठींच्या किती पुस्तकांचे वाचन अपेक्षित आहे याची नोंद अभ्यासक्रमात आहे.

**वाचनाचे मूल्यमापन :**

वाचन क्षेत्रातील क्षमतांची प्राप्ती विद्यार्थ्यांना कितपत झाली याचे मूल्यमापन तोंडी, निरीक्षण व नोंदी ठेवून करता येते.

i. **तोंडी मूल्यमापन :** विद्यार्थ्यांला पुढील कृती करण्यास सांगून मूल्यमापन करणे.

1. शब्द, वाक्य यांचे विद्यार्थांकडून वाचन करून घेणे.
2. पाठांचे, कवितेचे प्रकट वाचन करून घेणे.
3. विद्यार्थ्यांना ठराविक मूकवाचन देऊन त्यावर प्रश्न विचारणे.

या प्रकारच्या मूल्यमापनातून उच्चार, चढ-उतार, विराम, गती, आकलन इत्यादी बाबींचे मूल्यमापन करता येते.

i. **निरीक्षण व नोंदी :**

विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्याच्या मूल्यमापनासाठी तोंडी मूल्यमापनाद्वारे मिळालेली माहिती, तसेच सातत्यपूर्ण निरीक्षणाद्वारे मिळालेली माहिती इत्यादीच्या नोंदी शिक्षकांकडून केल्या जातात. या नोंदीसाठी खालील पडताळा सूचीचा वापर करता येतो.

**पडताळा सूची**

**वाचन**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाम | उच्चार | चढ-उतार | विराम | भावपूर्णता | आकलन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अ, ब, क | योग्य/अयोग्य | योग्य/अयोग्य | योग्य/अयोग्य | योग्य/अयोग्य | योग्य/अयोग्य |

### 2.2.5 लेखन कौशल्य

लेखन म्हणजे लिहिणे. लिहिणे याचा अर्थ अक्षरे, शब्द व वाक्य यांचे सुबक रेखाटन करणे. पण लेखन म्हणजे केवळ रेखाटन नव्हे. हे रेखाटन अर्थपूर्ण असले पाहिजे. शब्द, वाक्य, वाक्यसमूहाद्वारे लिहिणाऱ्यांचे भाव, विचार प्रकट झाले पाहिजेत. असे लेखन करता येण्यासाठी तीन गोष्टींची आवश्यकता असते.

(1) दुसऱ्यांना सांगण्यासारखे स्वत: जवळ काहीतरी असणे.
(2) ते सांगण्याची इच्छा असणे.
(3) जे सांगण्यासारखे आहे ते शब्दांच्या माध्यमातून चांगल्या पद्धतीने सांगता येणे.

**लेखनाचे महत्त्व :**

ज्याला लिहिता वाचता येत नाही त्याला आपण निरक्षर मानतो. निरक्षरता हे मागासलेपणाचे लक्षण आहे. भाषणाप्रमाणे लेखनही आपले मनोगत व्यक्त करण्याचे साधन आहे. लेखनाद्वारे आपण आपल्या भाव, विचार व कल्पनांची अभिव्यक्ती करतो. भाषणाद्वारे आपले विचार फक्त काही श्रोत्यांपर्यंत पोहोचतात. पण लेखनाद्वारे मांडलेले विचार दूरदूरच्या वाचकांपर्यंत पोहोचतात. बोललेले आठवणे कठीण असते. पण जे लिहिलेले असते त्याचे वारंवार वाचन करणे शक्य असते. लेखनाला सामाजिक दृष्टीने फार महत्त्व आहे. लोकांना सुसंस्कृत, जागरूक व सूजाण नागरिक बनविण्याचे कार्य लेखनातून प्रभावी होते. आज प्रत्येक व्यक्तीला लेखन कौशल्य प्राप्त करणे अनिवार्य झालेले आहे. आपले विनंती अर्ज, तक्रारी, निवेदन लिहून सादर करावे लागतात. याप्रमाणे लेखन कौशल्य प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचे एक महत्त्वाचे अंग बनले आहे.

**लेखनाची उद्दिष्टये :**

**अ) लेखनाची सर्वसामान्य/व्यावहारिक उद्दिष्टे :** लेखनाची सर्वसामान्य किंवा व्यावहारिक उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

**1) आत्मविष्कार :**

व्यक्तीच्या मनातील भावना, विचार, कल्पना व्यक्त करणे म्हणजे आत्मविष्कार होय. भाषण व लेखन हे आत्मविष्काराचे साधन आहेत. भाषणापेक्षाही लेखनाद्वारे आत्मविष्करण चांगल्या प्रकारे होते.

**2) स्वमताचा प्रचार :**

आपले मत, आपले विचार यांचा इतरांपर्यंत प्रचार व्हावा, त्यांनी त्याचा स्वीकार करावा हा लेखनामागील एक हेतू असतो.

**3) मन:शांती :**

आपल्या मनाला टोचणारे, बोचणारे विचार, भावना, प्रसंग यांचे लेखन करून मन हलके होत असते. त्यामुळे मनाला शांती व समाधान मिळते, दैनंदिनी लेखन, आत्मचरित्र इतयादी प्रकारचे लेखन मन:शांतीसाठी केले जाते.

**4) सुसंस्कार :**

आपल्या लेखात वाचकांवर परिणाम करणारी चांगली जीवनमूल्य पेरण्याचा प्रयत्न लेखक करतो. त्याचा हेतू म्हणजे वाचणारी व्यक्ती सुसंस्कारित व्हावी हा असतो. संतकाव्य, बालसाहित्य, बोधकथा इत्यादीचे उद्दिष्टये सुसंस्कार हे आहे.

**ब) लेखनाची शालेय / शैक्षणिक उद्दिष्टये :**

लेखनाची शालेय उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

1. वर्ण, शब्द व वाक्य यांचे लेखन करता येणे.
2. आपले विचार, कल्पना, भावना व अनुभव स्वत:च्या शब्दात लिहिता येणे.
3. सुवाच्च व सुंदर हस्ताक्षरात लिहिता येणे.
4. शुद्धलेखन करता येणे.
5. अनुलेखन (शिक्षकाचे पाहून लिहिणे) करता येणे.
6. दृकलेखन (स्वत: पुस्तककात पाहून लिहिणे) करता येणे.
7. श्रुतलेखन (सांगितलेले ऐकून लिहिंणे) करता येणे.
8. दैनंदिन जीवनातील गरजांची पूर्ती करण्यासाठी लेखनाचा उपयोग करता येणे.
9. निबंधलेखन, सारांश लेखन, कल्पनाविस्तार लेखन, पत्रलेखन इत्यादी प्रकारचे लेखन करता येणे.

**लेखनाचे प्रकार :** लेखनाचे प्रकार पुढिलप्रमाणे सांगता येते.

**1) अक्षर – शब्द – वाक्यलेखन :**

लेखनाची सुरूवात मुळाक्षर लेखनापासून होते. मुळाक्षरानंतर जोडाक्षरे, शब्द यांचे लेखन केले जाते. त्यानंतर वाक्यलेखन केले जाते. वाक्यलेखन ही इतर लेखन प्रकाराची पहिली पायरी आहे. प्रत्येक भाषेत वाक्यरचनेची एक विशिष्ट पद्धती असते. वाक्यरचनेचे विविध प्रकार असतात.

**2) परिच्छेद लेखन :**

परिच्छेद लेखन म्हणजे एकच एक विचार व्यक्त करणारा अनेक वाक्यांचा सुसंगत समूह होय. परिच्छेदात एक प्रमुख विचार, कल्पना किंवा भावना व्यक्त केलेली असते. त्याला आपण आशय म्हणतो. या आशयाचा विस्तार अनेक वाक्यांद्वारे केलेला असतो. या वाक्यांचा परस्परांशी संबंध असतो. त्यामुळे प्रत्येक वाक्यात एकसंगती असते. परिच्छेदलेखन हे निबंध, पत्रलेखन, कथालेखन इत्यादी लेखन प्रकाराचे एक अंग असते.

**3) सारांश लेखन/ सार लेखन :**

मूळ उताऱ्यातील आशय समजून स्वत:च्या मोजक्या शब्दात लिहिणे म्हणजे सारांश लेखन होय. सारांश लेखन मूळ उताऱ्यापेक्षा लहान असते. ते मूळ उताऱ्यांच्या $^1/_2$ते $^2/_3$ इतके असते. सारांश लेखन मूळ लेखकाची पुनरावृत्ती न करता स्वत:च्या शब्दात, भाषेत असते.

सारांश लेखन विद्यार्थ्यांच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे असते. यामुळे विद्यार्थ्यांच्या चिंतनाला दिशा मिळून वाचलेला आशय स्वत:च्या शब्दात मांडण्याचे कौशल्य त्यांच्यात निर्माण होते.

**4) निबंध लेखन :**

'नि + बंध' म्हणजे सुव्यस्थित बांधणे होय. ही बांधणी विचारांची, कल्पनांची असते. निबंधातील आशयाची तर्कशुद्ध मांडणी केलेली असते. ती मांडणी अनेक परिच्छेदांतून केलेली असते. या प्रत्येक परिच्छेदात एक संगती असते. निबंधाचे शीर्षक आशयाला अनुसरून असते. निबंधाचे खालील प्रकार आहेत. वैचारिक निबंध –उदा. समाजातील स्त्रीचे स्थान, वर्णनात्मक निबंध –पावसाळयातील एक दिवस,

कल्पनात्मक निबंध – मी मुख्यमंत्री झालो तर, आत्मकथनपर निबंध – पुस्तकाचे आत्मवृत्त, चरित्रात्मक निबंध – माझा आवडता नेता.

**5) कल्पनाविस्तार-लेखन :**

कधी कधी एखादे मार्मिक वाक्य वाचून मनावर मोठा परिणाम होतो. ते सुभाषित असेल, काव्यपंक्ती असेल किंवा म्हण असेल उदा. 'केल्याने होत आहे रे''अति तिथं माती'.या मार्मिक वाक्याचे स्वत:च्या शब्दात, स्वत:च्या भाषेत व स्वत:च्या कल्पनेने केलेले स्पष्टीकरण म्हणजे कल्पनाविस्तार लेखन होय.

**6) पत्रलेखन :**

प्रत्येक व्यक्ती चांगला लेखक बनेलच असे नाही. पण प्रत्येकाला पत्रलेखक बनावे लागते. अनेक कारणांसाठी आपल्याला पत्र लिहिणे गरजेचे असते. पत्रलेखनाचे घरगुती पत्र, व्यावसायिक पत्र, मागणीपत्र, अभिनंदनपर पत्र, विनंती पत्र इत्यादी प्रकार आहेत. पत्रलेखनाच्या (1) पत्ता व दिनांक (2)मायना/संबोधन (3) मजकूर/आशय (4) समारोप (5) पत्ता व स्वाक्षरी या पायऱ्या आहेत.

**7) कथालेखन :**

लहान-थोर सर्वांनाच कथा ऐकणे, वाचणे आवडते. कथालेखनाची या अंगे महत्त्वाची आहेत. (1) कथानक (2) पात्रे (3) कथनशैली. कथेत घटनेचे किंवा प्रसंगाचे वर्णन असते. हे वर्णन पात्रांच्या जीवनाशी निगडित असते. कथालेखनाच्या तांत्रिक बाजू खालीलप्रमाणे सांगता येतात. (1) कथेचे शीर्षक (2) मोजक्या घटना किंवा प्रसार (3) पात्रे व त्यांची स्वभाव वैशिष्टये (4) योग्य लेखन शैली (5) पात्रानुरूप भाषा व संवाद (6) कथानक.

शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना चित्रावरून कथा लिहिणे, मुद्यावरून कथा लिहिणे इत्यादी कथालेखनाचे प्रकार शिकवले जातात.

**8) संवाद लेखन :**

दोन किंवा अधिक व्यक्तींच्या संभाषणाला संवाद म्हणतात. संवाद एखादया विशिष्ट विषयावर होत असतात. या संवादाचे लेखन करून त्याचा वापर कथा, कादंबरी, नाटक यात केला जातो. संवाद लेखन हे आशयानुसार असावे लागते. संवादातून पात्रांचे स्वभावचित्रण व्हावे लागते.

**9) अहवाल लेखन :**

एखादया कार्यक्रमाचा किंवा एखादया संस्थेचे इतिवृत्त लिहून लोकांसमोर मांडणे म्हणजे अहवाल लेखन होय. अहवाल लेखनात तारखा, सहभागी व्यक्ती,

ठळक प्रसंग, निष्कर्ष इत्यादींचे मोजक्या शब्दात लेखन असते. शाळेमध्ये होणाऱ्या वेगवेगळया कार्यक्रमांचे, उपक्रमांचे अहवाल लेखन विद्यार्थ्यांकडून करून घेता येते.

**10) दैनंदिनी लेखन :**

दैनंदिनी लेखन म्हणजे स्वत:शी हितगूज साधणे होय. आपल्याला येणारे अनुभव, आपले वागणे, इतरांचे आपल्याशी वागणे, स्वत:च्या चुकांची कबूली आपल्या इच्छा-आकांक्षा, मते, प्रतिक्रिया, स्वप्ने इत्यादींचे दैनंदिन लेखन केले जाते. लेखन अनौपचारिक व नैसर्गिक असते.

**11) वार्तालेखन :**

सामाजिकदृष्टया महत्त्वाच्या घडामोडी, सुरस घटना, प्रसंग इत्यादी वार्तालेखन केले जाते. वार्तालेखन हे वस्तुनिष्ठ व मोजक्या शब्दात असते.

**12) काव्यलेखन :**

हा सर्वात उच्च स्तरावरचा लेखन प्रकार आहे. लिहिणाऱ्याला शंभर पाने लिहूनही जे साध्यहोत नाही ते साध्य कवितेच्या एका ओळीतून होते. काव्यात भावनांचा कल्लोळ असतो, सुंदर शब्दरचना असते, मनाला मोह पाडणारी लय असते. काव्यलेखनासाठी एक उपजत शक्ती असावी लागते. काव्यलेखनात प्रभावी शब्द, वक्रोत रस, गेयता इत्यादी वैशिष्टये असतात. अनुभवांची व भावनांची रेलचेल असेल तर काव्य निर्माण होते.

**लेखनदोष व उपाय :**

लेखन करताना सुलेखनासंबंधी व शुद्धलेखनासंबंधी दोष निर्माण होतात.

**अ) शुद्धलेखना संबंधी दोष :**

अक्षरांचे वळण सर्वत्र सारखे नसणे, अक्षरांचा योग्य आकार नसणे, दोन अक्षरांत, दोन शब्दांत योग्य अंतर नसणे, शब्दावर शिरोरेखा न देणे, लेखनात खाडाखोड असणे इत्यादी शुद्ध लेखनासंबंधी दोष आहेत.

**उपाय :**

1. मुलांना पेन, पेन्सिल योग्य रितीने फक्त दोन बोटांनी पकडण्याची सवय लावणे.
2. मुलांना रेषा, वर्तुळ, अर्धवर्तुळ रेखाटण्याचा सराव देणे.
3. तीन रेघी, दोन रेघी वह्यांचा वापर करणे.
4. मुलांना सरळ रेषेत लेखनाची सवय लावणे.
5. दोन अक्षरांत, दोन शब्दांत योग्य अंतर ठेवण्याचा सराव घेणे.
6. चांगल्या हस्ताक्षरांचे नमुने विद्यार्थ्यांना दाखवणे.
7. शाळेमध्ये हस्ताक्षर स्पर्धा घेणे.

**आ) शुद्धलेखनासंबंधी दोष :**

ऱ्हस्व-दीर्घचा दोष. उदा. दीन-दिन, सुर-सूर, वर्णाचा अयोग्य क्रम उदा. कमळ ऐवजी कळम, जोडाक्षरातील वर्णाचा अयोग्य क्रम उदा. पत्नी ऐवजी पन्ती, वाक्यात शब्दाचा अयोग्य क्रम सुविचार पाठ मीना करते,

शब्दांमध्ये अयोग्य अक्षरे विष ऐवजी विश, पाणी ऐवजी पानी, लिंग, वचानाचा अयोग्य वापर, उदा. चिमणी उडाला, चार आंबे होता. अनुस्वराचा अयोग्य वापर उदा. तूप-तूंप, संबध-सबंध, रफारचा अयोग्य वापर उदा. आशीर्वाद-आर्शिवाद, विरामचिन्हांचा अयोग्य वापर. इत्यादी शुद्धलेखनासंबंधी दोष दिसून येतात.

**उपाय :**

1. ऱ्हस्व – दीर्घाचे नियम विद्यार्थ्यांना समजून सांगणे.
2. विरामचिन्हांच्या वापराविषयी माहिती देणे.
3. विद्यार्थ्यांना अवांतर वाचन देणे.
4. विद्यार्थ्यांना अनुलेखन, दृकलेखन व श्रुतलेखन देणे.
5. विद्यार्थ्यांना दररोज ठराविक शुद्धलेखन देणे. ते शिक्षकांनी वेळोवेळी तपासून योग्य त्या
6. दुरुस्त्या करणे.
7. शुद्धलेखनाचे नमुने विद्यार्थ्यांना दाखवणे.
8. शुद्धलेखन स्पर्धा आयोजित करणे.
9. शिक्षकांनी स्वत: च्या शुद्धलेखनासंबंधी दक्षता घेणे.

**लेखन विकासासाठी उपक्रम (अध्ययन अनुभव) :**

**इयत्ता 1 ली व 2 री**

1. विद्यार्थ्यांकडून उभी-आडवी रेषा, अर्धवर्तुळ, वर्तुळ या मुळाक्षरांच्या अवयवांचा सराव
2. करून घेणे.
3. विद्यार्थ्यांच्या वाचनात येणारी मुळाक्षरे, जोडाक्षरे विद्यार्थ्याकडून लिहून घेणे.
4. विद्यार्थ्यांकडून मुळाक्षरे, बाराखडी, जोडाक्षरे यांचे श्रुतलेखन करून घेणे.
5. विद्यार्थ्यांकडून सोपी शब्द व सोपी वाक्यं यांचे दृकलेखन करून घेणे.
6. शिक्षकाने स्वत:फळ्यावर सुलेखन करून ते विद्यार्थ्यांकडून करून घेणे.
7. विद्यार्थ्यांकडून सोपी शब्दं व सोपी वाक्यं यांचे श्रुतलेखन करून घेणे.

**इयत्ता 3 री ते 4 थी :**

1. छोटे विषय देऊन त्यावर निबंध लिहून घेणे.
2. विद्यार्थ्यांकडून न पाहता सुलेखन करून घेणे.
3. विद्यार्थ्यांकडून विरामचिन्हासह लेखन करून घेणे.
4. विद्यार्थ्यांकडून परिच्छेद लेखन करून घेणे.

**इयत्ता 5 वी ते 8 वी :**

1. विद्यार्थ्यांकडून शुद्धलेखन करून घेणे.
2. विद्यार्थ्यांकडून पत्रलेखनाच्या प्रकारांचे लेखन करून घेणे.

3. विद्यार्थ्यांकडून वर्णनात्मक,कल्पनाप्रधान व आत्मकथनपर निबंध लेखन करून घेणे.
4. विद्यार्थ्यांकडून मुद्यांच्या आधारे कथालेखन करून घेणे.
5. विद्यार्थ्यांकडून सारांश लेखन, कल्पनाविस्तार लेखन करून घेणे.
6. शाळेमध्ये हस्ताक्षर, निबंध, शुद्धलेखन स्पर्धा आयोजित करणे.

**लेखनाचे मूल्यमापन :**

1) **लेखी परीक्षा :** लेखनाचे मूल्यमापन करण्यासाठी लेखी परीक्षा हे महत्त्वाचे साधन आहे. लेखी परीक्षेत तीन प्रकारचे प्रश्न असतात.

अ) वस्तुनिष्ठ प्रश्न ब) लघुत्तरी प्रश्न क) दीर्घोत्तरी प्रश्न

**अ) वस्तुनिष्ठ प्रश्न :**

वस्तुनिष्ठ प्रश्नाद्वारे इयत्ता 1 ली ते 3 रीच्या विद्यार्थ्यांचे अक्षर, शब्द, वाक्य इत्यादींचे लेखन, त्याचप्रमाणे सुलेखन, दृकलेखन, श्रुतलेखन यांचे मूल्यमापन करता येते.

उदा.

शब्द ऐका व तो शब्द लिहा.

शब्द वाचा व तो शब्द लिहा.

वाक्य वाचा व ते लिहा.

योग्य जोडया लावा.

रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा.

शब्दांचा योग्य क्रम लावून वाक्य परत लिहा.

खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे लिहा.

**आ) लघुत्तरी प्रश्न :**

लघुत्तरी प्रश्नांद्वारे विद्यार्थ्यांच्या लेखनातील शुद्धलेखन, वाक्यलेखन, शब्दसंपत्ती, सुलेखन इत्यादींचे मूल्यमापन करता येते.

**उदा.** (1) थोडक्यात उत्तरे लिहा.

(2) संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

**निबंधवजा प्रश्न:**

या प्रश्नाद्वारे विद्यार्थ्यांच्या लेखनातील शुद्धता, सुलेखन, परिच्छेद लेखन, आशययुक्तपणा, परिणामकारकता इत्यादींचे मूल्यमापन करता येते.

i. खालील एका विषयावर निबंध लिहा.
ii. मित्राला अभिनंदनपर पत्र लिहा.
iii. खालील मुद्यांच्या आधारे कथा पूर्ण करा.

अशा प्रकारे लेखी परीक्षेद्वारे विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याचे मूल्यमापन करता येते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचा वर्गपाठ, गृहपाठ इत्यादींची वेळोवेळी तपासणी करून शिक्षकाला मूल्यमापन करता येते.

## 2.3 सारांश :

शिक्षणातून एक परिपूर्ण व सुजाण नागरिक बनवणे हे आपले ध्येय असते. या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करतांना आपण निरनिराळे विषय शिकवतो. मराठी भाषेच्या अभ्यासातून मुलांचा भाषिक विकास घडून येतो. भाषा विकास म्हणजे श्रवण, भाषण, वाचन व लेखन या चार भाषिक क्षमतांचा विकास होय.

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

1. भाषा विकासात श्रवणाचे महत्व स्पष्ट करा ?
2. भाषणाचे प्रकार सांगा ?
3. भाषणाची उदिष्ट्ये स्पष्ट करा ?
4. वाचानासाठी उपक्रम सूचवा ?
5. लेखनाचे महत्व सांगा ?
6. लेखनाचे चार प्रकार स्पष्ट करा ?
7. लेखन विकासासाठी उपक्रम सूचवा ?

## 2.4 आपल्या प्रगतीच्या पडताळणीकरिता अपेक्षित उत्तरे :

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

**उत्तर :** मुद्दा क्र. 2.2 अभ्यासा.

## 2.5 कार्य वितरण :

श्रवण विकासाचे उपक्रम सांगा ?

भाषणाची अंगे सविस्तर स्पष्ट करा ?

## 2.6 कार्य :

वाचनाच्या अध्यापन पद्धती स्पष्ट करा ?

**2.7 प्रकरण अभ्यास (केस स्टडी) :**

श्रवण, भाषण, वाचन, लेखन क्षमतेतील दोष सांगून त्यात सुधारणा करण्याकरिता प्रभावी उपक्रम सूचवा ?

**2.8 संदर्भ पुस्तके** :


- अकोलकर, ग. वि. आणि पाटणकर, ना. वि., (1970), “मराठीचे अध्यापन”, पुणे, व्हीनस प्रकाशन.
- इंदुरकर, कल्याणी, (1998), “मराठीचे अध्यापन”, नागपूर, मंगेश प्रकाशन.
- करंदीकर, सुरेश आणि मंगरुळकर, मीना, (2004), “मराठी –आशय अध्यापन पद्धती”, पुणे, फडके प्रकाशन.
- कुंडले, म. बा., (1974), “मराठीचे अध्यापन”, पुणे, विद्या प्रकाशन.
- घोरमोडे, कला, (2008), “मराठी अध्यापन पद्धती”, नागपूर, विद्या प्रकाशन.
- पवार, ना. ग., (2006) “मातृभाषा मराठीचे आशययुक्त अध्यापन”, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.

## घटक 3 :अध्यापन पद्धती व तंत्र

**व्याख्यान, स्पष्टीकरण, कथाकथन, पर्यवेक्षित अभ्यास, संभाषण, भूमिका अभिनय, परिसंवाद, बुद्धीमंथन, आगमन- निगमन, भाषा प्रयोगशाला पद्धति. अध्यापन प्रक्रीयेत आधुनिक अध्यापन पद्धतीचा उपयोग.**

---

### घटक रचना

**3.0 घटक परिचय**
**3.1 शिक्षणाचे उद्देश**
**3.2 विषय विश्लेषण**
**3.2.1 अध्यापन पद्धती व तंत्र**
**3.2.1.1 व्याख्यान.**
**3.2.1.2 स्पष्टीकरण.**
**3.2.1.3 कथाकथन.**
**3.2.1.4 पर्यवेक्षित अभ्यास.**
**3.2.1.5 संभाषण.**
**3.2.1.6 भूमिका अभिनय.**
**3.2.1.7 परिसंवाद.**
**3.2.1.8 बुद्धीमंथन.**
**3.2.1.9 आगमन – निगमन.**
**3.2.1.10 भाषा प्रयोगशाला.**
**3.2.2. अध्यापन प्रक्रीयेत आधुनिक अध्यापन पद्धतीचा उपयोग.**
**3.3 सारांश**
**3.4 आपल्या प्रगतीच्या पडताळणीकरिता अपेक्षित उत्तरे**
**3.5 शब्दावली**
**3.6 कार्य वितरण**
**3.7 कार्य**
**3.8 प्रकरण अभ्यास (केस स्टडी)**
**3.9 संदर्भ पुस्तके**

---

### 3.0 घटक परिचय

विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, बौद्धिक पातळी, क्षमता, अनुभव इत्यादी बाबी शिक्षकाला लक्षात घ्याव्या लागतात. याची सुयोग्य व क्रमबद्ध मांडणी म्हणजेच अध्यापन पद्धती व अध्यापनाची तंत्रे होय. अध्यापनाच्या विविध पद्धतीची व अध्यापनाच्या तंत्राची माहिती शिक्षकाला असणे आवश्यक आहे. ज्या अभ्यास घटकासाठी जी

पद्धत व तंत्र सर्वोत्कृष्ठ आहे, तेथे त्या पद्धती व तंत्राचा वापर शिक्षकाला करता यायला हवा. मराठी अध्यापनाच्या विविध पद्धती व तंत्रे आहेत. उद्गामी, अवगामी, कथन, व्याख्यान, परिसंवाद, प्रकल्प, बुद्धीमंथन, तौलनिक, संभाषण, सर्वसमावेशक इत्यादी पद्धती भाषा अध्यापनाकरिता उपयुक्त व महत्त्वपूर्ण आहेत.

## 3.1 शिक्षणाचे उद्देश

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला पुढील कौशल्यात व क्षमतेत समर्थ होता येइल.

- ❖ विविध अध्यापन पद्धती व तंत्राचे ज्ञान प्राप्त करता येते.
- ❖ विविध अध्यापन पद्धती व तंत्राचा अर्थ समजून घेता येतो.
- ❖ विविध अध्यापन पद्धती व तंत्राचे महत्त्व समजून घेता येते.
- ❖ विविध अध्यापन पद्धती व तंत्राचे उपयोजनात्मक ज्ञान प्राप्त करता येते.
- ❖ विविध अध्यापन पद्धती व तंत्राच्या गुण –दोषाचे ज्ञान प्राप्त करता येते.
- ❖ विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धतीचा विकास करता येते.
- ❖ अध्ययन-अध्यापनात सुधारणा करता येते.

## 3.2 विषय विश्लेषण

### 3.2.1 अध्यापन पद्धती व तंत्र

भाषेच्या पाठ्यपुस्तकात गद्य-पद्य पाठ असतात. या पाठाच्या अनुषंगाने व्याकरण असते. वाचन, लेखन, वाक्प्रचार, म्हणी, शब्दार्थ, संदर्भ, प्रश्न, स्वाध्याय दिलेले असते. पाठाचा, लेखकाचा परिचय, पाठाची संहिता असते. भाषेच्या पाठ्यपुस्तकात चरीत्र-आत्मचरित्र, लघुकथा, प्रवासवर्णन, कादंबरीतील उतारा, नाट्यछटा, नाट्यप्रवेश, निबंध, पत्रे इत्यादी प्रकार असतात. पद्यातही संतकाव्य, भावगीत, पंडितीकाव्य, शाहिरी काव्य, नाट्यगीत, सुनीत, जनपद्गीत, दलित काव्य, निसर्ग कविता, आधुनिक कविता, नवकविता असे विविध प्रकार प्रामुख्याने दिसून येतात.

विद्यार्थ्यांचे अध्ययन गतिमान करू शकणारे अध्यापन प्रभावी अध्यापन मानले जाते. अध्यापकाची इच्छा असते की अध्यापन करताना ते विद्यार्थ्यांच्या अंत:करणापर्यंत जाऊन भिडावे. मातृभाषेचे अध्यापन करताना प्रभावी व्हावे, संस्कारक्षम व्हावे. अध्ययन गतिमान होण्यासाठी त्याला मानसशास्त्रीय बैठक असावी लागते. अध्यापनाच्या विविध पद्धती, तंत्रे, साधनांचा उपयोग करून अध्यापन प्रभावी करावे लागते. अध्यापनाच्या विविध पद्धतीचा उपयोग करतांना विद्यार्थ्यांचे वय, बौद्धिक क्षमताचाही विचार करावा लागतो.

शिक्षक विद्यार्थ्यांना आपण जी माहिती देतो ती परिणामकारकपणे देण्यासाठी शिक्षकांची व विद्यार्थ्यांची कृती निश्चित करावी लागते. याकरिता विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, बौद्धिक पातळी, क्षमता, अनुभव इत्यादी बाबी लक्षात घ्याव्या लागतात. याची सुयोग्य व क्रमबद्ध मांडणी म्हणजेच अध्यापन पद्धती व अध्यापनाची तंत्रे होय. अध्यापनाच्या विविध पद्धतीची व अध्यापनाच्या तंत्राची माहिती शिक्षकाला असणे

आवश्यक आहे. ज्या अभ्यास घटकासाठी जी पद्धत व तंत्र सर्वोत्कृष्ठ आहे तेथे त्या पद्धती व तंत्राचा वापर शिक्षकाला करता यायला हवा. मराठी अध्यापनाच्या विविध पद्धती व तंत्रे आहेत. उद्गामी, अवगामी, कथन, व्याख्यान, परिसंवाद, प्रकल्प, बुद्धीमंथन, तौलनिक, संभाषण, सर्वसमावेशक इत्यादी पद्धती भाषा अध्यापनाकरिता उपयुक्त व महत्त्वपूर्ण आहेत.

### 3.2.1.1 व्याख्यान पद्धती (Lecturer Method)

**प्रस्तावना :**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यासाठी व्याख्यान पद्धतीचा वापर प्रामुख्याने केला जातो. व्याख्यान पद्धतीत एखाद्या विषयावर, घटकावर शिक्षक अभ्यासपूर्ण माहिती, मते सलगपणे विद्यार्थ्यांना सांगत असतात. व्याख्यान ही शिक्षककेंद्री पद्धती असल्याने विद्यार्थ्यांचा सहभाग खूप कमी असतो. शिक्षकांना व्याख्यानासाठी शैक्षणिक साहित्याचा वापर करून विषयाची तयारी करून योग्य मांडणी करावी लागते.

**व्याख्यान पद्धतीचा अर्थ :**

"एखाद्या विषयावर किंवा घटकांवर शिक्षकाने शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर करून अभ्यासपूर्ण माहिती सलगपणे मांडणे म्हणजे व्याख्यान होय व या पद्धतीला व्याख्यान पद्धती असे म्हणतात."

**व्याख्यान पद्धती :**

व्याख्यान चालू असतांना श्रोत्यांची भूमिका विद्यार्थ्यांची असते. व्याख्यान श्रवणीय, चैतन्यपूर्ण, औत्सुक्यपूर्ण असेल तर विद्यार्थ्यांचे अवधान राहते. बोलणाऱ्या वक्त्याची गती, लय, शब्दसंपदा, तयारी यावर विद्यार्थ्यांचे आकलन अवलंबून असते. विद्यार्थ्याला एकाचवेळी श्रवण, आकलन, लेखन इत्यादी विविध कृती करतांना त्यांची तारेवरची कसरत होते. परिणामी निश्चित केलेली उद्धीष्ट्ये साध्य होण्यात अडथळा निर्माण होतो.

एखाद्या विषयासंबंधी माहिती सहजासहजी देण्यासाठी व्याख्यान पद्धतीचा चांगला उपयोग करता येतो. व्याख्यान चांगले व्हायचे असेल तर विविध उदाहरणांनी, दाखल्यांनी, कथांनी, प्रसंगांनी व्याख्यानात रंजकता आणावी लागते. वक्त्याचे शब्द सामर्थ्य प्रभावी असावे लागते. व्याख्यानात सहजता, स्पष्टपणा, आवाजातील चढउतार, विनोदप्रचुर निवेदन, मुद्द्याची मांडणी, पूर्वनियोजन, तयारी व्यवस्थित असावी लागते. व्याख्यानात विषयांतर टाळून बोलण्यात रंजकता, विनोद बुद्धी, सहजता असेल, उदाहरणे, दृष्टांत देण्यात हातखंडा असेल तर व्याख्यान चांगले रंगते व त्याचा परिणामही विद्यार्थ्यांवर उत्तम व प्रभावी होतो.

व्याख्यान पद्धतीचे गुणदोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**गुण :**

1) व्याख्यान पद्धतीचा उपयोग तत्त्व, सिद्धांत व कठीण विषय मांडण्यासाठी होतो.
2) नवीन माहिती, घटना, प्रसंग, निवेदनासाठी व्याख्यान पद्धतीसारखा दुसरा मार्ग नाही.
3) विविध साधनांचा प्रभावी वापर करून व्याख्यान देता येते.
4) मोठा घटक कमी कालावधीत पूर्ण करता येते.
5) रसग्रहण चांगल्याप्रकारे करता येतो.
6) प्रभावी व्याख्यानाच्या सहायाने भावनांना आवाहन करता येते.
7) दुर्मिळ व महत्त्वपूर्ण माहिती सहज देता येते.

8) विशिष्ट भाषाशैलीची प्रचिती व भाषेवरील प्रभाव व्याख्यान पद्धतीमुळे कळू शकते.
9) विद्यार्थ्यांची विचार अभिव्यक्ती विकसित करण्याकरिता उपयुक्त आहे.

**दोष :**

1) व्याख्यान पद्धतीत विद्यार्थी निष्क्रिय बनतात.
2) विद्यार्थ्यांच्या विचार, आकलन, तर्कशक्तीचा विकास योग्य प्रकारे होत नाही.
3) विद्यार्थ्यांचे अवधान सातत्य राहत नाही.
4) व्याख्यान दीर्घकाळ असल्याने विद्यार्थ्यांचे मन एकाग्र होत नाही.
5) व्याख्यात्याच्या ठिकाणी व्याख्यान कौशल्य नसतील तर निट आकलन होत नाही.
6) व्याख्यान रंजक, रोचक, क्रियाशील, प्रभावी नसेल तर श्रोत्यांना कंटाळा येतो.
7) निम्न वर्गातील विद्यार्थ्यांकरिता ही पद्धती अनुपयुक्त आहे.

### 3.2.1.2 स्पष्टीकरण पद्धती (Explanation Method)

**प्रस्तावना :**

विविध विचार, कल्पना शब्दातीत असतात. यातील नेमका अर्थ अनेकदा लक्षात येत नाही. परिणामी निश्चित आकलन होत नाही. याकरिता कथा, उदाहरणे, दाखले, चित्र, अनुभव सामानार्थी – विरुद्धार्थी शब्द, वाक्प्रचार इत्यादिचा उपयोग करावा लागतो.

**स्पष्टीकरण पद्धतीचा अर्थ :**

"कठीण व गूढ कल्पनांचे, विचाराचे वा तत्त्वाचे ज्यावेळी शब्दार्थ, उदाहरणे-दाखले, कथा- प्रसंग- गोष्टी याद्वारे स्पष्ट करतात, तेंव्हा त्या पद्धतीला स्पष्टीकरण पद्धती म्हणतात."

**स्पष्टीकरण पद्धती :**

विचार, कल्पना स्पष्ट करावयाच्या असल्यास स्पष्टीकरणाच्या सहाय्याने हे कार्य तडीस न्यावे लागते. शब्दार्थ, उदाहरणे-दाखले, कथा- प्रसंग- गोष्टी याद्वारे स्पष्टीकरण करता येते. भाषा शिकवितांना शब्दाचे वाक्प्रचार व म्हणीचे वेळोवेळी स्पष्टीकरण करावे लागते. कठीण व गूढ कल्पनांचे, विचाराचे वा तत्त्वाचे स्पष्टीकरण करण्याकरिता दाखले वा दृष्टांत उपयुक्त ठरतात. शिक्षकांनी अध्यापन करतांना दाखले व दृष्टांताचा योग्य उपयोग करावा. अनेकदा कथा- प्रसंग- गोष्टी याद्वारे कल्पना, विचारांचे स्पष्टीकरण करता येते.

विद्यार्थ्यांना समजेल अशा उदाहरणे, दाखले, कथा, प्रसंग, गोष्टी यांची निवड करावी. त्यातून निश्चित अर्थबोध व्हावा. विद्यार्थ्यांच्या अनुभव क्षेत्रातील उदाहरणे, दाखले व दृष्टांताचा वापर करावा. विद्यार्थ्यांचे वय, क्षमता, अनुभव याचाही विचार करावा. स्पष्टीकरण करतांना विविध उदाहरणाचा उपयोग करावा व उदाहरणात विविधता असावी.

आकलन पातळीच्या वरील वर्णने, कथाप्रसंग स्पष्ट करण्यासाठी चित्रात्मक साधनाचा योग्य उपयोग शिक्षकाने करावा. स्पष्टीकरण करतांना सामानार्थी व विरुद्धार्थी शब्दाचा वापर करावा. स्पष्टीकरणातील उणीवा फळ्याच्या सहाय्याने दूर करता येते. या विविध उपायाद्वारे विद्यार्थ्यांचे अनुभव क्षेत्र व्यापक करता येते.

स्पष्टीकरण पद्धतीचे गुणदोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**गुण :**

1. कठीण व गूढ कल्पनांचे, विचाराचे वा तत्त्वाचे निट आकलन करता येते.
2. कठीण व गूढ कल्पनांचे, विचाराचे वा तत्त्वाचे स्पष्टीकरण करता येते.
3. निश्चित अर्थबोध होतो.
4. विद्यार्थ्यांचे अनुभव क्षेत्र व्यापक करता येते.

**दोष :**

1. निम्न वयोगटाकरिता अनुपयुक्त आहे.
2. शिक्षकांना विशेष प्रयत्न करावे लागते.
3. विद्यार्थ्यांत निरसता उत्पन्न होते.
4. सहज आकलन होत नाही.

### 3.2.1.3 कथाकथन (Story Teling Method)

**प्रस्तावना :**

कथाकथन ही ज्ञान प्राप्तीची प्राचीन पद्धती आहे. आजी- आजोबा आपल्या नातवंडांना परींच्या कथा, महापुरुषांच्या कथा, पौराणिक कथा, साहस कथा सांगत असत. कथाकथनातून हास्यनिर्मिती, बोधनिर्मिती, मूल्यनिर्मिती, संस्कारनिर्मिती घडून येत असे. लहान मुलांना कथांची फार ओढ असते. ते वारंवार कथा सांगण्याचा आग्रह धरतात. बालकांचे अवधान प्रदीर्घ काळ टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य कथेमध्ये असते.

**कथाकथन पद्धतीचा अर्थ :**

"एखादा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी किंवा पाठातील मध्यवर्ती कल्पना विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्यासाठी शिक्षक आपल्या विवेचनाला जेंव्हा कथेची जोड देतो, तेंव्हा त्या पद्धतीला कथाकथन पद्धती असे म्हणतात."

**कथाकथन पद्धती :**

शिक्षकाचे कथाकथन रसाळ होण्याकरिता कथांचा संग्रह शिक्षकाजवळ असणे अत्यंत आवश्यक असते. परींच्या कथा, महापुरुषांच्या कथा, पौराणिक कथा, साहस कथा अशा विविध कथा शिक्षकाला मुखोद्गत असाव्या लागतात. कथाकथनाकरिता शिक्षकाने कथा वाचन न करता कथा कथन करावी. शिक्षकाने कथा प्रथम समजून घ्यावी व नंतर विद्यार्थ्यांना सांगावी. कथेतील महत्त्वाच्या घटना, व्यक्ती, प्रसंग, गर्भार्थ याचे विस्मरण होऊ नये. कथेतून विद्यार्थ्यांवर मूल्य संस्कार व्हावेत. कथानकाची भाषा सोपी, सरळ, ओघवती, रसाळ, रंजक, विनोदप्रचुर, लक्षवेधक असावी. कथाकथनातून हास्यनिर्मिती, बोधनिर्मिती, मूल्यनिर्मिती, संस्कारनिर्मिती व्हावी. शिक्षकाने प्रसंगी विद्यार्थ्यालाही कथा कथनाची संधी द्यावी. रोचक पद्धतीने प्रसंगाचे सुरेख चित्रण कथाकथनातून करावे. प्रामुख्याने व्यक्ती वैशिष्ट्ये चित्रित करण्याचा कथाकथनाचा उद्देश्य असतो.

कथाकथन पद्धतीचे गुणदोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**गुण :**

1. कथाकथनामुळे अध्यापन रंजक होते.
2. कथाकथनातून हास्यनिर्मिती, बोधनिर्मिती, मूल्यनिर्मिती, संस्कारनिर्मिती घडून येते.
3. विद्यार्थ्यांना ही कथाकथनाची संधी प्राप्त होते.
4. बालकांचे अवधान प्रदीर्घ काळ टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य कथेमध्ये असते.

**दोष :**

1. शिक्षकांजवळ विविध कथा संग्रहाचा अभाव असल्यास अडचणी निर्माण होतात.
2. शिक्षकाला कथा मुखोद्गत असाव्या लागतात.
3. कथेतील महत्त्वाच्या घटना, व्यक्ती, प्रसंग, गर्भार्थ याचे विस्मरण होऊ शकते.
4. वेळेचा अपव्यय होवू शकतो.

### 3.2.1.4 पर्यवेक्षित अभ्यास (Supervised Study)

**प्रस्तावना :**

अभ्यास कसा करावा हे विद्यार्थ्यांना कळत नाही. अभ्यासाची निश्चित व योग्य पद्धत अवगत नसते. अभ्यासाचे योग्य तंत्र माहिती नसल्याने असंख्य विद्यार्थी परीक्षेत अयशस्वी होतात. सतत अनुत्तीर्ण झाल्याने असंख्य विद्यार्थी शिक्षण सोडून देतात. स्व:त अभ्यास करून यश प्राप्तीचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांना नसतो. स्वयं अभ्यासाचे तंत्र अवगत नसल्याने आवश्यकता नसतांनाही शिकवणी वर्ग लावून पैसा व वेळेचा अपव्यय करतात. टिपणे काढणे, मुकवाचन करणे, वाचलेले लक्षात ठेवणे, समजून घेणे, स्मरणात ठेवणे इत्यादी गोष्टी निट करता येत नाही. आर्थिक परिस्थितीमुळे अभ्यासाचे वातावरण, पाठ्यपुस्तके, ग्रंथ, संदर्भ पुस्तके, शब्दकोश, लेखन साहित्य उपलब्ध नसते. परिणामी विद्यार्थी अभ्यासात मागे पडतात. अध्ययनाचे तंत्र अवगत करून योग्य मार्गाने अध्ययन करण्यासाठी पर्यवेक्षित अभ्यास तंत्राची आवश्यकता भासते.

**पर्यवेक्षित अभ्यास तंत्राचा अर्थ :**

“विद्यार्थी स्वत: अभ्यास करीत असतांना अध्ययन प्रक्रियेत त्याला उत्तेजन देणे आणि मार्गदर्शन करून त्याला स्वावलंबी व कार्यक्षम बनविण्याचे जे कार्य शिक्षक उपस्थित राहून करीत असतात, त्या कार्यास पर्यवेक्षित अध्ययन असे म्हणतात.”

**पर्यवेक्षित अभ्यास तंत्र :**

पर्यवेक्षित अभ्यास म्हणजे शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार आणि शिक्षकांच्या नियंत्रणाखाली विद्यार्थ्यांकडून केला जाणारा अभ्यास म्हणजे पर्यवेक्षित अभ्यास होय. पर्यवेक्षित अभ्यास वर्गात, ग्रंथालयात वसतिगृहात करता येतो. पर्यवेक्षित अभ्यासाच्या यशस्वीतेकारिता विद्यार्थ्यांचा उत्साहवर्धक व सक्रीय सहभाग आवश्यक असतो. पाठ्यघटकाची माहिती घेणे व उजळणी करणे हा या तंत्राचा उद्देश्य असतो. पर्यवेक्षित अभ्यास तंत्राकरिता पाठ्यपुस्तक, ग्रंथ, संदर्भ पुस्तके, कोश, नकाशे, तक्ते इत्यादी साधने व मार्गदर्शक शिक्षकाची आवश्यकता असते. या तंत्राच्या यशस्वितेकरिता मार्गदर्शक शिक्षकाची भूमिका व जबाबदारी महत्त्वपूर्ण असते.

पर्यवेक्षित अभ्यास तंत्राचे गुणदोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**गुण :**

1. अभ्यासाचे योग्य तंत्र माहिती होते.
2. स्वयं अभ्यासाच्या पद्तीमुळे आत्मविश्वास वृद्धींगत होतो.
3. वेळ, पैसा व श्रमाची बचत करता येते.
4. पाठ्यघटकाची माहिती घेणे व उजळणी करण्याकरिता उपयुक्त ठरते.

**दोष :**

1. शिक्षकांच्या मार्गदर्शन व नियंत्रणाचा अभाव जाणवतो.
2. विद्यार्थ्यांचा उत्साह कायम टिकत नाही.
3. विद्यार्थ्यांचा सतत सक्रीय सहभाग राहत नाही.
4. वेळेचा अपव्यय होतो.

### 3.2.1.5 संभाषण पद्धती (Dialog Method)

**प्रस्तावना :**

संभाषण हा शब्द 'भाषण' या धातुसाधित नामापासून आला आहे. संभाषण म्हणजे सं + भाष् होय. अर्थातच संभाषण म्हणजे एखाद्या विषयाबाबत दोन किंवा अधिक व्यक्तीत होणारे बोलणे म्हणजे संभाषण होय. संभाषणात एक- दुसऱ्याची ओळख करणे, बोलणे, प्रश्न विचारणे, उत्तरे देणे, सूचना करणे, विनंती करणे, आज्ञा करणे या बाबींचा समावेश होतो.

**संभाषण पद्धतीचा अर्थ :**

"स्वत:चे विचार व्यक्त करणे व दुसऱ्याचे विचार ऐकून घेवून संभाषण कौशल्य विकसित करण्याच्या पद्धतीला संभाषण पद्धती म्हणतात."

**संभाषण पद्धती :**

संभाषण परिणामकारक होण्याकरिता संभाषण कौशल्य विकसित करावे लागते. संभाषणात आपुलकी असावयास हवी. स्व:तचे विचार व्यक्त करणे व दुसऱ्याचे विचार ऐकून घेणे महत्त्वाचे असते. संभाषण श्रवणीय, भावपूर्ण, आकर्षक, मैत्रीयुक्त, आपुलकीपूर्ण असावयास हवे. संभाषण शिष्टाचारयुक्त असावे. संभाषण कौशल्य विद्यार्थ्यात विकसित करण्यासाठी शिक्षकाने जाणीवपूर्वक प्रयत्न करावयास हवे. प्राथमिक व माध्यमिक शाळेत संभाषण कौशल्य विकसित करण्याचे प्रयत्न कसोसीने करावे. संभाषण पद्धतीचा अवलंब करून विद्यार्थ्यात संभाषण क्षमता व संभाषण कौशल्य विकसित करता येते. विविध प्रसंग निर्माण करून संभाषण कौशल्य विकसित करता येते. संभाषण तुटक, निरस, रूक्ष होऊ नये याची दक्षता घ्यावी. संभाषण कौशल्याच्या सहाय्याने दोन व्यक्तीतील संभाषण प्रभावी, भावपूर्ण होण्यास मदत होते.

निम्न वर्गाकरिता संभाषण पद्धती उपयुक्त ठरते. या वयोगटातील विद्यार्थ्यांना संभाषण उत्तम प्रकारे शिकविता येते. संभाषणाचे कौशल्य विकसित झाल्यास विद्यार्थ्यांना भविष्यात उत्कृष्ट संभाषण करता येते. चांगल्या संभाषनाद्वारे परस्परातील भावबंध जोपासता येते. व्यक्तिमत्व विकासातील महत्त्वपूर्ण घटक संभाषण कौशल्य होय. संभाषण कौशल्य आत्मसात असणारा शिक्षक विद्यार्थ्यात संभाषण कौशल्य संक्रमित करू शकतो.

संभाषण पद्धतीचे गुणदोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**गुण :**

1. स्वत:चे विचार व्यक्त करणे व दुसऱ्याचे विचार ऐकून घेण्याची क्षमता विकसित करता येते.
2. विद्यार्थ्यात संभाषण क्षमता व संभाषण कौशल्य विकसित करता येते.
3. निम्न वर्गाकरिता संभाषण पद्धती उपयुक्त ठरते.
4. चांगल्या संभाषनाद्वारे परस्परातील भावबंध जोपासता येते.
5. व्यक्तिमत्व विकासाकरिता संभाषण महत्त्वपूर्ण असते.

**दोष :**

1. संभाषण तुटक, निरस, रूक्ष झाल्यास संभाषण कौशल्य विकसनात बाधा निर्माण होते.
2. उच्च वयोगटाकरिता अनुपयुक्त आहे.

### 3.2.1.6 भूमिका अभिनय (Role Playing)

**प्रस्तावना :**

भाषा अध्यापनाचे अविभाज्य अंग भूमिका अभिनय होय. भाषेच्या शिक्षकात कलावंताचे गुण असले पाहिजे. तो एक चांगला नट असला पाहिजे. शिक्षकांचे वागणे- बोलणे, लिहिणे-वाचणे इतके परिणामकारक असले पाहिजे की अधिकांश कौशल्य त्यांच्या वर्तन-कृतीतून विद्यार्थ्यात संक्रमित व्हावे. भावपूर्ण वाचन, स्पष्ट उच्चार, मुद्राभिनय, आवाजातील चढउतार, हालचाल-हावभाव या बाबतीत परीपूर्ण कौशल्य भाषा शिक्षकात असावी. नाट्य वाचन, कविता वाचन, कथा आदर्श वाचन शिक्षकाने प्रभावीपणे करावे.

**भूमिका अभिनय पद्धतीचा अर्थ :**

"एखादा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी किंवा पाठातील मध्यवर्ती कल्पना विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्यासाठी शिक्षक आपल्या विवेचनाला जेंव्हा भूमिका अभिनयाची जोड देतो, तेंव्हा त्या पद्धतीला भूमिका अभिनय पद्धती असे म्हणतात."

**भूमिका अभिनय पद्धती :**

भूमिका अभिनय पद्धतीत भूमिका व अभिनय या दोन तंत्राचा समावेश असतो. याला इंग्रजीत 'Role Playing' असे म्हणतात. नाटकाप्रमाणे भूमिका अभिनयात लिखित संवाद वा तयार संहिता नसते. भूमिकाभिनयात उत्स्फूर्त व समायोजित नाट्यीकरण असते. दुसऱ्याची भूमिका करणे म्हणजे भूमिकाभिनय करणे होय. या पद्धतीचा अध्ययन-अध्यापनात वापर करून अनेक प्रसंग जिवंत निर्माण करता येतात. 'भातुकलीचा खेळ' व 'विद्यार्थी दिन' ही भूमिकाभिनयाचेच उदाहरण होय. इतिहासातील विविध प्रसंग, मराठीतील कथानक याची निवड भूमिका अभिनयाकरिता करता येईल. या पद्धतीचा योग्य वापर करून अध्ययन-अध्यापनाचे कार्य शिक्षकाला प्रभावी रीतीने करता येते. या पद्धतीत संवाद व अभिनयाला विशेष महत्त्व असते.

भूमिका अभिनय पद्धतीचे गुणदोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**गुण :**

1. अध्यापनात रंजकता, रसास्वाद वाढविता येते.

2. विद्यार्थ्यामध्ये भावनात्मकता, सहृदयता, संवेदनक्षमता विकसित करता येते.
3. अध्ययन-अध्यापनातील रूक्षता, निरसता, कंटाळा घालविता येतो.
4. अध्ययन-अध्यापन आनंददायी, फलदायी व परिणामकारक करता येते.
5. संपन्न व्यक्तिमत्व विकसित करता येते.
6. भाषेविषयी आस्था,अभिमान, रुची,साहित्तिक वृत्ती विकसित करता येते.

**दोष :**

1. सर्व पाठ्यांशाकरिता अनुपयुक्त ठरते.
2. कौशल्यपूर्ण शिक्षकांच्या अभावामुळे मर्यादा पडते.

### 3.2.1.7 परिसंवाद तंत्र (Symposium Techniques)

**प्रस्तावना :**

परिसंवाद पद्धती ही विद्यार्थी केंद्रित आधुनिक शिक्षण पद्धती आहे. या पद्धतीत विद्यार्थी स्व:त बोलतो, ऐकतो, विचार व्यक्त करतो, सहभाग घेतो. परिसंवादातील विचारविनियामुळे स्व:तचे विचार व्यक्त करणे व दुसऱ्याचे विचार ऐकणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडतात. या पद्धतीत विद्यार्थी व शिक्षक आणि परस्पर विद्यार्थ्यात आंतर्क्रिया घडत असते, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वासाठी उपयुक्त ठरते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा समग्र विकास घडवून आणण्यास ही पद्धती उत्तम आहे.चर्चेचा उत्तम पर्याय म्हणून परीसंवादाकडे बघितले जाते. उच्च वयोगटातील विद्यार्थ्याकरिता ही पद्धत योग्य व उपयुक्त आहे.

**परिसंवादाचा अर्थ :**

“दोन ते चार व्यक्तींनी एखाद्या विषयासंबंधी भिन्न-भिन्न दृष्टीकोन असलेली मते संक्षिप्त भाषेत मांडणे व त्यावर चर्चा करणे, याला परिसंवाद म्हणतात.”

**परिसंवाद पद्धती :**

परिसंवादाकरिता विद्यार्थ्यांच्या आवश्यकतेनुसार व आवडीनुसार विषयाची निवड करावी. निवडलेल्या विषयाची विविध आंगोपांगाची विभागणी करून चर्चेकरिता विविध मुद्यांची यादी तयार करावी. निवड केलेल्या विषयाची चर्चेकरिता मुख्य मुद्यांची मांडणी करावी. मुद्यांवर एकेक विद्यार्थ्याला चांगली तयारी करावयास सांगावे. संदर्भ पुस्तके, मासिके, वृत्तपत्र याचा उपयोग मुद्याच्या तयारीकरिता करावा. शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांकरिता अत्यंत उपयुक्त आहे. योग्य नियोजन परिसंवादाच्या यशस्वितेकरिता महत्वाचा घटक आहे. परीसंवादाकरिता निवड केलेल्या विषयाच्या मुद्यांची तयारी केलेले विद्यार्थी मुद्यांची मांडणी करतील, इतरांच्या प्रश्नाचे-शंकाचे निरसन करतील. या प्रसंगी विद्यार्थी शिक्षकांचे सहकार्य ही घेतील. परिसंवाद पद्धतीच्या सहाय्याने एखाद्या विषयावर सांगोपांग चर्चा घडवून आणता येते. संत साहित्य, दलित साहित्य, ललितनिबंध या साहित्य प्रकाराकरिता परिसंवादाचे उत्तम आयोजन करता येते.

परिसंवाद पद्धतीचे गुणदोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**गुण :**

1. विद्यार्थ्यात स्वयं विचार व्यक्त करण्याची व दुसऱ्याचे विचार एकूण घेण्याची सवय निर्माण होते.

2. परिसंवाद पद्धतीच्या सहाय्याने विद्यार्थ्यात आत्मविश्वास, विश्लेषण क्षमता, स्वयं अध्ययन क्षमता निर्माण होते.
3. विषयाच्या अनुषंगाने निवड केलेल्या मुद्यांच्या तयारी करिता पूरक वाचनाची सवय विद्यार्थ्यांना लागते.
4. विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना मिळून सृजनशीलतेचा विकास घडून येतो.
5. विषयाचे पृथ:करण, संश्लेषण करून विषयाची योग्य मांडणी करून सादरीकरण क्षमतांचा विकास होतो.

**दोष :**

1. विषयातील सर्वच घटकांना परिसंवाद पद्धती उपयुक्त ठरत नाही.
2. सर्व विद्यार्थ्यांना सहभागाची संधी मिळत नाही.
3. विद्यार्थी संख्या जास्त असल्यास मर्यादा पडते.
4. परिसंवादापूर्वी मार्गदर्शन व परिसंवादानंतरचे मूल्यांकन योग्य नसल्यास यशस्वीतेत मर्यादा पडते.

### 3.2.1.8 बुद्धीमंथन तंत्र (Brain Storming)

**प्रस्तावना :**

इ. स. 1957 मध्ये बुद्धीमंथन तंत्राचा वापर करण्याबाबत **आर्स बर्न** यांनी सुचविले. बुद्धीमंथन तंत्राचा उपयोग विविध अडचणी व समस्यावर उपाय शोधण्यासाठी करता येतो. व्यक्तीचे विचार, संकल्पना इत्यादींची अभिव्यक्ती करण्याची संधी बुद्धीमंथन तंत्राच्या सहायाने प्राप्त होते. इतरांचे विचार- कल्पना समजून घेणे, सुधारणा करण्याची सुविधा उपलब्ध बुद्धीमंथन तंत्रामध्ये प्राप्त होते. या पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या सृजनक्षमता, कल्पनाक्षमता, विचारशक्ती, तर्कशक्ती, सर्जनशीलता इत्यादीच्या विकासास वाव असतो.

**बुदधीमंथनाचा अर्थ :**

"शिक्षण क्षेत्रातील समस्या वैयक्तिक असो की सामुहिक स्वरूपाच्या असो या समस्यांच्या निराकरणाकरिता जेंव्हा अनेकांनी विचार करणे व त्या सोडविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होते, तेंव्हा वापरण्यात येणाऱ्या तंत्राला बुद्धीमंथन तंत्र म्हणतात."

**बुद्धीमंथन तंत्र :**

सामुहिक बुद्धी किंवा सामुहिक विचार वैयक्तिक बुद्धी व विचारापेक्षा महत्वाचा असतो. सामुहिक मंथनातून विविधांगी विचार विमर्श होवून विविध उपाय समोर येतात. समस्या निराकरणाची हे उत्तम तंत्र होय. ही विचार मंथनाची प्राचीन पद्धती असून खऱ्या अर्थाने ती बुद्धी परीक्षा होय. शब्दार्थ, वाक्यप्रचार, गद्य-पद्य यातील बारकावे, निबंधाची रचना इ. करीता उपयुक्त ठरते. बुद्धीमंथनात विद्यार्थ्यासमोर उपस्थित केलेल्या समस्येवर विविध अंगाने विद्यार्थी विचार करतात. या समस्येच्या संदर्भातील प्रश्नांचे निरसन केले जाते. अर्थातच एखाद्या समस्येची कारणे, अडचणी, उपाय इत्यादीवर सांगोपांग विचार बुद्धीमंथनात केला जातो. बुध्दीमंथन यशस्वी करण्याकरिता शिक्षकाची जबाबदारी महत्वाची आहे. विद्यार्थी प्रतिसाद, सहभाग, विचार प्रदर्शन, नेतृत्व क्षमता इत्यादी नोंदी शिक्षकाला नोंद पत्रिकेत करावयाच्या असतात. विद्यार्थ्यांसमोर समस्या मांडणे, उपाय सुचविण्याकरिता विद्यार्थ्यांना प्रेरित करणे, उपायांची यादी व प्रतवारी करणे, फेरविचार करणे,

उपायांची विद्यार्थ्यांच्या सहाय्याने निश्चिती करणे इ. कार्यात शिक्षकाने पुढाकार घेवून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवावा.

बुद्धीमंथन तंत्राचे गुणदोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**गुण :**

1. बुद्धीमंथन तंत्र सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे.
2. या तंत्राला विशिष्ट वर्गाचे बंधन नसते.
3. बुद्धीमंथन तंत्रामध्ये सर्वांना आपले विचार व्यक्त करण्याची व इतरांचे विचार ऐकण्याची संधी प्राप्त होते.
4. एखाद्या समस्येवर सांगोपांग चर्चा करता येते.
5. विद्यार्थ्यांना सखोल विचार करण्याची सवय लागते.
6. विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना प्राप्त होते.
7. वर्गात खेळीमेळीच्या वातावरणातून उत्साह वाढून निरसता कमी होते.

**दोष :**

1. बुद्धीमंथन तंत्र पाठ्यांशातील विचार, माहिती सांगण्यासाठी उपयुक्त ठरत नाही.
2. या तंत्राची यशस्विता नियोजनावर अवलंबून आहे.
3. नेतृत्व कौशल्यावर चर्चेचे यशापयश अवलंबून असते.
4. चर्चेच्या नोंदीमुळे चर्चेस संथगती येते.
5. तंत्राच्या यशस्वितेकरिता अचूक व मुद्देसूद विचार मांडण्याचे तंत्र विद्यार्थ्यांना अवगत नसल्यास सातत्यपूर्ण चर्चेस बाधा निर्माण होते.

### 3.2.1.9 आगमन-निगमन (Inductive- Deductive Method)

**प्रस्तावना :**

ज्ञान प्राप्तीची ही शास्त्रीय व आधुनिक पध्दती मानली जाते. पृथ:करण, वर्गीकरण, संश्लेषण या प्रक्रियेतून ज्ञान प्राप्त केले जाते. निगमन पद्धतीलाच उद्गामी पद्धती असे म्हणतात. आगमन पद्धतीलाच अवगामी पद्धती असे म्हणतात. उदाहरणातून नियम वा सिद्धांत निर्मिती व नियम वा सिद्धांत उदाहरणाद्वारे स्पष्ट करण्याची समग्र प्रक्रिया आगमन-निगमन पद्धतीच्या संयोगातून घडविता येते.

**आगमन-निगमन पध्दतीचा अर्थ** :

"उदाहरणातून नियम वा सिद्धांत निर्मिती व नियम वा सिद्धांत उदाहरणाद्वारे स्पष्ट करण्याची समग्र प्रक्रिया ज्या पद्धतीच्या संयोगातून घडविता येते, त्या पद्धतीस आगमन-निगमन पध्दती म्हणतात**.**"

**आगमन-निगमन पध्दती :**

निगमन पद्धतीलाच उद्गामी पद्धती असे म्हणतात. उद्गामी पद्धतीचा जनक **हर्बार्ट** या मानसशास्त्रज्ञास म्हटले जाते. व्याकरण, अलंकार, वृत्त इत्यादीच्या अध्यापनाकरीता ही पद्धत उपयुक्त ठरते. 'ज्ञाताकडून अज्ञाताकडे', 'विशिष्टाकडून सामान्याकडे', या अध्यापन सूत्रावर उद्गामी पद्धती आधारित आहे. पृथ:करण व वर्गीकरण करण्यापूर्वी विद्यार्थ्यासमोर अनेक उदाहरणे प्रस्तुत केली जातात. सामान्य घटक लक्षात घेऊन त्या आधारे नियम किंवा सिद्धांत तयार केला जातो. उद्गामी पद्धतीमध्ये उदाहरणाकडून नियम किंवा सिद्धांताकडे

जाण्याचा क्रम असतो. शिक्षक जितकी उदाहरणे देतील तितकी विद्यार्थ्यांची विषयासंबधीची संकल्पना स्पष्ट होते. उदाहरणे विद्यार्थ्यांच्या परिचयाची, सोपी, आकर्षक, सुबोध असावीत. पूर्वतयारी, विषयविस्तार, तुलना, सामान्यनियम, उपयोजन या उद्गामी पद्धतीच्या पायऱ्या आहेत.

पूर्वज्ञान व पूर्व अनुभव याची नवीन ज्ञान व नवीन अनुभवाशी पडताळणी करून ज्ञान प्राप्त करतात. पृथ:करण, संश्लेषण, साम्यता यानुसार अनुभवाशी तुलना करून सामान्य नियम बनविले जातात. सामान्य नियम वा सिद्धांत निर्मितीला या पद्धतीत अत्यंत महत्त्व आहे. विद्यार्थीही शिक्षकाच्या सहकार्याने प्रयत्नाअंती सामान्य नियम वा सिद्धांत मांडू शकतात. उद्गामी पद्धतीमुळे विद्यार्थ्यात संशोधनवृत्ती, चिकित्सकवृत्ती, स्वयंअध्ययनवृत्ती, अनुमान क्षमता, उपयोजनक्षमता विकसित होते.

आगमन पद्धतीलाच अवगामी पद्धती असे म्हणतात. उद्गामी पद्धतीच्या उलटा क्रम अवगामी पद्धतीचा आहे. उद्गामी पद्धतीला पूरक पद्धती म्हणून या पद्धतीचा उपयोग केला जातो. उद्गामी पद्धतीद्वारा प्रतिपादित झालेले नियम व सिद्धांत अवगामी पद्धतीद्वारे पडताळून बघितले जाते. अवगामी पद्धती ही उपयोजनात्मक कार्य करते. व्याकरण, अलंकार, वृत्त इत्यादीच्या अध्यापनाकरीता ही पद्धत उपयुक्त ठरते. 'सामान्याकडून विशिष्टाकडे', या अध्यापन सूत्रावर उद्गामी पद्धती आधारित आहे.

अवगामी पद्धतीत सुरवातीला नियम वा सिद्धांत सांगितला जातो. विविध उदाहरणाद्वारे नियम वा सिद्धांत स्पष्ट केला जातो. उद्गामी –अवगामी पद्धतीचा एकत्रित वापर प्रभावी अध्यापनास उपयुक्त ठरतो. ज्ञानाचे दृढिकरण, ज्ञानाचे उपयोजन याकरिता उद्गामी –अवगामी पद्धती परस्परपूरक ठरते.

आगमन-निगमन पद्धतीचे गुणदोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**गुण :**

1. व्याकरण, अलंकार, वृत्त इत्यादीच्या अध्यापनाकरीता ही पद्धत उपयुक्त ठरते.
2. पूर्वज्ञान व पूर्व अनुभव याची नवीन ज्ञान व नवीन अनुभवासी पडताळणी करून ज्ञान प्राप्त करतात.
3. सामान्य नियम वा सिद्धांत निर्मितीला या पद्धतीत अत्यंत महत्त्व आहे.
4. उद्गामी पद्धतीमुळे विद्यार्थ्यात संशोधनवृत्ती, चिकित्सकवृत्ती, स्वयंअध्ययनवृत्ती, अनुमान क्षमता, उपयोजनक्षमता विकसित होते.
5. उद्गामी पद्धतीद्वारा प्रतिपादित झालेले नियम व सिद्धांत अवगामी पद्धतीद्वारे पडताळून बघितले जाते.
6. अवगामी पद्धती ही उपयोजनात्मक कार्य करते.
7. विविध उदाहरणाद्वारे नियम वा सिद्धांत स्पष्ट केले जातात.

**दोष :**

1. ज्ञान प्राप्तीची कठीण पद्धती आहे.
2. वरिष्ठ वर्गाकरिताच केवळ उपयुक्त आहे.
3. सर्वच पाठ्य क्रमाकरिता उपयुक्त नाही.

### 3.2.1.10 भाषा प्रयोगशाला पद्धती (Langauge Leboratory Method)

**प्रस्तावना :**

विज्ञान विषयाकरिता प्रामुख्याने प्रयोगशाळेचा उपयोग सर्वश्रूत आहे. प्रयोग करून ज्ञान प्राप्त करण्याची वैज्ञानिक पद्धती सर्वोत्तम आहे. आज सर्वच विषयात शास्त्रीय पद्धतीने ज्ञान प्राप्त करण्याची परंपरा विकसित झाल्याने त्यांना शास्त्राचा दर्जा प्राप्त झाला आहे. मानव्यशास्त्र व भाषा विषयात ज्ञान प्राप्त करण्याकरिता प्रयोगाला प्राधान्य दिले जात आहे. शास्त्रीय ज्ञान प्राप्त करण्याकरिता मानव्यशास्त्र व भाषा विषयात प्रयोग पद्धतीचा उपयोग वाढत आहे. भाषा विषयाच्या अभ्यासाकरिता प्रयोगशाळेचा अधिकाधिक वापर होत आहे. भाषेची विविध कौशल्य प्राप्त करण्याकरिता भाषा प्रयोगशाळा पद्धतीचा उपयोग केला जातो. भाषा प्रयोगशाळा ही स्वयं अध्ययनाची प्रभावी पद्धत आहे.

**भाषा प्रयोगशाळा पद्धतीचा अर्थ :**

"व्याकरण, संभाषण, उच्चारण, लेखन, श्रवण, भाषण, वाचन इत्यादीकरिता भाषा प्रयोगशाळेचा उपयोग केला जातो , त्या पद्धतीला भाषा प्रयोगशाळा पद्धती असे म्हणतात."

**भाषा प्रयोगशाळा पद्धती :**

भाषण, लेखन, श्रवण, वाचन या मूलभूत कौशल्याकरिता प्रयोगशाळेचा उपयोग उत्तम ठरतो. प्रथम किंवा दुय्यम भाषा म्हणून मराठीतील विविध कौशल्य आत्मसात करण्याकरिता भाषा प्रयोगशाळेचा वापर उत्तम ठरतो. मराठी, हिन्दी, संस्कृत, पाली, प्राकृत, बंगाली, तेलगु या भारतीय भाषासोबतच इंग्रजी, जपानी, चीनी, स्पॅनिश इ. विदेशी भाषा अध्ययन करता येते. व्याकरण, संभाषण, उच्चारण, लेखन, श्रवण इत्यादीकरिता भाषा प्रयोगशाळेचा लाभ होतो. नियंत्रक मार्गदर्शकांच्या सहाय्याने उपलब्ध साधनसामुग्रीच्या आधारे भाषा प्रयोगशाळा कक्षात कौशल्य आत्मसात करता येते. नियंत्रक केद्र स्थानावरून नियंत्रण व सूचना प्रसारित करू शकतो. यातून विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनाची सवय लागते. विद्यार्थी स्वत:च्या क्षमता, गती, वेळ याच्या उपलबद्धतेनुसार कौशल्य आत्मसात करू शकते. भाषा प्रयोगशाळेत ध्वनित भाषापाठ, ध्वनिक्षेपक, ध्वनिग्राहक, ध्वनिवर्धक इ. साधनाची आवश्यकता होते.

भाषा प्रयोगशाळा पद्धतीचे गुणदोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**गुण :**

1. भाषा प्रयोगशाळा ही स्वयं अध्ययनाची प्रभावी पद्धत आहे.
2. व्याकरण, संभाषण, उच्चारण, लेखन, श्रवण, भाषण, वाचन इत्यादीकरिता उपयुक्त आहे.
3. भारतीय व विदेशी भाषेच्या अध्ययनाकारिता उपयुक्त आहे.
4. विद्यार्थी स्वत:च्या क्षमता, गती, वेळ यांच्या उपलबद्धतेनुसार कौशल्य आत्मसात करू शकतात.

**दोष :**

1. कुशल मार्गदर्शकाच्या अनुपलब्धतेचा अडसर निर्माण होतो.
2. सुसज्ज प्रयोगशाळेची उणीव भासते.
3. शिक्षक- विद्यार्थी आंतर्क्रिया कमी होतात.
5. आर्थीक तरतुदीचा अभाव जाणवतो.

### 3.2.2 अध्यापन प्रक्रीयेत आधुनिक अध्यापन पद्धती व तंत्राचा उपयोग (Uses of Modern Teaching Methods & Techniques In Teaching Process)

**प्रस्तावना :**

पाठाची रचना, पाठाचा प्रकार, इयत्ता, विद्यार्थी क्षमता इ. नुसार अध्यापन पद्धती व तंत्र वापरण्याचा शिक्षकांचा स्वतंत्र अधिकार असतो. मराठी भाषेच्या शिक्षकाने अध्यापनाच्या विविध पद्धती व तंत्राची माहिती समजून घेवून अध्यापनात त्याचा उपयोग केल्यास अध्यापन रंजक, प्रभावी, नाविन्यपूर्ण होते. नवनवीन अध्यापन पद्धतीच्या उपयोगावर अध्यापनाची व अध्ययनाची यशस्विता अवलंबून असते. अध्यापन प्रक्रियेत आधुनिक पद्धतीचे विविध उपयोग होतात, ते पुढीलप्रमाणे –

**अध्यापन प्रक्रियेत आधुनिक पद्धती व तंत्राचे विविध उपयोग :**

**प्रभावी अध्यापन :**

पाठाची रचना, पाठाचा प्रकार, इयत्ता, विद्यार्थी क्षमता इ. नुसार अध्यापन पद्धती व तंत्राची योग्य निवड केल्यास शिक्षकाचे अध्यापन प्रभावी होते. अध्यापन प्रभावी होण्याकरिता शैक्षणिक साधनाचा वापरही महत्त्वपूर्ण ठरतो.

**संस्कारक्षम अध्यापन :**

अध्यापकाची इच्छा असते की अध्यापन करताना ते विद्यार्थ्यांच्या अंत:करणापर्यंत जाऊन भिडावे. मातृभाषेचे अध्यापन करताना प्रभावी व्हावे, संस्कारक्षम व्हावे. कथाकथन ही ज्ञान प्राप्तीची प्राचीन पद्धती आहे. परींच्या कथा, महापुरुषांच्या कथा, पौराणिक कथा, साहस कथा इ. प्रकारच्या कथाकथनातून हास्यनिर्मिती, बोधनिर्मिती, मूल्यनिर्मिती, संस्कारनिर्मिती घडून येते.

**गतिमान अध्यापन :**

विद्यार्थ्यांचे अध्ययन गतिमान करू शकणारे अध्यापन प्रभावी अध्यापन मानले जाते. अध्यापन गतिमान होण्यासाठी त्याला मानसशास्त्रीय बैठक असावी लागते. अध्यापनाच्या विविध पद्धतीचा उपयोग करतांना विद्यार्थ्यांचे वय, बौद्धिक क्षमता याचाही विचार करावा लागतो.

**शैक्षनिक साधनाचा वापर :**

तक्ते, नकाशे, ग्लोब, चित्र, बाहुली नाट्य, दृकश्राव्य साधने इ. द्वारा अध्ययन- अध्यापनात रंजकता आणता येते. शैक्षणिक साधनाची विविधता विद्यार्थ्यांच्या अवधान केंद्रीकरणात सहाय्यक ठरते. रेडीओ, टेप रिकार्ड, सी. डी. प्लेअर, डी. व्ही. डी. प्लेयर, दूरदर्शन, संगणक, भ्रमणध्वनी (मोबाईल), इंटरनेट इ. तंत्र विज्ञानाच्या साधनाचा योग्य वापराने अध्ययन –अध्यापन प्रभावी करता येते.

**विद्यार्थी केंद्रितता :**

आजची शिक्षण पद्धती शिक्षक केंद्रित न राहता विद्यार्थी केंद्रित बनली आहे. शिक्षणाचे निर्धारित उद्देश्य विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे होय. संपूर्ण शिक्षण प्रक्रिया विद्यार्थी केंद्रित बनली आहे.

**अवधान केंद्रीकरण :**

विद्यार्थ्यांना समजेल अशा उदाहरणे-दाखले, कथा- प्रसंग- गोष्टी याची निवड करावी. त्यातून निश्चित अर्थबोध होवून विद्यार्थ्यांचे अवधान केंद्रित होईल. शैक्षणिक साधनाचा योग्य उपयोग अवधान

केंद्रीकरणाकरिता करता येते. शिक्षकाची हालचाल, हावभाव, आवाजातील चढउतार याद्वारेही अवधान केंद्रित करता येते.

**स्वयं अध्ययन :**

स्वत: अभ्यास करून यश प्राप्तीचा आत्मविश्वास प्राप्त करता येतो. पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ, ज्ञान कोश, मासिके, वर्तमान पत्र, माहिती तंत्रज्ञानाची विविध साधने याद्वारे स्वयं अध्ययन करू शकतात. स्वयं अध्ययन हे अध्ययनाचे अभिनव तंत्र आहे. अध्ययन सातत्य व वृद्धी करिता स्वयं अध्ययन महत्त्वपूर्ण आहे.

**मानसशास्त्रीय बैठक :**

विद्यार्थ्यांचे वय, बौद्धिक क्षमता याचाही विचार करावा लागतो. विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान, बौद्धिक पातळी, क्षमता, अनुभव ईत्यादी बाबी लक्षात घ्याव्या लागतात. विद्यार्थ्यांची आकलन क्षमता, वय, बुद्धी, भावनिक क्षमता, वैचारिक पातळी इत्यादीचा विचार करून अध्यापन पद्धती व तंत्राची निवड करावी लागते.

**रंजकता :**

विविध उदाहरणांनी, दाखल्यांनी, कथांनी, प्रसंगांनी व्याख्यानात रंजकता आणावी लागते. सहजता, स्पष्टपणा, आवाजातील चढउतार, विनोदप्रचुर, मुद्यांची मांडणी, पूर्वनियोजन, तयारी व्यवस्थित असावी लागते. विषयांतर टाळून बोलण्यात रंजकता, विनोद बुद्धी, सहजता असेल, उदाहरणे, दृष्टांत देण्यात हातखंडा असेल तर संवाद चांगले होते व त्याचा परिणामही विद्यार्थ्यावर उत्तम व प्रभावी होतो.

**व्यक्तिमत्व विकास :**

विद्यार्थ्याचा 'व्यक्तिमत्व विकास' हे शिक्षणाचे प्रधान उद्देश्य आहे. शाळा हे व्यक्तिमत्व विकासाचे महत्त्वाचे केंद्र आहे. विद्यार्थाचा शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक, बौद्धिक, नैतिक, वैचारिक इ. अंगाचा विकास शिक्षणाच्या माद्यमातून अपेक्षित आहे. शिक्षणातून उज्वल नागरिकांची निर्मिती करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे.

## 3.3 सारांश :

विद्यार्थ्यांचे अध्ययन व शिक्षकांचे अध्यापन प्रभावी होण्याकरिता विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, बौद्धिक पातळी, क्षमता, अनुभव ईत्यादी बाबी लक्षात घेवून पाठ्यांशाची सुयोग्य व क्रमबद्ध मांडणी करून अध्यापन पद्धती व अध्यापन तंत्राची निवड करावी लागते. एखाद्या विषयावर किंवा घटकांवर शिक्षकाने शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर करून अभ्यासपूर्ण माहिती सलगपणे मांडवी लागते. कठीण व गूढ कल्पनांचे, विचाराचे वा तत्त्वाचे ज्यावेळी शब्दार्थ, उदाहरणे-दाखले, कथा- प्रसंग- गोष्टी याद्वारे स्पष्ट करावे लागतात. एखादा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी किंवा पाठातील मध्यवर्ती कल्पना विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्यासाठी शिक्षक आपल्या विवेचनाला जेंव्हा कथेची जोड देतो. विद्यार्थी स्वत: अभ्यास करीत असतांना अध्ययन प्रक्रियेत त्याला उत्तेजन देणे आणि मार्गदर्शन करून त्याला स्वावलंबी व कार्यक्षम बनविण्याचे कार्य शिक्षकाला करावे लागते. स्व:तचे विचार व्यक्त करणे व दुसऱ्यांचे विचार ऐकून घेवून संभाषण कौशल्य विद्यार्थ्यात विकसित करावे लागते. एखादा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी किंवा पाठातील मध्यवर्ती कल्पना विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्यासाठी शिक्षक आपल्या विवेचनाला भूमिका अभिनयाची जोड द्यावी लागते. एखाद्या विषयासंबंधी भिन्न-भिन्न दृष्टीकोन असलेली तयारी संक्षिप्त भाषेत आयोजित करून त्यावर चर्चा घडवून आणावी लागते. शिक्षण क्षेत्रातील समस्या वैयक्तिक असो की सामुहिक स्वरूपाच्या असो या समस्याच्या निराकरणाकरिता

अनेकांनी विचार करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा लागतो. उदाहरणातून नियम वा सिद्धांत निर्मिती व नियम वा सिद्धांत उदाहरणाद्वारे स्पष्ट करण्याची क्षमता विद्यार्थ्यात निर्माण करावी लागते. व्याकरण, संभाषण, उच्चारण, लेखन, श्रवण, भाषण, वाचन इत्यादी क्षमताकरिता भाषा प्रयोगशाळेचा उपयोग करावा लागतो.

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

- व्याख्यान पद्धतीचे गुणदोष स्पष्ट करा.
- स्पष्टीकरण पद्धतीचे गुणदोष स्पष्ट करा.
- कथाकथन पद्धतीचे गुणदोष स्पष्ट करा.
- पर्यवेक्षित अभ्यास तंत्राचे गुणदोष स्पष्ट करा.
- संभाषण पद्धतीचे गुणदोष स्पष्ट करा.
- भूमिका अभिनय पद्धतीचे गुणदोष स्पष्ट करा.
- परिसंवाद पद्धतीचे गुणदोष स्पष्ट करा.
- बुद्धीमंथन तंत्राचे गुणदोष स्पष्ट करा.
- आगमन-निगमन पद्धतीचे गुणदोष स्पष्ट करा.
- भाषा प्रयोगशाळा पद्धतीचे गुणदोष स्पष्ट करा.
- अध्यापन प्रक्रियेत आधुनिक पद्धतीचे विविध उपयोग वर्णन करा.

## 3.4 आपल्या प्रगतीच्या पडताळणीकरिता अपेक्षित उत्तरे :

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

**उत्तर :** मुद्दा क्र. 3.2.1 व 3.2.2 अभ्यासा.

## 3.5 शब्दावली :

**अध्यापन पद्धती :**

"विद्यार्थ्यांचे अध्ययन व शिक्षकांचे अध्यापन प्रभावी होण्याकरिता विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, बौद्धिक पातळी, क्षमता, अनुभव इत्यादी बाबी लक्षात घेवून पाठ्यांशाची सुयोग्य व क्रमबद्ध मांडणी म्हणजेच अध्यापन पद्धती व अध्यापनाची तंत्रे होय."

**व्याख्यान पद्धती :**

"एखाद्या विषयावर किंवा घटकांवर शिक्षकाने शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर करून अभ्यासपूर्ण माहिती सलगपणे मांडणे म्हणजे व्याख्यान होय व या पद्धतीला व्याख्यान पद्धती असे म्हणतात."

**स्पष्टीकरण पद्धती :**

"कठीण व गूढ कल्पनांचे, विचाराचे वा तत्त्वाचे ज्यावेळी शब्दार्थ, उदाहरणे-दाखले, कथा- प्रसंग- गोष्टी याद्वारे स्पष्ट करतात, तेंव्हा त्या पद्धतीला स्पष्टीकरण पद्धती म्हणतात."

**कथाकथन पद्धती :**

"एखादा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी किंवा पाठातील मध्यवर्ती कल्पना विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्यासाठी शिक्षक आपल्या विवेचनाला जेंव्हा कथेची जोड देतो, तेंव्हा त्या पद्धतीला कथाकथन पद्धती असे म्हणतात."

**पर्यवेक्षित अभ्यास तंत्र :**

"विद्यार्थी स्वत: अभ्यास करीत असतांना अध्ययन प्रक्रियेत त्याला उत्तेजन देणे आणि मार्गदर्शन करून त्याला स्वावलंबी व कार्यक्षम बनविण्याचे जे कार्य शिक्षक उपस्थित राहून करीत असतात, त्या कार्यास पर्यवेक्षित अध्ययन असे म्हणतात."

**संभाषण पद्धती :**

"स्वत:चे विचार व्यक्त करणे व दुसऱ्याचे विचार ऐकून घेवून संभाषण कौशल्य विकसित करण्याच्या पद्धतीला संभाषण पद्धती म्हणतात."

**भूमिका अभिनय पद्धती :**

"एखादा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी किंवा पाठातील मध्यवर्ती कल्पना विद्यार्थ्याच्या मनावर ठसविण्यासाठी शिक्षक आपल्या विवेचनाला जेंव्हा भूमिका अभिनयाची जोड देतो, तेंव्हा त्या पद्धतीला भूमिका अभिनय पद्धती असे म्हणतात."

**परिसंवाद :**

"दोन ते चार व्यक्तींनी एखाद्या विषयासंबंधी भिन्न-भिन्न दृष्टीकोन असलेली तयारी संक्षिप्त भाषेत करणे व त्यावर चर्चा करणे, याला परिसंवाद म्हणतात."

**बुद्धीमंथन तंत्र :**

"शिक्षण क्षेत्रातील समस्या वैयक्तिक असो की सामुहिक स्वरूपाच्या असो या समस्यांच्या निराकरणाकरिता जेंव्हा अनेकांनी विचार करणे व त्या सोडविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होते, तेंव्हा वापरण्यात येणाऱ्या तंत्राला बुद्धीमंथन तंत्र म्हणतात."

**आगमन-निगमन पध्दती :**

"उदाहरणातून नियम वा सिद्धांत निर्मिती व नियम वा सिद्धांत उदाहरणाद्वारे स्पष्ट करण्याची समग्र प्रक्रिया ज्या पद्धतीच्या संयोगातून घडविता येते, त्या पद्धतीस आगमन-निगमन पध्दती म्हणतात."

**भाषा प्रयोगशाळा पद्धती :**

"व्याकरण, संभाषण, उच्चारण, लेखन, श्रवण, भाषण, वाचन इत्यादीकरिता भाषा प्रयोगशाळेचा उपयोग केला जातो , त्या पद्धतीला भाषा प्रयोगशाळा पद्धती असे म्हणतात."

**3.6 कार्य वितरण :**

प्रभावी अध्यापनाकरिता विविध अध्यापन पद्धतींचे महत्त्व व उपयोग सांगा ?
प्रभावी अध्यापनाकरिता विविध अध्यापन तंत्राचे महत्त्व व उपयोग सांगा ?
अध्यापन पद्धतीचा अर्थ स्पष्ट करून व्याकरण अध्यापनाच्या सर्वोत्तम पद्धतीचे वर्णन करा ?
अध्यापन तंत्राचा अर्थ स्पष्ट करून स्वयं अध्ययनाकरिता सर्वोत्तम तंत्राचे वर्णन करा ?
प्रभावी अध्ययनाकरिता विद्यार्थी केंद्रित आधुनिक अध्यापन पद्धती व तंत्र सुचवा.

**3.7 कार्य :**

विविध अध्यापन पद्धतीच्या वैशिष्ट्यांचे प्रभावी अध्ययनाकरिता तुलनात्मक वर्णन करा ?
विविध अध्यापन तंत्राच्या वैशिष्ट्यांचे प्रभावी अध्ययनाकरिता तुलनात्मक वर्णन करा ?

**3.8 प्रकरण अभ्यास (केस स्टडी) :**

विविध अध्यापन पद्धती व तंत्राच्या सहाय्याने प्रभावी अध्यापनाकरिता शिक्षकाला कोणकोणती कौशल्य व क्षमता आत्मसात करता येईल ?

**3.9 संदर्भ पुस्तके** :


- अकोलकर, ग. वि. आणि पाटणकर, ना. वि., (1970), "मराठीचे अध्यापन", पुणे, व्हीनस प्रकाशन.
- इंदुरकर, कल्याणी, (1998), "मराठीचे अध्यापन", नागपूर, मंगेश प्रकाशन.
- करंदीकर, सुरेश आणि मंगरुळकर, मीना, (2004), "मराठी –आशय अध्यापन पद्धती", पुणे, फडके प्रकाशन.
- कुंडले, म. बा., (1974), "मराठीचे अध्यापन", पुणे, विद्या प्रकाशन.
- घोरमोडे, कला, (2008), "मराठी अध्यापन पद्धती", नागपूर, विद्या प्रकाशन.
- पवार, ना. ग., (2006) "मातृभाषा मराठीचे आशययुक्त अध्यापन", पुणे, नित्य नूतन प्रकाशन.

## घटक 4 : अध्यापन अनुभवाचे नियोजन

**सूक्ष्म नियोजन, दैनंदिन पाठ नियोजन, घटक नियोजन, वार्षिक नियोजन. मूल्यांकन- मूल्यांकनाचे तंत्र, परीक्षा पद्धती -लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रश्न प्रकार, परीक्षा पद्धतीचे गुणदोष.**

### घटक रचना

**4.0 घटक परिचय**
**4.1 शिक्षणाचे उद्देश**
**4.2 विषय विश्लेषण**
**4.2.1. अध्यापन अनुभवाचे नियोजन**
**4.2.2 सूक्ष्म नियोजन**
**4.2.3 दैनंदिन पाठ नियोजन**
**4.2.4 घटक नियोजन**
**4.2.5 वार्षिक नियोजन**
**4.2.6 मूल्यांकन – मूल्यांकनाचे तंत्र**
**4.2.7 परीक्षा पद्धती**
**4.3 सारांश**
**4.4 आपल्या प्रगतीच्या पडताळणीकरिता अपेक्षित उत्तरे**
**4.5 शब्दावली**
**4.6 कार्य वितरण**
**4.7 कार्य**
**4.8 प्रकरण अभ्यास (केस स्टडी)**
**4.9 संदर्भ पुस्तके**

### 4.0 घटक परिचय

अध्यापनाचे कार्य यशस्वी करावयाचे असेल तर नियोजन करणे अगत्याचे आहे. नियोजनाशिवाय कार्यसिद्धी अशक्य आहे. शिक्षणाची इयत्ता नुसार निर्धारित उद्दिष्ट्ये साध्य करावयाची असेल तर संपूर्ण शिक्षण प्रक्रियेचे नियोजन अत्यावश्यक ठरते. वर्षभराच्या अभ्यासक्रम व अभ्यासानुवर्ती उपक्रमातून निर्धारित उद्दिष्ट्ये साध्य करावयाची असतात. वार्षिक नियोजनाद्वारे वर्षभर करावयाच्या विविध गतीविधिंचे नियोजन वर्षारंभीच करावे लागते. वार्षिक नियोजनावर आधारित विषयाचे घटकाधारित घटक नियोजन करावे लागते. निर्धारित घटकाच्या अध्यापनाकरिता एकापेक्षा अधिक तासिका पाठ्यांशानुसार लागू शकतात. त्यामुळे घटकाचे विभाजन पाठात केले जाते. दैनंदिन अध्यापनाकरिता दैनंदिन पाठाचे नियोजन करावे लागते. अभ्यासक्रमाची उद्दिष्ट्ये प्रत्यक्षात साध्य करण्याचे साधन म्हणजे दैनंदिन पाठ अध्यापन होय. अभ्यासक्रमातील पाठ्यांशाद्वारे विद्यार्थ्यांच्या वर्तनात अपेक्षित बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. निर्धारित उद्दिष्ट्ये कितपत साध्य झाली याचे परीक्षण होणे महत्त्वाचे ठरते. जर उद्दिष्ट्ये साध्ये झाली नाही तर नियोजनाचा पुनर्विचार

करावा लागतो. लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा व मूल्यमापनाच्या विविध साधनाद्वारे मूल्यमापन केले जाते. प्रगतिपत्रकाच्या सहायाने विध्यार्थ्याला उच्च उद्दिष्ट प्राप्त करण्याकरिता वरच्या इयत्तेत प्रवेश दिला जातो. औपचारिक शिक्षण प्रक्रिया सुरू असेपर्यंत वरील प्रक्रिया निरंतर सुरू राहील.

### 4.1 शिक्षणाचे उद्देश

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला पुढील कौशल्यात व क्षमतेत समर्थ होता येईल.

- ❖ सूक्ष्म नियोजनाच्या तंत्राचे ज्ञान प्राप्त करता येते.
- ❖ सूक्ष्म नियोजनाचा अर्थ व महत्त्व समजून घेता येते.
- ❖ सूक्ष्म नियोजनाच्या विविध कौशल्याचे ज्ञान व तंत्र अवगत करता येते.
- ❖ सूक्ष्म नियोजनाच्या विविध कौशल्याचे अद्यापनातील महत्त्व समजून घेता येते.
- ❖ दैनंदिन पाठ नियोजन, घटक नियोजन, वार्षिक नियोजनाचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करता येते.
- ❖ मूल्यांकनाच्या विविध पद्धती व तंत्राच्या गुण –दोषाचे ज्ञान प्राप्त करता येते.
- ❖ विद्यार्थी केंद्रित शिक्षण (अध्यापन व मुल्यांकन) पद्धतीचा विकास करता येते.
- ❖ अध्ययन-अध्यापनात सुधारणा करता येते.
- ❖ परीक्षा पद्धतीचे प्रकार व गुणदोषाचे ज्ञान प्राप्त करता येते.

### 4.2 विषय विश्लेषण

#### 4.2.1 अध्यापन अनुभवाचे नियोजन

आजचे युग नियोजनाचे युग आहे. नियोजनाने वेळ, श्रम व पैशाची बचत होते. हाती घेतलेले कार्य यशस्वी करण्यासाठी नियोजन करावेच लागते. कार्य यशस्वीरित्या पूर्ण करावयाचे असल्यास नियोजनानुसार कार्यवाही करावी लागते. दैनंदिन कार्याचे नियोजन सतत करावे लागते. व्यक्तीपासून शासनापर्यंत, ग्रामपंचायतीपासून जागतिक पातळीपर्यंत सर्वांना नियोजन करावे लागते. औद्योगिक प्रकल्प, पंचवार्षिक योजना, कुटुंब नियोजन, आर्थिक नियोजन इ. करिता नियोजन करावे लागते. शिक्षण हे राष्ट्रीय विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. कोठारी कमिशनच्या मते, 'भारताचे भवितव्य शाळेच्या वर्गा-वर्गातून घडते." अशावेळी शालेय नियोजनाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शैक्षणिक उद्दिष्ट्ये निर्धारित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून उपलब्ध साधनाच्या सहायाने प्राप्त करण्याकरिता नियोजनाची नितांत आवश्यकता आहे.

भाषिक, वाङ:मयीन कौशल्य, मूल्य संवर्धन, चारित्र्य संवर्धन इ. करिता नियोजनाची नितांत आवश्यकता आहे. भाषा शिक्षकाला नियोजनपूर्वक कार्य करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणावा लागतो. विद्यार्थ्यांमध्ये अध्यापन कौशल्य विकसित करण्याकरिता सूक्ष्म अद्यापनाचे नियोजन करावे लागते. दैनंदिन पाठ नियोजन, घटक नियोजन, वार्षिक नियोजन करावे लागते.

### 4.2.2 सूक्ष्म नियोजन

**प्रस्तावना :**

छात्र शिक्षकांना कौशल्य प्राप्तीच्यादृष्टीने सूक्ष्म अध्यापन तंत्र महत्त्वपूर्ण आहे. विविध अद्यापन कौशल्य प्राप्तीकरिता सूक्ष्म अध्यापन कौशल्याचे चक्र सतत सुरू असते. सूक्ष्म अध्यापन तंत्र आत्मसातीकरण, विश्लेषण व प्रयोगाचे तंत्र होय. 1960 मध्ये ॲलन व इतर संशोधकांनी स्टॅनफोर्ड विद्यापीठात संशोधन करून सूक्ष्म अध्यापन तंत्र विकसित केले. प्रश्न कौशल्य, चेतकबदल कौशल्य, फलकलेखन कौशल्य, स्पष्टीकरण कौशल्य, प्रबलन कौशल्य, दिग्दर्शन कौशल्य इत्यादी कौशल्य सूक्ष्म अध्यापनाद्वारे प्राप्त करता येतात.

**सूक्ष्म अध्यापन तंत्राचा अर्थ :**

“नियंत्रित परिस्थितीत शिक्षकाच्या विशिष्ट वर्तनावर लक्ष केंद्रित करणे व त्याचा सराव करणे ज्या पद्धतीमुळे शक्य होते अशा नियंत्रित सराव पद्धतीला सूक्ष्म अध्यापन असे म्हणतात.”

- **ॲलन व ईव्ह**

“वेळ, वर्गाचा आकार, पाठाची लांबी आणि अध्यापनातील गुंतागुंत यांच्या संदर्भात छोट्या प्रमाणाचा अवलंब करणारा अध्यापन प्रसंग म्हणजे सूक्ष्म अध्यापन होय”

- **मॅक ॲलीज व अन्विन**

“नवी अध्यापन कौशल्य विकसित करण्यासाठी व जुनी अधिक परिणामकारक होण्यासाठी आयोजित केलेल्या छोट्या प्रमाणावरील अध्यापन प्रसंग म्हणजे सूक्ष्म अध्यापन होय

- **मॅक नाईट**

**सूक्ष्म अध्यापनाची वैशिष्ट्ये :**

1) सूक्ष्म अद्यापनाच्या विविध कौशल्याचे एका वेळी एकाच कौशल्याचे अध्यापन केले जाते.
2) सूक्ष्म अध्यापन साधारणत: 5-7 विद्यार्थ्यांच्या लहान गटाकरिता आयोजित केले जाते.
3) सूक्ष्म अध्यापन साधारणत: 5-7 मिनिटाकरिता आयोजित केले जाते.
4) विशिष्ट कौशल्यातील वर्तन परिवर्तन होईपर्यंत सूक्ष्म अध्यापन तंत्र सातत्याने सुरू असते.
5) क्रमबद्ध नियोजन व आवश्यकतेनुसार बदल सूक्ष्म अध्यापनात समाविष्ट असतात.

**प्रश्न कौशल्य :**

प्रश्न विचारण्याचे कौशल्य सूक्ष्म अध्यापन तंत्राद्वारे आत्मसात करता येते. निम्न श्रेणी व उच्च श्रेणी प्रश्नाचा समावेश प्रश्न कौशल्यात समाविष्ट असतात. सूक्ष्म अध्यापनात निम्न व उच्च श्रेणी प्रश्नाची वारंवारिता किती याची नोंद निरीक्षणाद्वारे केली जाते. प्रश्नाचे स्वरूप व श्रेणी कोणती याची नोंद निरीक्षणाद्वारे केली जाते. ( ) या चिन्हाद्वारे या नोंदी केल्या जातात.

**प्रश्न कौशल्य**

शिक्षकाचे नाव :

इयत्ता : विषय : पाठ्यांश :

**सारणी**

| अ.क्र. | प्रश्नप्रकार | प्रश्न | उच्चश्रेणी | निम्नश्रेणी |
|---|---|---|---|---|
| 1 | माहितीवजा | | | |
| 2 | विश्लेषणात्मक | | | |
| 3 | तुलनात्मक | | | |
| 4 | मूल्यांकनात्मक | | | |
| 5 | स्मृतिपर | | | |
| 6 | उपयोजनपर | | | |

**चेतक बदल कौशल्य :**

दैनंदिन अध्यापनाचे कार्य करीत असतांना शिक्षक व विद्यार्थ्यांना विविध कृती कराव्या लागतात. शिक्षकाला अध्यापन कार्य करीत असतांना कृतीनुसार हालचाल कराव्या लागतात. पाठ्यांशानुसार हावभाव करावे लागतात. आवाजात चढउतार करावे लागतात. फलकावर पाठ्यमुद्दे, चित्र, आकृती काढावे लागते. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावे लागते. शैक्षणिक साधनाचे दिग्दर्शन करावे लागते. या बहुविध कृती म्हणजे चेतक बदल होय. अध्यापनात रोचकता आणण्याकरिता शिक्षक-विद्यार्थ्याच्या कृतीत विविधता असावी लागते. विद्यार्थ्याच्या शारीरिक व शाब्दिक सहभागात विविधता असावी लागते. प्रगट व मूक वाचन करावे लागते. शिक्षक व विद्यार्थ्याच्या कृतीची रचना विशिष्ट क्रमाने करणे म्हणजे चेतक बदल होय.

**शिक्षक कृती**

| कृती | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हालचाल | | | | | | | | | | |
| हावभाव | | | | | | | | | | |
| बोलण्यातील हावभाव | | | | | | | | | | |
| दृक व श्राव्य बदल | | | | | | | | | | |

**विद्यार्थी कृती**

| कृती | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मौखिक सहभाग | | | | | | | | | | |
| कृतियुक्त सहभाग | | | | | | | | | | |

**स्पष्टीकरण कौशल्य :**

शिक्षकाच्या अंगी स्पष्टीकरण कौशल्य असणे महत्त्वाचे आहे. पाठ्यांशातील संबोध, संकल्पना, आकृती, सारणी, चित्र, काव्यपंक्ती इत्यादीचे स्पष्टीकरण करावे लागते. पाठ्यमुद्दे, कविता, वैचारिक लेख,

वाक्प्रचार, कठीण शब्द इत्यादीचे सुलभ भाषेत निवेदन करावे लागते. याकरिता भाषा शिक्षकाच्या भाषेमध्ये ओघवतेपणा असावा. शिक्षकाने अनावश्यकपणा टाळावा. स्पष्टीकरणातील उणीवा दूर करून उत्तम स्पष्टीकरण कौशल्य आत्मसात करण्याकरिता सूक्ष्म अध्यापन तंत्राचा वापर उपयुक्त ठरतो.

**स्पष्टीकरण कौशल्य**

शिक्षकाचे नाव :

विषय : वर्ग :

पाठाचा प्रकार : पाठ्यघटक :

| **शिक्षक कृती** | **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नियम/उदाहरणे | | | | | | | | | | |
| स्पष्टीकरणातील सुसंगतता | | | | | | | | | | |
| अपेक्षित पुनरावलोकन | | | | | | | | | | |
| दृक श्राव्य साधनाचा वापर | | | | | | | | | | |
| स्पष्टीकरणातील ओघवतेपनाचा अभाव | | | | | | | | | | |
| स्पष्टीकरणात येणारे अडथळे | | | | | | | | | | |
| अस्पष्ट स्पष्टीकरण | | | | | | | | | | |
| अनावश्यक शब्दांचा वापर | | | | | | | | | | |

**फलकलेखन :**

फळा हा शिक्षकाचा मित्र मानला जातो. फळा हे स्वस्त व सहज उपलब्ध होणारे शैक्षणिक साधन आहे. भित्ती फलक, गुंडाळी फलक, ओक्रीलिक फलक, फ्लॅनेल फलक इत्यादी प्रकारचे फलक येतात. कथन- स्पष्टीकरणाला फलकलेखनाची सांगड घातल्यास चलत-चित्राप्रमाणे परिणाम प्राप्त करता येतात. पाठ्यांशातील वाक्प्रचार, कठीण शब्द, मुहावरे, समान व विरुद्धार्थी शब्द, हेतुप्रश्न, गृहपाठ इत्यादी करिता फलक सहायक ठरतो. चेतक बदलाकरिता फलक प्रभावी साधन ठरते. शिक्षकाच्या चांगल्या फलक लेखनाचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या अक्षर सुधारण्याकरिता होतो.

**फलकलेखन कौशल्य**

विद्यार्थ्याचे नाव : दिनांक :

विषय : इयत्ता : पाठ्यांश :

अध्यापन पुनराध्यापन

| **कौशल्याचे घटक** | **पदनिश्चयन श्रेणी 1,2,3,4,5** | **गुणात्मक शेरे/सुधारणात्मक सूचना** | **पदनिश्चयन श्रेणी 1,2,3,4,5** | **गुणात्मक शेरे/सुधारणात्मक सूचना** |
|---|---|---|---|---|
| आशयाची निवड | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आशयाची मांडणी | | | | |
| रेखाटनातील सहजता | | | | |
| सुवाच्चता–<br>अक्षराची सुस्पष्टता :<br>अक्षराचे वळण :<br>अक्षराचा योग्य आकार : | | | | |
| अंतर –<br>दोन अक्षरातील अंतर :<br>दोन शब्दातील अंतर :<br>दोन ओळीतील अंतर | | | | |
| लेखनशुद्धता | | | | |
| रंगीत खडूचा वापर | | | | |

दैनादिन अध्यापनाकरिता आवश्यक व उपयुक्त कौशल्याचा विकास छात्र शिक्षकांमध्ये सूक्ष्म अध्यापन कौशाल्याद्वारे करता येते.


### 4.2.3 दैनंदिन पाठ नियोजन

**प्रस्तावना :**

वार्षिक, घटक नियोजनाप्रमाणेच पाठ नियोजनाचे विशेष महत्त्व आहे. वार्षिक व घटक नियोजनाप्रमाणेच पाठ नियोजनाची पूर्वतयारी करावी लागते. वर्ग अध्यापनाकरिता पाठाचे सूक्ष्म नियोजन करावे लागते. एका तासिकेत पाठाचे अध्यापन करतांना काय शिकवायचे, कसे शिकवायचे, किती पाठ्यांश शिकवायचे, कोणती शैक्षणिक साधने, अध्यापन पद्धती व तंत्र कोणते वापरायचे याचे पूर्वनियोजन करावे लागते. एखाद्या पाठाचे अध्यापन एकापेक्षा अधिक तासिकेत करण्याकरिता एकत्र पूर्वनियोजन करावे लागते. वार्षिक व घटक नियोजनाची यशस्विता पाठ नियोजनवर अवलंबून असते. कोणताही विषय शिकवितांना प्रथम सम्यक दृष्टीची नितांत आवश्यकता आहे. नंतर विषयाच्या पाठ्यांशाचे अध्यापन करावे लागते.

पाठ्यांशाचे पृथ:करण, उद्दिष्ट्ये, अध्ययन अनुभव पद्धती, शैक्षणिक साहित्य याचेनुसार पूर्वनियोजन करावे लागते. पाठ नियोजनाची रूपरेखा तयार झाली की, प्रस्तावना, हेतुकथन, विषयविवेचन, संकलन, उपयोजन, गृहपाठ या पाठाच्या पायऱ्यानुसार नियोजन करावे. अध्ययन-अध्यापन सहज व नैसर्गिक झाले तरच त्याचा चांगला परीणाम होतो. वर्गात सहजस्फूर्त, नैसर्गिक वातावरण निर्माण करण्याची नितांत गरज असते. शिक्षकाने अद्यापनात रंजकता असावी. विषयात उत्सुकता व गोडी निर्माण करावी. वर्गाध्यापनात भाषाप्रभुत्व, विद्यार्थी सहभाग, अवधान केंद्रीकरण, शैक्षणिक साहित्याचा कौशल्याने उपयोग करतो. कठीण पाठ्यांश सोपा करण्याकरिता विविध अध्यापन पद्धती व तंत्राचा वापर करतो.

**दैनंदिन पाठाच्या पायऱ्या व महत्त्व :**




दैनंदिन पाठाकरिता **हर्बार्ट** यांनी पायऱ्या सांगितलेल्या आहे, ज्याला मानसशास्त्रीय आधार आहे. यालाच ‘हर्बार्टची पंचपदी’ असे सुद्धा म्हणतात. अध्ययन- अध्यापन रंजक, आनंददायी करणे शिक्षकाचा प्राय: उद्देश्य असतो. पाठ्यांशाला अनुकूल अध्यापन पद्धतीची व तंत्राची निवड शिक्षकाला करावी लागते. हर्बार्टच्या पंचपदीनुसार प्रस्तावना, हेतुकथन, विषय प्रतिपादन, संकलन व उपयोजन, गृहपाठ या पायऱ्या

**1) प्रस्तावना :**

हर्बार्टच्या पंचपदीनुसार दैनदिन पाठाची पहिली पायरी प्रस्तावना होय. ‘Well being is half done’ असे म्हणतात ते खरे आहे. पाठाच्या यशस्वी सुरूवातीतच पाठाची यशस्विता अवलंबून आहे. विद्यार्थ्यांना मुख्य विषयाकडे आकर्षित करण्याचे सामर्थ्य प्रस्तावनेत असते. प्रस्तावनेच्या माध्यमातून उत्सुकता, कुतूहल, अवधान केंद्रीकरण, पुर्वज्ञान जागृत करीत असतो. पूर्वज्ञान व प्रस्तावना यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. विद्यार्थ्यांची मने ज्ञानग्रहणासाठी तयार करणे प्रस्तावनेचे प्रमुख कार्य होय. विद्यार्थ्यांची मनोभूमिका तयार करण्याचे कार्य प्रस्तावनेला करावयाचे असते. अध्ययनाला अनुकूल वातावरण निर्माण करण्याचे प्रस्तावनेद्वारे करता येते. पूर्वीच्या विषयात गुंतलेले मन आपल्या विषयाकडे खेचण्याचे महत्त्वाचे कार्य प्रस्तावनेला करावे लागते. विद्यार्थ्याचा दर्जा, वय, इयत्ता, पाठ्यविषय, पाठ्यांश, वातावरण इत्यादी गोष्टीवर आधारित विविध पद्धतीने प्रस्तावना करता येते. प्रश्न, निवेदन, कथा, चित्र व चित्रफित, प्रसंगवर्णन करून प्रस्तावना करता येते

**2) हेतुकथन :**

प्रस्तावना केल्यानंतर आज काय शिकणार आहे याची स्पष्ट शब्दात मांडणी करणे म्हणजे हेतुकथन करणे होय. प्रस्तावना व विषय प्रतिपादन यातील दुवा म्हणजे हेतुकथन होय. प्रस्तावनेतून निर्माण झालेली उत्सुकता वृद्धींगत करण्याचे कार्य हेतुकथनाद्वारे करता येते. आज आपण काय शिकणार आहे याची याची स्पष्ट कल्पना हेतुकथनाद्वारे विद्यार्थ्यांना होते. हेतुकथन सुस्पष्ट शब्दात व थोडक्यात करावे.

**3) विषय प्रतिपादन :**

प्रस्तावनेद्वारे विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जागृत केल्यानंतर हेतुकथनानंतर शिकवायचा मुख्यविषय म्हणजे विषय विवेचन होय. विषय प्रतिपादन हा दैनंदिन पाठाचा आत्मा असतो. पाठ्यांशाचे प्रत्यक्ष अध्यापन विषय प्रतिपादनाद्वारे करता येते. शिक्षकाच्या प्रगट वाचनानंतर समग्र आशयावर आधारित हेतुप्रश्न द्यावा. त्यानंतर विद्यार्थ्यांना ओठाची हालचाल न करता मूकवाचन करण्यास सांगावे. शिक्षकाच्या प्रगट वाचनातून शब्दाचे स्पष्ट उच्चार कळतात तर मनोगत वाचनातून गतिशील वाचनाची सवय लागते. मुकवाचनानंतर शिक्षकाने विषय विवेचन करावे. शिक्षक कठीण शब्दाचा अर्थ स्पष्ट करतात, वाक्प्रचार व म्हणीचा अर्थ सांगतात, वाक्यात उपयोग करतात, पाठातील संदर्भ सांगतात. विषय विवेचनात शिक्षक – विद्यार्थ्यांच्या असंख्य कृतीची गुंफण असते. निवेदन, प्रश्नोत्तर, स्पष्टीकरण करून विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग घेऊन पाठ्यांश विद्यार्थ्यांना समजून सांगावा लागतो. 30-35 मिनिटाच्या वेळात 20-22 मिनिटे प्रत्यक्षात विषय विवेचन करावे लागते.

**4) संकलन व उपयोजन :**

विषय विवेचनात शिकविलेला पाठ्यांश विद्यार्थ्यांना कितपत समजला याची पडताळणी करावी लागते. अर्थातच अध्ययन- अध्यापनाचे मूल्यमापन करावे लागते. शिकविलेला भाग कितपत समजला याच्या परीक्षणाकरिता त्या भागावर प्रश्न विचारले जातात. शिक्षक आपल्या अध्यापनाचेहि परीक्षण करू शकतात. प्रश्नांची संख्या आशय व उताऱ्यानुसार साधारणत: 2-4 असावी.

दैनदिन पाठाच्या अद्यापनानंतर प्राप्त ज्ञानाचे उपयोजन करण्याची क्षमता विद्यार्थ्यात निर्माण करणे शिक्षणाचा प्रमुख उद्देश असतो. वाक्प्रचार व म्हणीचा वाक्यात उपयोग करणे, गाळलेले शब्द भरणे, योग्य जोड्या जुळविणे, पाठाचा संक्षिप्त सारांश सांगणे, भूमिका अभिनय करणे, नाट्यीकरण करणे, काव्यवाचन करणे, उताऱ्याचे भाववाचन करणे इ. द्वारे उपयोजन करता येते. अलंकार, वृत्ते इ. व्याकरण अध्ययनाकरिता उपयोजन उपयुक्त ठरते.

**5) गृहपाठ :**

दैनदिन पाठाच्या शेवटची पायरी गृहपाठ होय.दृष्टी विकास, स्वयं अध्ययन इ. गृहपाठाचा उद्देश असतो. एखादा पाठ्यांश शिकविल्यानंतर पाठ्यांशासी संबंधित विचारापेक्षा अन्य विचारला दिशा देणारे प्रश्न विचारावे. विद्यार्थ्याची ज्ञानलालसा वाढीस लागेल असा गृहपाठ द्यावा. गृहपाठात वैविध्य राहील याची दक्षता शिक्षकांनी घ्यावी. तुकारामाच्या अभंगाच्या अभ्यासानंतर अन्य संताच्या कविता अभ्यासास सांगणे हा सुद्धा गृहपाठ होऊ शकतो. शिक्षकांनी गृहपाठ देतांना रुक्षपणा व यांत्रिकता टाळावी.

दैनंदिन अध्यापनाकरिता हर्बार्टने वरील पंचपदी सांगितलेली आहे. पाठ्यांशाला अनुसरून पंचपदिमध्ये फेरबदल करता येईल.अध्यापन ही विकासात्मक प्रक्रिया असल्याने यांत्रिकता व कृत्रिमता टाळावी

**पाठ नियोजनाचा आराखडा :**

दैनंदिन पाठाचे नियोजन करतांना त्याचा पूर्व आराखडा तयार करावा लागतो. दैनंदिन पाठ नियोजनाचा आराखडा तयार करतांना इयत्ता, तुकडी, तासिका, दिनांक, घटक, उपघटक, पाठ, पाठ्यांश या नोंदी कराव्यात. अपेक्षित पूर्वज्ञान लिहावे. पूर्वज्ञानावर आधारित पाठाची प्रस्तावना करावी. जो पाठ्यांश आज शिकवावयाचा आहे त्यावर आधारित हेतुकथन लिहावे. नंतर विषय विवेचन, संकलन व उपयोजन,

गृहपाठ या पाठाच्या पायऱ्या लिहाव्या. त्यानंतर फलकलेखन, निरीक्षक अभिप्रायाकरिता जागा सोडलेली असते. पाठाचे टाचण लिहितांना प्रशिक्षणार्थी स्वत:चे नाव, शाळेचे नाव, विषय, मार्गदर्शक, निरीक्षक, उद्देश्य, शैक्षणिक साहित्य इत्यादी नोंदी कराव्यात. पाठ नियोजनाच्या आराखड्यात विषयविवेचनाच्या पायरीमध्ये पाठ्यमुद्दे, उद्दिष्ट्ये व स्पष्टीकरणे, शिक्षक कृती व विद्यार्थी कृती, मूल्यमापन याप्रमाणे नोंदिकारिता रकाने राहतील. पाठ टाचणाच्या फलकलेखनाच्या रकान्यात विषय, पाठाचे नाव व क्रमांक, लेखक/ कवीचे नाव, हेतुप्रश्न, कठीण शब्द, वाक्प्रचार, म्हणी, महत्त्वाचे विचार, मुल्ये, अवतरणे, सुविचार इत्यादीची नोंद करता येते. याप्रमाणे दैनंदिन पाठाच्या नियोजनाचे वा टाचनाचे स्वरूप असते.

**पाठ नियोजन / पाठ टाचण**

नाव : अविनाश शेंडे

शाळेचे नाव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, वर्धा इयत्ता -9 वी तुकडी -अ

दि.- 05 सप्टे.2016 तासिका – 1 ली वेळ - 11.00 - 11.30

विषय – मराठी (गद्य) घटक – वैचारिक लेख उपघटक – मानवधन

...........................................................................................................................

........

**पूर्वज्ञान :** विद्यार्थ्यांनी काही वैचारिक निबंधाचा अभ्यास केला आहे.

**शैक्षणिक साधने :** वैचारिक तत्वाचा तक्ता, व्यक्तिचित्र.

**प्रस्तावना :**

शिक्षक प्रश्न विचारून पाठाची प्रस्तावना करतात.

- विद्यार्थी मित्रांनो, यापूर्वी तुम्ही कोणकोणते वैचारिक निबंध अभ्यासले आहेत ?
- निबंध लेखन लिहणारे निबंधकार कोण होते ?
- त्या निबंधाची मध्यवर्ती कल्पना थोडक्यात सांगा ?

**हेतुकथन :**

आज आपण पु.ग.सहस्त्रबुद्धे यांचा ‘मानवधन’ हा वैचारिक निबंध अभ्यासणार आहोत.

**विषय प्रतिपादन :**

| पाठ्यमुद्दे | उद्दिष्ट्ये व स्पष्टीकरणे | अध्ययन अनुभूती | | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|
| | | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | |
| | | | | |

**संकलन व उपयोजन :**

वाक्प्रचाराचे वाक्यात उपयोग करा.

विवेक सुटणे, माती होणे, निष्टा ढळणे.

**गृहपाठ :**

'मानवधन' या वैचारिक लेखातील विचाराशी साम्यता दर्शविणारे लेखाचे वाचन करा.

**फलख लेखन**

विषय – मराठी (गद्य)

घटक – वैचारिक लेख उपघटक – मानवधन (पु. ग. सहस्त्रबुद्धे)

**हेतुप्**

'मानवधन' हेच खरे धन होय. इतर धने गौण होते असे लेखक का म्हणतात ?

विवेक सुटणे, माती होणे, निष्टा ढळणे

**गृहप**

'मानवधन' या वैचारिक लेखातील विचारासी साम्यता दर्शविणारे लेखाचे वाचन करा.

मार्गदर्शक अभिप्राय मर्गदर्शक स्वाक्षरी

..........................................................
..........................................................
..........................................................
..........................................................
..........................................................

**4.2.4 घटक नियोजन**

**प्रस्तावना :**

वार्षिक नियोजनाच्या यशस्वितेकरिता घटक नियोजन महत्त्वाचे ठरते. पाठ नियोजनाशिवाय घटक नियोजन व घटक नियोजनाशिवाय वार्षिक नियोजन यशस्वी होऊ शकत नाही. परस्परातील यथार्ततेवर समग्र नियोजनाची यशस्वीता निर्भर असते. वार्षिक नियोजनातील विभिन्न घटकांचे अद्यापनाच्या दृष्टीने नियोजन करणे आवश्यक असते. वार्षिक नियोजनावर आधारित घटक नियोजनामुळे अध्यापनात सुसूत्रता येते. घटकानुसार पाठ नियोजन केले की अध्ययन- अध्यापनात सलगता, एकसंघता निर्माण होऊन निर्धारित उद्दिष्टाची पूर्तता करता येते. साहचर्याच्या मानसशास्त्रीय सिद्धांताचा उपयोग घटक नियोजनाकरिता होतो. समान घटकामुळे समान विचार, समान रचना, समान मूल्य, समान तत्त्वाची सुयोग्य मांडणी करता येते. याचा उपयोग तुलना करणे, फरक करणे, समानता शोधणे इ. करिता घटक नियोजनाचा उपयोग होतो. घटक नियोजनाच्या सुरवातीला घटकाचे पृथ:करण करावे. घटक नियोजनातून अध्यापन घटक, अध्यापन मुद्दे, पाठ्यवस्तू ,उद्दिष्ट्ये व स्पष्टीकरणे अध्यापन पद्धती, शैक्षणिक साधने, अध्यापन अनुभव, मूल्यमापन (निरीक्षण, लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा) याचा योग्य बोध होतो. उद्दिष्टाची पूर्तता न झाल्यास अध्यापन पध्दती, अध्ययन अनुभूती, शैक्षणिक साहित्य, मूल्यमापन साधने इत्यादीचा पुनर्विचार करावा लागतो.

**शिक्षकासमोरील प्रश्न :**

घटक नियोजन करतांना शिक्षकाला पुढील प्रश्न विचारावे लागते.
काय शिकवायचे ?
केंव्हा शिकवायचे ?
का शिकवायचे ?
कसे शिकवायचे ?
उद्दिष्ट पूर्ण झालीत का ?

**उपघटकाचा अर्थ :**

"अध्ययन अध्यापनाच्या सोईसाठी आणि अध्ययन फल अधिक चांगले मिळण्यासाठी वर्षभराच्या पाठ्याक्रमाचे केलेले सोईस्कर उपविभाग म्हणजे उपघटक असे म्हणतात."

**घटकाचे निकष:**

1. घटक एकजिनसी असावा.
2. विविध कृती, अनुभूती व पाठ्यांश याची सुसूत्र गुंफण असावी.
3. विद्यार्थ्यामध्ये योग्य बदल घडून आणता यावी.

**घटक नियोजनाचा आदर्श नमुना**

**इयत्ता 9 वी (कुमारभारती)** **एकूण तासिका 10**

| अ.क्र. | उपघटक | कवी | तासिका |
|---|---|---|---|
| 1 | नामदेवाची अभंगवाणी | नामदेव | 2 |
| 2 | गुरुमहिमा | संत ज्ञानेश्वर | 2 |
| 3 | अभंगवाणी | कान्होपात्रा, निर्मला | 2 |
| 4 | तुकारामाचे अभंग | तुकाराम | 2 |
| 5 | शक्तीगौरव | रामदास | 2 |
| **एकूण तासिका** | | | **10** |

**घटक पार्श्वभूमी :**

मराठी काव्यात संत काव्याला विशेष स्थान आहे. महाराष्ट्राच्या पावन भूमीत अनेक संतानी काव्याच्या माद्यमातून वैचारिक प्रबोधन केले. खऱ्या अर्थाने मराठी कवितेची सुरूवात संतकाव्यातून झाली आहे. संत काव्यातून प्रतिबिंबित पारमार्थिक विचार, भावना इत्यादींना चिरंतन मूल्य आहे. इयत्ता 6 वीत 'संतवाणी', इयत्ता 7 वीत 'मराठीची थोरवी', इयत्ता 8 वीत 'संत कविता' या माध्यमातून संतकाव्याचा परिचय विद्यार्थ्यांना झालेला असतो.

**घटक पृथ:करण :**

नामदेवांनी आपल्या अभंगातून ज्ञानाचा महिमा वर्णन वर्णीत केला आहे. गुरू निवृत्तीनाथ प्रती भक्तीचे काव्यमय वर्णन 'गुरुमहिमा' मधून केले आहे. अभंगवाणी मधून विठ्ठलाच्या भेटीकरिता आतुर कान्होपात्रा व निर्मळाच्या भक्तीभाव व उत्कट मनाचे वर्णन केले आहे. 'तुकारामाचे अभंग' मधून खऱ्या

भक्ताची लक्षणे सांगितली आहे. मानवी जीवनातील शक्तीचे महत्त्व 'शक्तीगौरव' मधून रामदासांनी वर्णन केले आहे.

नामदेवाची अभंगवानी, गुरुमहिमा, अभंगवाणी, तुकारामाचे अभंग, शक्तीगौरव हे संतकाव्य परस्परासी संबंधित आहे. यातील वैचारिक भाव समान आहे. मराठी भाषेतील शब्दसौंदर्य, अलंकार, वृत्ते, काव्यविशेषता, मनातील उत्कट भाव, यातील सुसंगती विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावी. शिक्षकांच्या गायनाद्वारे रसास्वाद वृद्धींगत करता येते.

**उद्दिष्ट्ये व स्पष्टीकरण :**

**ज्ञान व आकलन :**

1) विद्यार्थी, संत कवी / कवियत्रीचा परिचय करून घेतो.

2) विद्यार्थी, संतकाव्याची ओळख करून घेतो.

**कौशल्य व उपयोजन :**

1) विद्यार्थी अभंग गायनाचे कौशल्य संपादन करतो.

2) विद्यार्थी अभंगांना श्रवणीय चाली लावतो.

**अभिरुची :**

1) विद्यार्थी संताविषयी आपल्या भावना स्पष्ट शब्दात व्यक्त करतो.

2) विद्यार्थी संताच्या रचनेविषयी आपल्या भावना स्पष्ट शब्दात व्यक्त करतो.

**रसग्रहण :**

1) विद्यार्थी अभंगातील सौंदर्य स्थळे दर्शवितो.

2) विद्यार्थी भक्तीभावाचा अविष्कार करतो.

**व्यक्तिमत्व विकास :**

1) शक्ती व भक्तीची उपासना शालेय जीवनापासून करण्याचा प्रयत्न करतो.

**अध्यापन पद्धती व अध्ययन अनुभव :**

कथन, स्पष्टीकरण, प्रश्न पद्धतीच्या सहाय्याने अभंग, श्लोक, ओवीचे गायनासह विवेचन केल्या जाते. शैक्षणिक साहित्याच्या (ध्वनिफीत, चीत्रध्वनिफित) वातावरण निर्मिती करतात. अध्यापन पद्धतीच्या सहाय्याने वातावरण निर्मिती करता येते.

**मूल्यसंस्कार :**

काव्यपाठातील मूल्ये आणि संस्कार विविध अध्यापन पद्धतीच्या सहायाने विद्यार्थ्यात रुजविता येते. मूल्य रुजाविण्याकरिता शिक्षकांनी विशेष प्रयत्न करावयास हवे.

**मूल्यमापन :**

एकजिनसी घटक 'संतकाव्यावर'आधारित घटक चाचणी द्वारे मूल्यमापन केल्या जाते. भावपूर्ण गायन करता येते का हे पाहता येते. घटक नियोजनावर आधारित घटक चाचणी करता येते.

**मूल्यसंस्कार :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमात दहा गाभाभूत घटकाचा समावेश असावा.भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या, राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय, भारतीय सामायिक सांस्कृतिक वारसा, समानतावाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता, स्त्री –

पुरुष समानता, पर्यावरणाचे संरक्षण, सामाजिक अडसराचे निर्मुलन, लहान कुटुंबाचे आदर्श, वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक असे दहा गाभाभूत घटक आहेत. गाभाभूत घटकावर आधारित अभ्यासक्रमाच्या अध्ययन- अध्यापनातून मूल्यसंस्कार करता येते.

### 4.2.5 वार्षिक नियोजन

**प्रस्तावना :**

इयत्तानिहाय निर्धारित अभ्यासक्रमाचे योग्य घटकात उपलब्ध तासिकात विभागणी करून वर्षभरात विषयाचे समग्र नियोजन करावे लागते. अभ्यासक्रम, अध्ययन अनुभव, अध्यापन पद्धती, उद्दिष्ट्ये या सर्वांचा विचार करून आपणास वर्षभराचे नियोजन करावे लागते. निर्धारित उद्दिष्टाच्या पूर्ततेकरिता अभ्यासक्रमाचे पूर्वनियोजन करावे लागते. विखुरलेल्या पाठ्य घटकाचे सलग अध्यापन उद्दिष्ट प्राप्ती करिता सहायक ठरण्याकरिता अशा सलग घटकाची मांडणी करून अभ्यासक्रमाचे नियोजन करावे लागते. वर्षभरातील उपलब्ध तासिका, उपलब्ध वेळेनुसार पाठ्य घटकाचे नियोजन करावे लागते. वार्षिक नियोजन करतांना अभ्यासक्रमाचे घटकात विभागणी करावी लागते. याकरिता शिक्षकाला घटक निकषाचे ज्ञान असावयास हवे. घटकाचा एकजिनसीपणा, विविध कृती, अनुभूती व पाठ्यांश याची सुसूत्र गुंफण, विद्यार्थ्यांमध्ये योग्य बदल घडून आणण्याची क्षमता इ. निकषाधिष्ठित घटकाचे नियोजन अभ्यासक्रमातून शिक्षकाने करावे. मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकात गद्य, पद्य, स्फुटलेखन, वैचारिक लेख, व्याकरण इत्यादीचा समावेश असतो. या विविधांगी पाठ्यक्रमाचे एकजिनसी घटकात विभागणी करण्यात भाषा शिक्षकाचे कौशल्य पणास लागते. मातृभाषा अभ्यासक्रमाची घटक विभागणी करणे इतर विषयाच्या तुलनेत कठीण असते. मातृभाषेच्या अध्यापनातून भाषिक उद्दिष्ट्ये (श्रवण, भाषण, वाचन, लेखन, संभाषण), वाङ:मयीन उद्दिष्ट्ये, क्षमता विकास (अभिव्यक्ती, कल्पना शक्ती, सृजनशीलता, रसग्रहण), मूल्ये संवर्धन इत्यादी उद्दिष्ट्ये अभ्यासक्रम व अभ्यासक्रम सह कार्यक्रम यांच्या सहकार्याने पूर्ण करावयाचे असते. वर्ग अध्यापनासोबतच विविध उपक्रमाच्या सहाय्याने उद्दिष्टाची पूर्तता करावी लागते.

पाठ्य पुस्तकातील पाठाचे एकजिनसी घटकात नियोजन न करता प्रत्येक पाठ स्वतंत्रपणे शिकविल्यास उद्दिष्टाची पूर्तता करणे अवघड जाईल. पाठातील अंतर्गत सुसंगती लक्षात येणार नाही. साहित्य व साहित्यीकाच्या शैलीचे सम्यक दर्शन होणार नाही. पाठातील विचारांत सलगता, एकसंघपणा राहणार नाही. म्हणून एकसंगती व सुसंगती प्रस्थापित करण्यासाठी पाठ्यपुस्तकातील पाठात समान सूत्र, समान मूल्य शोधणे अत्यंत आवश्यक आहे. समान सूत्रावर वा मूल्यांवर आधारित घटकाची मांडणी करणे महत्त्वाचे आहे. याचा संकलित सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या क्षमता व मूल्य विकासावर होईल.

अध्यापन करतांना एका घटकाचे सलग अध्यापन होणे अपेक्षित आहे. एका घटकांतर्गत सर्व पाठाचे अध्यापन सलग व्हावे. त्याकरिता एकजिनसी पाठाचे घटक नियोजन करणे महत्त्वाचे ठरते. पाठ्यक्रम तयार करतांना घटक नियोजनाचा विचार व्हावा. वार्षिक नियोजन करतांना घटक तयार करण्यास विशेष महत्त्व आहे. घटक हा वार्षिक नियोजनाचा मूलाधार आहे. ललित निबंध, लघुकथा, प्रवास वर्णन, वैचारिक निबंध, आत्मकथन, नाट्यप्रवेश यामध्ये घटकाचे नियोजन करता येईल.काव्याच्या बाबतीत निसर्ग वर्णनात्मक कविता, संत कविता, आधुनिक कविता, भाव कविता, चिंतनात्मक कविता, दलित कविता अशा स्वरूपात कवितांचे घटक नियोजन करता येते. यानुसार घटक नियोजन केल्यास सुसंगती निर्माण करता येते.

वैज्ञानिक अभिवृत्ती, राष्ट्रीय वृत्ती, सामाजिक जाणीव, अंधश्रद्धा निर्मुलन इत्यादी मूल्यांची रुजवणूक करणाऱ्या पाठानुसार घटक नियोजन करता येईल. घटकातील पाठ, उपलब्ध तासिकांची संख्या, उद्दिष्टांची निश्चिती व पूर्तता, घटक चाचणीद्वारे मूल्यमापन इत्यादिचा विचार वार्षिक नियोजनात करावा लागतो. शाळेचे कार्यदिवस, सहशालेय उपक्रम (क्रीडा महोत्सव, सत्र परीक्षा, स्नेह संमेलन, इ.), रविवार व इतर सार्वजनिक सुट्या विचारात घेवून अध्यापनाचे नियोजन करावे लागते. मराठी भाषेच्या अध्यापनाकरिता दिवसाच्या तासिका, आठवड्याच्या तासिका, महिन्याच्या तासिका, वर्षाच्या तासिका व अभ्यासक्रम याचे नियोजन करावे लागते. वर्षभराच्या अद्यापनाचे नियोजन करून वर्षाच्या शेवटी उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या परीक्षणाकरिता मूल्यमापन करावे लागते. उद्दिष्ट्ये व उपघटकानुसार वार्षिक नियोजन करता येते.

**वार्षिक नियोजनाचा अर्थ :**

" मराठी विषयाचा विशिष्ट इयत्तेनुसार पार पाडायचा जो अभ्यासक्रम असतो त्याचे योग्य घटक पाडून उपलब्ध तासिकांत त्याची विभागणी करणे म्हणजे वार्षिक नियोजन करणे होय."

**वार्षिक नियोजन करतांना घ्यावयाची दक्षता :**

- घटक हा वार्षिक नियोजनाचा मूलाधार आहे.
- पाठ्य पुस्तकातील सर्व पाठाची विभागणी घटकात करावी.
- प्रत्येक घटकांना किती वेळ (तासिका) द्यावा लागेल.
- उपक्रमांना किती वेळ (तासिका) द्यावा लागेल.
- मूल्यमापनाकरिता किती वेळ (तासिका) द्यावा लागेल.
- नियोजनाचे पुनर्नियोजनाकरीता किती वेळ (तासिका) द्यावा लागेल.
- शाळेतील विषय शिक्षकांनी एकत्र चर्चा करावी.
- वार्षिक नियोजन लवचिक असावे.
- वार्षिक नियोजनात सुधारणा आणण्याकरिता सातत्याने नोंदी घ्याव्या.
- घटक, उपघटक, तासिका, मूल्यमापन व एकूण तासिका इ.चा समावेश असणारी रूपरेखा तयार करावी.
- उपघटक विचारात घेऊन उद्दिष्ट्ये (ज्ञान, आकलन, उपयोजन, अभिरुची, अभिवृत्ती, कौशल्य, रसग्रहण, मूल्यमापन इ.) निश्चित करावी.
- उपघटक, उद्दिष्ट्ये, वय, बौद्धिक क्षमता, अनुभव याचा सर्वार्थाने विचार करून अध्यापन तासिका व मूल्यमापन तासिका यानुसार वार्षिक नियोजन करावे.
- उद्दिष्टानुसार व उपघटकानुसार भारांश निश्चित करून घटकाधारित वार्षिक नियोजन करावे.

**वार्षिक नियोजनाचा आदर्श नमुना (घटकानुसार)**

**मराठी (इयत्ता 9 वी)**

**पाठ्यपुस्तक : कुमारभारती**

| घटक क्र. | घटक | उपघटक | अध्यापन | मूल्यमापन | एकूण |
|---|---|---|---|---|---|

| | | | तासिका | तासिका | तासिका |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वैचारिक लेख | भारतीय लोकांचा व्यापार, शेतीसाठी पाणी, मानवधन | 6 | 1 | 7 |
| 2 | वैज्ञानिक लेख | सौर ऊर्जा | 2 | 1 | 3 |
| 3 | नाट्य उतारे | एकेकाचे वेड | 2 | 1 | 3 |
| 4 | दलित काव्य | चार शब्द, कोंडवाडा | 2 | 1 | 3 |
| 5 | लघुकथा | निर्धार, अभंगसंस्कार, धुणं | 3 | 1 | 4 |
| 6 | संतकाव्य | नामदेवांची अभंगवाणी, गुरुमहिमा, अभंगवाणी, तुकारामाचे अभंग, शक्तीगौरव | 10 | 1 | 11 |
| 7 | पंतकाव्य | कृष्णाची वनक्रीडा | 5 | 1 | 6 |
| एकूण तासिका | | | 27 | 7 | 37 |

**वार्षिक नियोजनाचा आदर्श नमुना (उद्दिष्टानुसार)**
**मराठी (इयत्ता 9 वी)**
**पाठ्यपुस्तक : कुमारभारती**

| घटक | प्राप्त तासिका | ज्ञान | आकलन | अभिवृत्ती | कौशल्य | रसग्रहण | मूल्यमापन | तासिका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संतकाव्य | 11 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 11 |

वरील प्रमाणे उद्दिष्ट्ये व उपघटकानुसार वार्षिक नियोजन करता येइल. शिक्षकाने वार्षिक नियोजनानुसार अध्यापन कार्य व अध्यापनेत्तर कार्य याचे नियोजन करावे. वर्षाच्या शेवटी वार्षिक नियोजनाचे मूल्यमापन करावे. सतत नोंदी घ्याव्यात. वार्षिक नियोजन कार्यान्वित झाल्यानंतर नियोजनाचा फेरविचार करता येईल.

### 4.2.6 मुल्यांकन – मूल्यांकनाचे तंत्र

**प्रस्तावना :**

प्रगतीचे मापन करणाऱ्या प्रक्रियेला आपण परीक्षा म्हणतो. विद्यार्थ्यांनी संपादित केलेले ज्ञान कितपत साध्य केले याचे मूल्यमापन परीक्षेच्या सहाय्याने केल्या जाते. परीक्षा म्हणजे मूल्यमापन होय. लेखी व तोंडी परीक्षा पद्धतीचा उपयोग केला जातो. विद्यार्थ्याच्या सर्वांगीण प्रगतीचे मूल्यमापन करणे, व्यक्तिमत्वाच्या सर्वांगाचे मूल्यमापन करणे, निर्धारित उद्दिष्ट्ये कितपत साध्य झाली याचे परीक्षण करणे, विद्यार्थ्यात अपेक्षित वर्तन बदल झाला काय ? याची पडताळणी करणे इ. मूल्यमापनाची उद्दिष्ट्ये असतात. मूल्यमापनाच्या विविध तंत्रापैकी परीक्षा हे पारंपारिक तंत्र होय.

**4.2.7 परीक्षा पद्धती :**

परीक्षा पद्धतीचे प्रकार :

परीक्षेचे लेखी, मौखिक व प्रात्यक्षिक असे प्रकार आहेत.

**लेखी परीक्षा :**

लेखी परीक्षेला विशेष महत्त्व दिले जात असून विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याची तपासणी करण्यावर भर असतो. लेखी परीक्षेत वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न असतात. लेखी परीक्षेद्वारे विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याचे परीक्षण केले जाते. विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, वैचारिक ज्ञान, भाषा कौशल्य, हस्ताक्षर इत्यादी कौशल्याचे मूल्यमापन केले जाते.

**तोंडी परीक्षा :**

लेखी प्रगटीकरणा इतकेच मौखिक व तोंडी प्रगटीकरणालाही भाषेच्या परीक्षेत महत्त्वाचे स्थान आहे. भाषा उच्चार, काव्य गायन व काव्यवाचन, नाट्यवाचन, वक्तृत्व इ. कौशल्याचे परीक्षण करावे. कौशल्यातील चुकांचे निदानही करता येते. भाषेच्या दैनंदिन अध्यापनात कौशल्य प्राप्तीच्या प्रगतीचा अंदाज घेता येतो. प्रत्येक विद्यार्थ्याला मूल्यमापनाकरिता स्वतंत्र वेळ द्यावा लागत असल्याने मूल्यमापनाकरिता अधिक वेळ लागतो. निरपेक्ष मूल्यमापनाकरिता नोंदी ठेवणे आवश्यक आहे.भाषाउच्चार, भाषण शैली, काव्य गायन व काव्यवाचन, नाट्यवाचन, वक्तृत्व इ. कौशल्याचे परीक्षण करण्याकरिता उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांच्या चुकांचे निदान करता येते.दैनदिन अध्यापनात विद्यार्थ्याच्या प्रगतीचा अंदाज घेता येतो. परंतु तोंडी परीक्षा पद्धती वेळखाऊ आहे. ज्ञानाचे व कौशल्याचे सर्वांगीण मापन करता येत नाही. सर्व विद्यार्थ्यांना समान दर्जाचे प्रश्न विचारणे कठीण कार्य आहे. उत्तराची नोंद नसल्यामुळे प्रश्न पृथ:करण करता येत नाही.

**प्रात्यक्षिक परीक्षा :**

भाषेच्या परीक्षेत भाषा कौशल्य (भाषण, वाचन, लेखन, श्रवण, संभाषण) परीक्षणालाही महत्त्व आहे. सहशालेय उपक्रमाच्या माध्यमातून कौशल्य परीक्षण करावे. भाषा प्रयोगशाळेच्या माध्यमातून भाषा कौशल्य विकसित करता येते व परीक्षण ही करता येते.

**प्रश्न प्रकार :**

प्रश्नाचे उत्तर कोणत्या प्रकारचे आहे, यावरून प्रश्नाचे स्वरूप ठरते. विद्यार्थ्यांनी प्रश्नाचे उत्तर एक किंवा दोन शब्दात द्यायचे असेल तर ते वस्तुनिष्ठ प्रश्न प्रकार होय. प्रश्नाचे उत्तर 4-5 ओळीत देणे अपेक्षित असेल तर त्याला लघुत्तरी प्रश्न प्रकार म्हणतात. प्रश्नाचे उत्तर 10-15 ओळीत देणे अपेक्षित असेल तर त्याला दीर्घोत्तरी किंवा निबंधवजा प्रश्न प्रकार म्हणतात. साधारणत: प्रश्नांचे वस्तुनिष्ठ, लघुत्तरी व दीर्घोत्तरी असे प्रश्न प्रकार पडतात. लघुत्तरी व दीर्घोत्तरी प्रश्न प्रकार व्यक्तिनिष्ठ आहेत तर वस्तुनिष्ठ प्रश्न प्रकार वस्तुनिष्ठ आहे.

**वस्तुनिष्ठ :**

ज्या प्रश्नाचे उत्तर 1-2 शब्दात देता येते त्या प्रश्न प्रकाराला वस्तुनिष्ठ प्रश्न असे म्हणतात. वस्तुनिष्ठ प्रश्नाचे उत्तर निश्चित स्वरूपाचे असते. परीक्षकाचा उत्तर परीक्षणावर कोणताही प्रभाव पडत नाही. वस्तुनिष्ठ प्रश्न प्रकारामध्ये खरे-खोटे सांगा, बहुपर्यायापैकी योग्य पर्याय निवडा, रिकाम्या जागा भरा, जोड्या जुडवा इ. स्वरूपाचे प्रश्न येतात. वस्तुनिष्ठ प्रश्नप्रकार विश्वसनीय व यथार्थ असते. संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न विचारता येते. विशिष्ट उद्दिष्टाचे मापन करता येते. वस्तुनिष्ठ प्रश्न पद्धतीत यांत्रिक स्मरणावर विद्यार्थी भर

देतात. तर्कशुद्ध मांडणी, विचारातील सुसंगती, भाषाप्रभुत्व याचे मापन करता येत नाही. चांगल्या अध्ययन सवयींना उत्तेजन मिळत नाही तर अंदाजाने उत्तर देण्यास उत्तेजन मिळते.

**लघुत्तरी :**

ज्या प्रश्नाचे उत्तर 4-5 वाक्यात देता येते त्या प्रश्न प्रकाराला लघुत्तरी प्रश्न असे म्हणतात. वस्तुनिष्ठ प्रश्न व दीर्घोत्तरी प्रश्न यातील सुवर्णमध्य म्हणजे लघुत्तरी प्रश्न होय. वस्तुनिष्ठ व दीर्घोत्तरी प्रश्न पद्धतीचे गुणदोष लघुत्तरी प्रश्न प्रकारात दिसून येतो.

**दीर्घोत्तरी :**

ज्या प्रश्नाचे उत्तर 10-15 वाक्यात देता येते त्या प्रश्न प्रकाराला दीर्घोत्तरी प्रश्न किंवा निबंधवजा प्रश्न असे म्हणतात. निबंधवजा प्रश्न विचार प्रवर्तक व सर्जनशील विचारांना वाव देणारे असतात. आकलन, कल्पना-विस्तार, मुद्देसूद मांडणी, पृथ:करण व संकलन इत्यादीचे मापन करता येते. निबंधवजा प्रश्न पद्धतीत योग्य अध्ययन सवयींना उत्तेजन दिले जाते.परंतु दीर्घोत्तरी प्रश्न प्रकारात संपूर्ण अभ्यासक्रमावर प्रश्न विचारणे कठीण होते. लेखनशैली, हस्ताक्षर, उत्तराची व्याप्ती याचा प्रभाव पडतो. विश्वसनियता व यथार्थता कमी होते.

**परीक्षा पद्धतीचे गुणदोष :**

**गुण :**

1) उद्दिष्ट कितपत साध्य झाली याची पडताळणी करता येते.
2) उद्दिष्ट्ये,अध्यापन पद्धती, शैक्षणिक अनुभूती , शैक्षणिक साधने याचे पुनर्परीक्षण करता येते.
3) अद्ययन- अध्यापनाचे पुनर्नियोजन करता येते.
4) विद्यार्थ्यांना प्रत्याभरण देवून अध्ययन -अध्यापनात सुधारणा करता येते.
5) उणीवा शोधून सुधारणा करता येते.

**दोष :**

1) केवळ स्मरण शक्तीचीच परीक्षा घेतली जाते.
2) ज्ञानाचे उपयोजन, कौशल्य विकास, अभिरुची -अभिवृत्ती विकसन याकडे दुर्लक्ष केले जाते.
3) विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक प्रत्याभरणाचा अभाव जाणवतो.
4) विद्यार्थ्यांनी संपादित केलेले लेखन, वाचन, श्रवण, पठन, सर्जनात्मक कार्य इ. क्षमतांचे मूल्यमापन होत नाही.
5) विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता विकासास वाव नसतो.
6) स्मरणशक्तीवर अधिक भर दिला जातो.
7) ज्ञानात्मक अंगाव्यतिरिक्त इतर अंगाकडे दुर्लक्ष केले जाते.

**4.3 सारांश :**

शिक्षकाला आपल्या कार्याचे नियोजन करावे लागते. उत्कृष्ट नियोजनावरच कार्याची यशस्विता अवलंबून असते. वार्षिक नियोजन शालेय नियोजनाचा आत्मा आहे. वार्षिक नियोजनावरच घटक नियोजन

व दैनंदिन पाठ नियोजन अवलंबून असते. निर्धारित उद्दिष्टाची पूर्तता उत्कृष्ट नियोजनाद्वारे होते. उद्दिष्ट्ये कितपत साध्य झाली याचे परीक्षण मूल्यमापनाच्या विविध साधनाद्वारे केले जाते.

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

- प्रभावी अध्यापनाकरिता सूक्ष्म अध्यापनाचे महत्व ?
- दैनंदिन पाठ नियोजनातील 'हर्बार्टच्या पंचपदीचे' महत्व वर्णन करा ?
- मराठी भाषेच्या अध्यापनाकरिता कोणत्याही घटकाचे नियोजन करा ?
- पाठ नियोजनातील 'विषय प्रतिपादन' या पायरीचे महत्व वर्णन करा ?
- लेखी परीक्षेतील प्रश्न प्रकारचे वर्णन करा ?

**4.4 आपल्या प्रगतीच्या पडताळणीकरिता अपेक्षित उत्तरे :**

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

**उत्तर :** मुद्दा क्र. ४.२ अभ्यासा.

**4.5 शब्दावली :**

**सूक्ष्म अध्यापन :**

"वेळ, वर्गाचा आकार, पाठाची लांबी आणि अध्यापनातील गुंतागुंत यांच्या संदर्भात छोट्या प्रमाणाचा अवलंब करणारा अध्यापन प्रसंग म्हणजे सूक्ष्म अध्यापन होय"

**वार्षिक नियोजन :**

" मराठी विषयाचा विशिष्ट इयत्तेनुसार पार पाडायचा जो अभ्यासक्रम असतो त्याचे योग्य घटक पाडून उपलब्ध तासिकांत त्याची विभागणी करणे म्हणजे वार्षिक नियोजन करणे होय."

**घटक नियोजन :**

"समान व एकजिनसी पाठ्यांशाचे सुसंगत केलेले नियोजन म्हणजे घटक नियोजन होय"

**उपघटक :**

"अध्ययन अध्यापनाच्या सोईसाठी आणि अध्ययन फल अधिक चांगले मिळण्यासाठी वर्षभराच्या पाठ्याक्रमाचे केलेले सोईस्कर उपविभाग म्हणजे उपघटक असे म्हणतात."

**मूल्यमापन :**

"निर्धारित उद्दिष्टांची पूर्तता कितपत झाली याचे परीक्षण करण्याचे तंत्र म्हणजे मूल्यमापन होय"

**परीक्षा :**

"निर्धारित उद्दिष्टांची  पूर्तता कितपत झाली याचे परीक्षण करण्याचे साधन म्हणजे परीक्षा होय"

**4.6 कार्य वितरण :**

प्रभावी अध्यापनाकरिता सूक्ष्म अध्यापनाच्या विविध कौशल्याचे वर्णन करा?
निर्धारित उद्दिष्टांच्या पुर्ततेतील वार्षिक नियोजनाचे महत्त्व वर्णन करा ?
घटक नियोजनाचा आदर्श नमुना तयार करा ?

**4.7 कार्य :**

पाठ नियोजनाद्वारे विद्यार्थ्यात कोणता बदल अपेक्षित आहे ?
परीक्षेच्या विविध पद्धतीचे तुलनात्मक वर्णन करा ?

**4.8 प्रकरण अभ्यास (केस स्टडी) :**

सूक्ष्म अध्यापन तंत्राच्या सहाय्याने प्रभावी अध्यापनाकरिता शिक्षकाला कोणकोणती कौशल्य व क्षमता आत्मसात करता येईल ?

**4.9 संदर्भ पुस्तके** :


- अकोलकर, ग. वि. आणि पाटणकर, ना. वि., (1970), "मराठीचे अध्यापन", पुणे, व्हीनस प्रकाशन.
- अलोणी, अर्चना, (2007),"शैक्षणिक तंत्रज्ञान व व्यवस्थापन", नागपूर, पिम्पालापुरे अंड पब्लिशर्स.
- इंदुरकर, कल्याणी, (1998), "मराठीचे अध्यापन", नागपूर, मंगेश प्रकाशन.
- करंदीकर, सुरेश आणि मंगरुळकर, मीना, (2004), "मराठी –आशय अध्यापन पद्धती", पुणे, फडके प्रकाशन.
- कुंडले, म. बा., (1974), "मराठीचे अध्यापन", पुणे, विद्या प्रकाशन.
- घोरमोडे, कला, (2008), "मराठी अध्यापन पद्धती", नागपूर, विद्या प्रकाशन.
- पवार, ना. ग., (2006) "मातृभाषा मराठीचे आशययुक्त अध्यापन", पुणे, नित्य नूतन प्रकाशन.

## घटक : 5 मराठीचा अभ्यासक्रम व पुस्तके

**माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील मराठी पाठ्यपुस्तकाचे परीक्षण. पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाचे महत्त्व व वैशिष्ट्ये. पाठ्यपुस्तकाची समीक्षा व तुलनात्मक विश्लेषण. अभ्यासपुरक कार्यक्रम. मराठीत प्रसार माध्यमाची भूमिका.**

### घटक रचना

**5.0 घटक परिचय**
**5.1 शिक्षणाचे उद्देश**
**5.2 विषय विश्लेषण**
- **5.2.1 माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील मराठी पाठ्यपुस्तकाचे परीक्षण.**
- **5.2.2 पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाचे महत्त्व व वैशिष्ट्ये.**
- **5.2.3 पाठ्यपुस्तकाची समीक्षा व तुलनात्मक विश्लेषण.**
- **5.2.4 अभ्यासपुरक कार्यक्रम.**
- **5.2.5 मराठीत प्रसार माध्यमाची भूमिका.**

**5.3 सारांश**
**5.4 आपल्या प्रगतीच्या पडताळणीकरिता अपेक्षित उत्तरे**
**5.5 शब्दावली**
**5.6 कार्य वितरण**
**5.7 कार्य**
**5.8 प्रकरण अभ्यास (केस स्टडी)**
**5.9 संदर्भ पुस्तके**

### 5.0 घटक परिचय

त्रिभाषा सूत्रानुसार प्रथम भाषा म्हणून महाराष्ट्रात मराठी भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मातृभाषा ही हृदयाची भाषा होय. मातृभाषा अध्ययन- अध्यापनात कौशल्य विकास महत्त्वपूर्ण आहे. वाचन, भाषण, श्रवण, लेखन या भाषा कौशल्याचा विकास मराठी भाषेद्वारे व्हावयास हवा. पाठ्यपुस्तक म्हणजे ज्ञान प्राप्तीचा मूळ आधार होय. ज्ञानप्राप्ती व अध्ययन- अध्यापन प्रक्रियेतील पाठ्यपुस्तकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भाषा अध्ययन- अध्यापनात पाठ्यपुस्तक म्हणजे संदर्भ साधन होय. अभ्यासक्रमासोबतच अभ्यासपुरक कार्यक्रमाचे ही महत्त्व अनन्यसाधारण आहे. आधुनिक काळात प्रसार माध्यमाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

### 5.1 शिक्षणाचे उद्देश

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला पुढील कौशल्यात व क्षमतेत समर्थ होता येईल.

माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील मराठी पाठ्यपुस्तकाचे परीक्षण करता येते.
पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाचे महत्त्व व वैशिष्ट्ये समजून घेता येते.
पाठ्यपुस्तकाची समीक्षा व तुलनात्मक विश्लेषण करता येते.
अभ्यासपुरक कार्यक्रमाचे ज्ञान प्राप्त करता येते.
मराठीत प्रसार माध्यमाच्या भूमिकेचे ज्ञान प्राप्त करता येते.

## 5.2 विषय विश्लेषण

### 5.2.1 माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील मराठी पाठ्यपुस्तकाचे परीक्षण

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने 1986 च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची पुनर्रचना केलेली आहे. अभ्यासक्रम तयार झाल्यानंतर तो अभ्यासक्रम निर्मितीच्या तत्त्वानुसार तयार झालेला आहे वा नाही हेही पहाणे अत्यावश्यक ठरते.

**मातृभाषेचा अभ्यासक्रम**

**माध्यमिक स्तर (इयत्ता 10 वी) मराठी – प्रथम भाषा**

गद्य - 64 पृष्ठे (प्राचीन साहित्य)
पद्ये - 250 ते 300 ओळी (पैकी 100 ओळी प्राचीनकाव्य)
पुरवणीवाचन - एकूण 4 पुस्तके (प्रत्येकी सुमारे 100 पृष्ठे)
प्रवास, चरित्र, नाटक, निबंध, लघुकथा या प्रकारातीत पुस्तके

**लेखन -** एकूण 10 निबंध विचारप्रधान, चर्चात्मक दोन बाजू देऊन एका बाजूचे समर्थन. कल्पनाविस्तार, वर्णनात्मक, ललित, आत्मवृत, कल्पनाप्रधान.

**व्याकरण-**

**समास-** द्विगु, कर्मधारय, बहुव्रीही प्रकार, विभक्ती , बहुव्रीही, नत्र बहुव्रीही
**वृत -** मुक्तछंद, आर्या, मंदाक्रांता, मालिनी, शार्दुविक्रीडीत
**अलंकार-** 3 चेतनगुणोक्ती, दृष्टांत, रूपक
**वाक्यसंयोजन-** संयुक्त, मिश्र, केवल.
**लेखन-** नियमानुसार शुद्ध वाक्य लेखन
विरामचिन्हे वापरून वाक्याचे पुनर्लेखन
वाक्प्रचारांचा अर्थ व वाक्यात उपयोग व्याकरण चालविणे.
**पत्रलेखन-** निमंत्रण , अभिनंदन, गौरव, आभार, वस्तूंची मागणी, चौकशी, विनंती अर्ज
**सारांश लेखन-** सुमारे 150 शब्दांचा उतारा आकलन- गद्य उताऱ्यातील प्रस्तुत अभ्यासक्रमाचे वाचन व मनन केल्यानंतर खालील बाबी अभ्यासक्रमाच्या तत्त्वानुसार दृष्टिपथात आल्यात त्याचे क्रमवार विवेचन पुढे करीत आहे.

**1. अभ्यासक्रम उद्दिष्टानुसार असावा -**

माध्यमिक शिक्षण मंडळाले 10 वी चा अभ्यासक्रम 1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार केलेता ओ. त्यात मातृभाषेची उद्दिष्ट्ये प्रथम पुनर्रचित केली गेली त्यामुळे ती सफल होतील याचा विचार निश्चितच सखोलपणे केल्या गेलेला आहे. अभ्यासक्रम हा उद्दिष्टांवरच आधारित असतो. त्यादृष्टिने राष्ट्रीय अभ्यासक्रमातील दहा गाभा घटकांना कुठे ना कुठे, म्हणजे एकतर अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टात किंवा अभ्यासंक्रमाच्या आशयात अथवा पाठ्यपुस्तकात स्थान मिळालेले आहे. हे. घटक कोणत्याही राज्याच्या अभ्यासक्रमात असणे माध्यमिक स्तरावरील पाठ्यक्रमाचा अभ्यासक्रमाच्या तत्वानुसार अभ्यासक्रम अनिवार्य आहे व त्या उद्दिष्टांना योग्यप्रकारे अभ्यासक्रमात स्थान दिले गेलेले आहे. मूल्य संस्कार - अ) वैयक्तिक मूल्ये ब) सामाजिक मूल्ये क) राष्ट्रीय मूल्ये अभ्यासक्रमातून योग्य प्रकारे रूजविता येतात.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षकांना अध्यापन करण्यासाठी योग्य दिशा मिळावी, त्यांचे अध्यापन प्रभावी व अर्थपूर्ण व्हावे ह्या हेतुने महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने शिक्षकांसाठीही हस्तपुस्तिका तयार केली यामुळे शिक्षक अधिक चांगल्या प्रकारे पाठातील आशय विद्यार्थ्यांपर्यांत पोहोचवू शकतील. या हस्तुपुस्तिका अध्यापनाची तयारी, अध्यापनपद्धती, वाङमयीन वैशिष्ट्ये, पाठाचा आशय अपेक्षित नैतिक संस्कार, विद्यार्थ्यांना स्वाध्यायासाठी अधिक प्रश्न, वाचनासाठी संदर्भ पुस्तके ह्या सगळयांचा विचार केला गेला असल्याने उद्दिष्टानुसार पूर्ण करणे शिक्षकांसाठी सोयीस्कर झालेले आहे.

**2) अभ्यासक्रम पुस्तकी नसावा त्यात क्रियाशीलता आसवी** –

या दृष्टिने पाठ्यपुस्तक आणि हस्तपुस्तिकेतून विद्याध्यांना भाषाभ्यास करण्यासाठी प्रश्न, शुद्धलेखनाचा सराव, निबंध लेखन, वाचनासाठी संदर्भसाहित्य, शिवाय इतरही उपक्रम सांगितले आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कृतीशीलतेला निश्चितच वाव आहे.

**3) अभ्यासक्रमात विषयांशी समवाय साधला गेला पाहिजे-**

समवाय साधण्यासाठी विज्ञान, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान ह्यावर आधारित पाठ पाठ्यपुस्तकाल दिलेले आहेत. त्यामुळे मातृभाषा व इतर विषयांचा समवाय साधता येतो

**उदा.** स्व-रूप पहा - तत्त्वज्ञानाशी निगडित पाठ

औंधचा राजा-भूगोल व इतिहासाशी संबंधीत पाठ

**4) विद्यार्थ्यांवर विषयाचा जास्तीचा बोजा पाडू नये** –

जे विषय त्यांना शिकविल्या जातात त्यातीलही अनावश्यक माहितीचा माहितीचा भाग कमी केलेता आहे.

**5) अभ्यासक्रम हा शहरी व ग्रामीण भागासाठी वेगळा असावा** –

दृष्टिकोण मात्र साध्य होऊ शकली नाही कारण महाराष्ट्रातील प्रशालांतून मराठीचे अध्यापन होतांता-सुसूत्रता यावी, समपातळी. यावी हे महत्त्वपूर्ण उद्दिष्टच मूळी अभ्यासक्रमाच्या मुळाशी आहे. आणि शिवाय सर्व साहित्य प्रकारची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी ह्या हेतुने वैचारिक निबंध, आत्मचरित्र, व्यक्तिचित्र, विनोदी लेख, ललित लेख, कथा कादंबरीतील उतारा, प्रातिनिधिक महानुभवीय गद्य, प्रातिनिधितशिवकालीन गद्य,संतसाहित्य, पंडिती काव्य, सुनीत, निसर्गकविता, भावकविता, सामाजिक जाणीव,जीवनचिंतन स्वभाषाप्रेम अशा विविध साहित्याची योग्य प्रकारे निवड अभ्यासक्रमात केली गेली आहे.

**6) अभ्यासक्रमात अभ्यासपूरक कार्यक्रमांनाही स्थान असावे** –

पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमानुसार प्रत्येक धड्याच्या मागे अभ्यासपूरक कार्यक्रमासाठी विध्यार्थ्यांना काय देता येईल ते भाषाभ्यास यातून स्पष्ट केले आहे.

**7) व्यक्तीला यशस्वी जीवन जगता यावे असे किमान शिक्षण अभ्याक्रमांतून मिळावे** –

दृष्टिकोण समोर ठेवूनच मातृभोषच्या पाठ्यपुस्तकात नैतिक संस्कार, ऐतिहासिक जाणीव, चारत्र्यइत्यादी जीवनावश्यक मूल्यांचे संस्कार करता येतील अशा वेच्यांची आवर्जून निवड करण्यात आलेली आहे. तसेच लेखन, पत्रलेखन, सारांश लेखन, आकलन व्याकरण ह्या अभ्यासकमातील घटकांचा यशस्वी जीवन जगण्यास निश्चितच उपयोग होतो.

**8) अभ्यासक्रम लवचिक असावा** –

दृष्टिकोण लक्षात घेऊनच पाठ्यपुस्तक तयार होऊन सुद्धा त्यातील काही धडे व कविता वगळल्या गेल्या आहेत. विद्यार्थ्यांला विषयाचा जास्त बोजा होईल यांचा विचार करूनच वरील निर्णय घेतला असावा. अभ्यासक्रम मूळातच लवचिक स्वरूपाचा असतो. उद्दिष्टे सफल झाली नाहीत तर तो बदलत असतो उद्योन्मुख समाजातील गरजांनुसार तो बदलतो.

**9) अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांच्या विकासाच्या अवस्थांना अनुकूल असावा** –

सर्वसामान्य विद्यार्थ्यांचा विचार करता त्यांचा बौद्धिक विकास तेवढासा झालेला नसतो त्यामुळे अभ्यासक्रम त्यांना कठीण असल्यासारखा वाटतो व ते स्वाभाविकही आहे. परंतु त्या दृष्टिने शिक्षकालाही हस्तपुस्तिका उपलब्ध करून दिलेली आहे व विषय विद्यार्थ्यांपुढे सोपा करून कसा मांडावा याचे स्पष्ट दिग्दर्शन त्यात केलेले आहे. त्यामुळे आज खरी जबाबदारी शिक्षकांचीच आहे. वास्तवात अभ्यासक्रमाची मांडणी विद्यार्थ्यांच्या वाढ आणि विकासाला अनुकूलच केलेली आहे.

**10) फुरसदीच्या वेळात विद्यार्थ्यांनी काय करावे याचे दिग्दर्शन** –

पाठ्यपुस्तकातील भाषाभ्यासात स्पष्ट केले आहे. तद्वतच शिक्षक ही स्वाध्यायाच्या स्वरूपात विद्यार्थ्यांना कृतीशील ठेवू शकतो. अभ्यासक्रमात इतरही बरेच विषय असल्याने विद्यार्थ्यांना फुरसद मिळणेच असंभव पण मिळालेल्या संधीचा सदुपयोग करण्यासाठी पुरवणी वाचन, शालेय ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ इत्यादीचा विद्यार्थी उपयोग करून घेऊ शकतो.

**11) मातृभाषेच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोण नैतिकमूल्ये, सामाजिक जाणीव, जीवनविषयक दृष्टिकोण, रसिकता इत्यादी सर्व बाबींचा विकास** –

अभ्यासक्रमातून हा विचार पाठ्यपुस्तकाच्या आधारे केल्या गेला आहे. अभ्यासक्रम राबविला कसा जातो त्यावर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व सर्वांगांनी समृद्ध होणे अवलंबून असते. आर्थिक विकासाकडे या पाठातून नैतिक संस्कार, आमचे ग्रहण अजून सुटले नाही या पाठातून वैज्ञानिक संस्कार केले गेले आहेत. अशाप्रकारे विविध पाठ व कवितांतून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होण्यावर भर दिला गेला आहे.

**12)** अभ्यासक्रमाला आपले तत्त्वज्ञान, आपली संस्कृती, आपली जीवनमूल्ये, नवीन समाजरचना या सर्व बार्बीना जीणीवपूर्वक स्थान दिले आहे. बराचसा भाग हा आपली संस्कृती, तत्त्वज्ञान, समाजरचना यावरच आधारित आहे. संस्कृती संक्रमण व संवर्धन हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय अभ्यासक्रमातून जोपासले गेले आहे. महानुभावपासून तर स्वभाषा प्रेमापर्यंत सर्वप्रकारच्या साहित्याचे संस्कार पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर रूजविण्याचा प्रयत्न अभ्यासक्रमातून केला आहे.

तात्पर्य माध्यमिक स्तरावरील 10 वी चा मातृभाषेचा प्रचलित अभ्यासक्रम अभ्यासक्रमाच्या तत्वानुसारच तयार केला गेला आहे. परंतु अभ्यासक्रम तयार करणे व तो राबविणे ह्यात जबरदस्त अंतर पडते अभ्यासक्रम तयार करणारे वेगळे व तो राबविणारे दुसरे. अभ्यासक्रम राबविला कसा जातो त्यावर अभ्यासक्रमाची यशस्विता अवलंबून आहे. म्हणूनच शिक्षण मंडळाने हस्तपुस्तिका सादर करून शिक्षकांना अध्यापनाची योग्य दिशा व मार्गदर्शन केलेले आहे. त्यानुसार जर तो राबविला गेला तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व एकांगी न राहता त्याला सर्वगामित्व येइल ह्यात शंका नाही.

शेवटी एकच सांगावेसे वाटते की 1986 चा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार जो अभ्यासक्रम बदलविला गेला तो क्रमश: 5वी ते 10 वी पर्यंत असता तर अधिक बरे झाले असते. 9 वी च्या अभ्यासक्रम समजून घेई पर्यंतच 9 वी चे वर्ष संपून 10 वी चे वर्षसमोर उभे ठाकले होते. परिणामत: विद्यार्थी व शिक्षकांचा गोंधळ उडणे स्वाभाविकच होते.

उच्च माध्यमिक स्तरावरील पाठ्क्रमाचा अभ्यासक्रमाच्या तत्त्वनुसार अभ्यास

**मातृभाषेचा अभ्यासक्रमाच्या तत्त्वानुसार अभ्यास**

**उच्च माध्यमिक स्तर - इयत्ता 12 वी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षणमंणळाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- 1986 अनुसार बारावीच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना केलेली आहे. अभ्यासक्रम तयार झाल्यानंतर तो अभ्यासक्रम निर्मितीच्या तत्त्वानुसार तयार झालेला आहे वा नाही हेही पहाणे अध्यापनाच्या दृष्टीने आवश्यक ठरते. प्रस्तुत अभ्यासक्रमाचे वाचन व मनन केल्यानंतर खालील बाबी अभ्यासक्रमाच्या तत्त्वानुसार दृष्टिपथात आल्यात त्याचे क्रमवार विवेचन पुढे करीत आहे.

मातृभाषेचा अभ्यासक्रम-उच्च माध्यमिक स्तर-इयत्ता 12 वी - मराठी

**1) गद्य:** 80 पृष्ठे (परिचय व टीपा सोडून)

**2) पद्य:** 400 ओळी (पैकी 100 ओळी प्राचीन)

**3) स्थूलवाचन:** 5 पाठ

(ललित गद्य हा वाङ्मय प्रकार सुमारे 75 पृष्ठसंख्येत बसतील एवढी पाठसंख्या असावी)

4) लेखन - एकूण 10 निबंध

1) निबंध - चर्चात्मक, वर्णनात्मक, कल्पनात्मक

2) साराशं लेखन-किमान 5 करणाऱ्यांचा अभ्यास

3) आकलन - गद्य / पद्य उताऱ्यांवरील प्रश्नांची उत्तरे

4) पत्रलेखन - कार्यालयीन आणि व्यावहारिक

5) कार्यालयीन टिप्पणी /वृत्तांत लेखन/ जाहिरात.

6) भाषांतर - 5 ओळी (इंग्रजी सुलभ मराठीत)

इंगजी उतारा निवडतांना विद्यार्थ्यांचा स्तर लक्षात घ्यावा.

**5) व्याकरण** - अलंकार - व्यतिरेक, अनन्वय, स्वाभावोक्ती

**वृत-** पादाकुलक, अभंग, वसंत तिलका

वाक्यारूपांतर - मिश्र

**समास-** द्वंद्व (समाहार, इतरेतर वैकल्पिक) सहबहुव्रीही, कर्मधारय,

लेखन नियामानुसार- मराठी साहित्य महामंडळाने सम्मत केलेले
शुद्ध वाक्यलेखन - नियम पाठ्य पुस्तकात परिशिष्टामध्ये दिलेले आहेत.

**1) अभ्यासक्रम उद्दिष्टाक्रम असावा -**

अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 नुसार उद्दिष्टांची व अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली. अभ्यासक्रम तयार करतांना सर्वप्रथम उद्दिष्टेच ठरवावी लागतात. त्यामुळे अभ्यासक्रम हा उद्दिष्टांनुरूप असायला हवा. आणि तो आहेही. विद्यार्थ्यांचे इयत्ता 11 वी वर्यंत मराठी भाषा व साहित्यांचे जे अध्ययन झाले आहे ते विचारात घेऊनच अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली आहे आणि हे करतांना प्राचीन आधुनिक काळातीत मराठी साहित्याचा प्रातिनिधिक परिचय व्हावा. विविध वाङ्मयीन प्रवाह प्रवृती यांचे आकलन व्हावे याची दक्षता अभ्यासक्रम ठरवितांना घेतली गेली आहे साहित्याच्या वाचनातून विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्ती बरोबरच आनंद प्राप्तीही व्हावी, समकालीन जीवनातील प्रश्नांची जाणीव होऊन त्यांच्या ठायी निकोप सामाजिक दृष्टी व शब्दप्रेम निर्माण व्हावे, त्यांच्यातील साहित्यादी कलांचा आस्वाद घेण्याची क्षमता व चिंतनशीलता विकसित व्हावी. त्यांच्यातील कलानिर्मिती प्रेरणेचे पोषण व्हावे आणि श्रेष्ठ जीवनमूल्यांचा संस्कार होऊन त्यांचे व्यक्तिमत्व समृद्ध व्हावे ही सगळी उद्दिष्टे अभ्यासक्रमातून साध्य होतांना दिसतात.

**2) अभ्यासक्रम म्हणजे केवळ नियुक्त विषय, त्यातील निवडक आशय व त्यावरील पाठ्यपुस्तक असे नव्हे तर विषयांतर्गत व विषयबाह्य अशा सर्वच अनुभवांचा अभ्यासक्रमांत अंतर्भाव असावा -**

12 वी चा विद्यार्थी हा वास्तववादी झालेला असतो त्याची अमूर्त त्याची अमूर्त पातळीवर विचार करण्याची क्षमता वृद्धिंगत झालेली आहे. आणि याच दृष्टिकोणातून विद्यार्थ्यांमध्ये वाङ्मयीन दृष्टि निर्माण व्हावी, अलंकारिक भाषेने फुलविलेले प्रसंग त्याला अनुभविता यावे, बोलीतील जिवंतपणा अलपाक्षरत्व व शब्दांची लय ह्या वैशिष्ट्यांचे दर्शन नैतिक मूल्यांचे संस्कार व्हावेत सांस्कृतिक इतिहासाचा वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा, स्वातंत्र्य, समता, बंधुता इ. जीवनमूल्यांचे विद्यार्थ्यावर संस्कार व्हावेत सामाजिक जाणीव निर्माण विद्यार्थ्यांना तर्कशुद्ध अनुमान करता यावे मराठी भाषा व संस्कृती विषयी अभिमान निर्माण व्हावा, नव्या जीवनमूल्यांचे दर्शन व्हावे विद्यार्थ्यांमध्ये भावनिष्पत्ती व्हावी, थोर व्यक्तींचा जीवनपरिचय व्हावा, ग्रामीण बोलीचा परिचय व्हावा साहित्याच्या कलात्मकतेचे ज्ञान व्हावे, अध्यात्मिक संस्कारांची जडणघडण व्हावी, पांडित्य व रसिकता यांच्या सुरेख संगमाचा परिचय विद्यार्थ्यांना व्हावा, राष्ट्रप्रेम विद्यार्थ्यांमध्ये जागृत व्हावे अशा विविध बाजूनी विद्यार्थ्याचा विचार अभ्यासक्रमातून केल्या गेलेला आहे. म्हणजेच केवळ पाठ्यपुस्तक नव्हे तर विषयबाह्य अनुभवांचा जे की त्यांच जीवनात आवश्यक आहेत त्यांचाही विचार अभ्यासक्रमातून यथायोग्यपणे करण्यात आलेता आहे. तद्वतच पत्रलेखन, कार्यालयीन टिप्पणी, जाहिरात हे लेखन प्रकार अभ्यासक्रमात समाविष्ट केल्याने विद्यार्थ्यांचे विषय बाह्य अनुभव ही विस्तृत होण्यास मदत होईल.

**3) अभ्यासक्रम पुस्तकी नसावा त्यात क्रियाशीलता असावी -**

ह्या तत्वानुसार निबंधलेखन, सारांश लेखन, आकलन, लेखन, भाषांतर असे विविध लेखनप्रकार अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेले आहेत की ज्यामूळे विद्यार्थ्याच्या कृतीशीलतेला व त्याबरोबरच सृजनशीलतेला वाव मिळावा प्रश्न मात्र पाठ्यपुस्तकात समाविष्ठ नाही ह्याचे कारण विविध वाङ्मयीन दृष्टिकोणातून विद्यार्थाना विचार करता यावा.

**4) अभ्यासक्रमातून विषयांशी समवाय साधला जावा**

अभ्यासक्रमातून विषयांशी समवाय देखील साधला गेलेला आहे.

**उदा.** स्वामीचे मांडीवर उसे - इतिहास

वसईचा वेढा (बखर) - इतिहास

बंधअनुबंध - समाजशास्त्र

भारतीय शेतीपुढील आव्हाने - अर्थशास्त्र

दर्शन- तत्त्वज्ञान

समवाय केवळ विषयांशीच नव्हे तर जीवनतल्या वास्तववाशी देखील साधल्या गेलेला आहे. जो की या स्तरावरील विषयांशीच आवश्यक आहे.

उदा. बेगड. झोंबी इ.

माध्यमिक स्तारवरील पाठ्यक्रमाचा अभ्यासक्रमाच्या तत्त्वानुसार अभ्यास

**5) विद्यार्थ्यांवर विषयांचा जास्त बोजा पडू नये -**

12 वी च्या विद्यार्थ्याचा स्तर उंचावलेला असतो, व्यवहारातील सर्वसाधारण पातळीवर माध्यमिक स्तरातून से पोहोचलेले असतात. त्यामुळे विषयांचे विस्तृत ज्ञान व्हावे. जे की त्यांच्या व्यवसायाच्या, त्यांच्या अर्थाजनाच्या दृष्टिने उपयोगी पडेल याचदृष्टिने अभ्यासक्रमाची रचना केलेली आहे. आणि म्हणूनच 12 वी च्या विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य दिलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्याला आपल्या आवडीचे विषय निवडता येतात व त्यांना जे अनावश्यक वाटतात त्या विषयांचा बोजा त्यांच्यावर साहजिकच पडत नाही.

**6) अभ्यासक्रम शहरी व ग्रामीण विभागासाठी असावा -**

महाराट्रातील कनिष्ठ महाविद्यालयातून अध्यापन घेतांना सुसूत्रता यावी समपातळी यावी हे महत्त्वपूर्ण उद्दिष्टच मुळी अभ्यासक्रमाच्या मुळाशी आहे आणि शिवाय सर्व साहित्य प्रकाराची ओळख व्हावी या हेतुने वैचारिक निबंध, आत्मचरित्र कादंबरीतील उतारा, माहनुभवीय गद्य प्रकार, पंडिती काव्य इ. विविध प्रकारच्या साहित्याची निवड अभ्यासक्रमांत केलेली आहे. जी की वाङ्मयीन उद्दिष्टे परिपूर्ण करण्यात आवश्यक आहेत. त्यामुळे अभ्यासक्रम शहरी व ग्रामीण विभागासाठी वेगवेगळा ठेवणे शक्य नाही.

**7) अभ्यासक्रमात अभ्यासपूरक कार्यक्रमांनाही स्थान असावे -**

याच दृष्टिकोणतून, निबंध लेखन, सारांश लेखन, भाषांतर इ. लेखन प्रकाराला अभ्यासक्रमांत स्थान दिले गेलेले आहे.

**8) व्यक्तीला यशस्वी जीवन जगता यावे असे किमान शिक्षण अभ्यासक्रमातून मिळावे -**

याचाच अर्थ जीवन व शिक्षण यांचा संबंध प्रस्थापित व्हावा. हेही तत्त्व साध्य होतय. किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम तयार केले गेले आहेत. मातृभाषेच्या अभ्यासक्रमातून विद्यार्थी योग्य प्रकारे कार्यालयीने पत्रव्यवहार, आवेदन-पत्र भरणे, आपली मते थोडक्यात मांडणे, जाहिरात तयार करणे असे विविध प्रकार शिकतो त्याचा त्याला जीवनांत निश्चितच उपयोग होतो.

**9) अभ्यासक्रम लवचिक, बदलता व गतिमान असावा -**

हे तत्त्व पाळणे आवश्यक असते कारण उदयोन्मुख समाजातील गरजांनुसार अभ्यासक्रम हा बदलतोच नवनवे शिक्षण आयोग स्थापन झालेत ते एवढयाच साठी. 1986 च्या नवीन शैक्षणिक धोरणा

प्रमाणे तो आता बदलेला आहे. गरजा बदलल्या की उद्दिष्टे बदलतात, उद्दिष्टे बदलती ही अभ्यासक्रम बदलणे क्रमप्राप्त ठरते.

**10) अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांच्या विकासाच्या अवस्थांना अनुकूल असावा -**

12 वी चा मातृभाषेचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या विकासाच्या अवस्थांना निश्चितय अनुकूल आहे. विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारची वास्तववादी दृष्टी या अवस्थेत निर्माण झालेली असते. जीवन व शिक्षण यांना जोडणे या स्तरापासूनच सुरू होते. अभ्यासक्रमातून या सर्व गोष्टींचा सारासार विचार केलेला दिसून येतो. विद्यार्थ्यांच्या व्यक्मित्व विकासाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न अभ्यासक्रमातून निश्चित साध्य होईल असे वाटते.

**11) मातृभाषेच्या माध्यमातून नैतिक मूल्ये, ऐतिहासिक जाणीव, सामाजिक जाणीव, जीवनविषयक दृष्टिकोण निर्माण व्हावा** –

या दृष्टिने अभ्यासक्रमांतील वेच्यांच्या आधारावर यातील प्रत्येक घटकाला योग्य ….. स्थान अभ्यासक्रमातून पाठ्यपुस्ताकाच्या आधारे दिले गेले आहे.

उदा. बखर गद्य, स्वामींचे मांडीवर उसे, सत्य, मोठ्या दिलाचा राजा, गठण्याआधी (पद्य), अक्षरे चुरगाळिता (पद्य)

तात्पर्य 12 वी चा मातृभाषेचा प्रचलित अभ्यासक्रम मातृभाषेच्या अभ्यासक्रमाच्या तत्वावरच आधारित आहे. पण मागे सांगितल्या प्रमाणेच अभ्यासक्रम तयार करणे व तो राबविणे यात अंतर पडते. अभ्यासक्रमाची यशस्विता तो कसा राबविला जातो त्यावर अवलंबून आहे. म्हणून विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व सर्वगामी करण्याची जबाबदारी शिक्षकावर येऊन पडते. शिक्षकाने जर आपली जबाबदारी ओळखून स्वत: पूर्णपणे तयारीने अभ्यासक्रम राबविला तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व सर्वगामी, सर्वस्पर्शी झाल्याशिवाय रहाणार नाही.

### 5.2.2 पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाचे महत्त्व व वैशिष्ट्ये

प्राचीन काळात लेखन कला विकसित होण्यापूर्वी ज्ञान मुखोद्गत संग्रहित केले जात असे. त्यानंतर भोजपत्र, ताडपत्र, ताम्रपत्र, काष्टपत्र इत्यादीवर लेखन कार्य करण्यात येत होते. कालांतराने पुस्तकाच्या माध्यमातून ज्ञान संग्रह करण्यास प्रारंभ झाला. ज्ञानाच्या विविध शाखा विकसित झाल्या. ज्ञान शाखेतील ज्ञान ग्रंथाच्या रूपाने संग्रहित होऊ लागले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तके महत्वाची असतात . विषयतज्ञ, शिक्षणतज्ञ, शासन यांच्याद्वारे निर्धारित उद्दिष्टाची पूर्तता करण्याचे प्रभावी साधन म्हणजे पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तके होय.

**पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाचे महत्त्व :**

1. पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकात विषय ज्ञानासंदर्भात सर्व माहिती सामावलेली असते.
2. विषय ज्ञानाच्या माहितीचा समग्र साठा म्हणजे पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तक होय.
3. ज्ञान प्राप्तीचे प्रभावी, सर्वोत्तम व अनिवार्य साधन म्हणजे पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तक होय.
4. स्मरण विकास, सराव, ज्ञान संवर्धन, सकल संग्रह साठा, स्वयं अध्ययन साधन, रुची, सर्जनशीलता इत्यादीकरिता महत्त्वपूर्ण आहे.
5. स्वयं अध्ययनाचे सर्वोत्तम साधन होय.

6. अध्ययन- अध्यापनाचे सर्वोत्तम साधन म्हणजे पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तक होय.
7. विद्यार्थ्यांना गृहकार्य करण्यास सहायक साधन होय.
8. भाषण, वाचन, लेखन, श्रवण इत्यादी कौशल्याच्या विकासाकरिता उपयुक्त साधन होय.
9. विध्यार्थ्यात विविध क्षमतां विकसित करण्यासाठी सहायक ठरते.
10. अध्ययन- अध्यापन अर्थातच शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थ्यात रुची विकसित करता येते.

**पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाचे वैशिष्ट्ये :**

मराठी भाषा शिक्षणात पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाला विशेष महत्त्व आहे. पाठ्यपुस्तकाची निर्मिती आदर्श पाठ्य पुस्तकाच्या निकषाच्या आधारे केली जाते. निर्धारित उद्दिष्टांच्या पूर्ततेकारिता पाठ्यपुस्ताकात पूरक पुस्तके सुचविली जाते. पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाचे वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**1. सह उद्देश्य :**

प्रत्येक पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाची रचना करतांना उद्देश्य लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. निर्धारित उद्देश्याची पूर्तता करण्याची क्षमता पाठ्यपुस्तक व संबंधित पूरक पुस्तकात असावयास हवी. भाषेचा मूळ उद्देश्य कौशल्य विकास करणे असतो.

**2. उपयुक्तता :**

मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून बाल्यावस्था, किशोरावस्था, प्रौढावस्था यानुसार अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाचे निर्माण व्हावयास हवे. विद्यार्थ्याचे वय, क्षमता, रुची लक्षात घेवून निर्मित पुस्तक उपयुक्त ठरते.

**3. विषय विविधता :**

पाठ्यपुस्तकात अंतर्भूत विचार, संकल्पना, विषयात विविधता असावी. गद्य, पद्य, नाटक, कहाणी, निबंध इत्यादी विविध विषयावर पाठ समाविष्ट असावे.

**4. रोचकता :**

आजची शिक्षण प्रक्रिया विद्यार्थी केंद्रित आहे. अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक निर्माण करतेवेळी विद्यार्थ्याची आवड, क्षमता, योग्यता लक्षात घेणे आवश्यक आहे.

**5. जीवन संबंध :**

इयत्तानुसार निर्धारित अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक हा जीवनासी संबंधित असावा. जीवनासी असंबंध पाठ्यक्रमाचा उपयोग काहींही नाही. शिक्षणाचा जीवनासी संबंध प्रस्थापित करणे शिक्षणाचा प्रमुख उद्देश्य आहे.

**6. क्रमबद्ध :**

पाठ्यपुस्तकातील पाठ क्रमबद्ध असावे. अध्यापन सूत्रानुसार पाठाची रचना असावी. क्रमबद्ध शिक्षण प्रभावी अध्ययनाकरिता महत्त्वाचे आहे.

**7. आदर्शवादी :**

पाठ्यपुस्तकातील पाठ्यांश नवीन विचार, संदेश, प्रेरणा प्रदान करतात.

**8. व्यावहारिक :**

व्यावहारिक क्षमतांचा विकास करणे शिक्षणाचा प्रधान उद्देश्य आहे.

**9. स्तरानुसार :**

पाठ्यपुस्तकाची भाषा सरळ, सोपी व आकलनक्षम असावी. विद्यार्थ्यांच्या इयत्ता स्तरानुसार पाठ्यपुस्तक निर्माण करावे.

**10. भाषाशुद्धता :**

पाठ्यपुस्तकाची भाषा व्याकरण दृष्ट्या शुद्ध असावी. व्याकरण अशुद्धतेचा प्रभाव विद्यार्थ्यांवर नकारात्मक होवून भाषा विकासात अडसर निर्माण होतो.

**11. सार्थकता :**

पाठ्यपुस्तकातील पाठ्यांश सार्थक व समर्पक असावा. अनावश्यक शब्द व वाक्यांचा समावेश टाळावा.

**12. सह संबंध :**

पुस्तकातील वाक्य, शब्द, उतारा यामध्ये सहसंबंध असावा. तसेच पाठ्यांशाचा जीवनासी सहसंबंध असावा.

**13. भाषाधिकार :**

पाठ्यपुस्तकातील भाषा विद्यार्थ्यांच्या भाषा विकासास समृद्ध करणारी असावी. शब्द सामर्थ्य, शब्द सौंदर्य याच्या विकासास पोषक भंडार म्हणजे भाषेची पाठ्यपुस्तके होय.

**14. मौलिकता :**

लेखक, कवी, विचारक यांच्या मूळ रचनेची छाटणी करतांना त्यातील मौलिकता कमी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**15. शैलीची विविधता :**

पद्य वाङमय, गद्य वाङमय, वैचारिक, स्फुट लेखन, निबंध लेखन, पत्र लेखन इत्यादीद्वारे विविध रचनामध्ये शैलीची विविधता दिसून येते.

**16. नाव :**

पाठ्यपुस्तकाचे नाव सरळ, सुस्पष्ट, आकर्षक व बोधक असावे. पाठ्यपुस्तकाच्या शीर्षकावरून पुस्तकातील आशयाचा आभास व्हावा.

**17. आकार :**

पाठ्यपुस्तकाचा आकार अतिशय मोठा किंवा लहान नसून इयत्ता, वय, शारीरिक क्षमता नुसार असावा.

**18. कागद :**

पाठ्यपुस्तकाचा कागद उत्कृष्ट दर्जाचा असावा. कमी प्रतीचा कागद असल्यास पाठ्यपुस्तके लवकर फाटण्याची शक्यता असते.

**19. मुद्रण :**

पाठ्यपुस्तकातील छपाई शुद्ध असावी. अक्षर अतिशय लहान किंवा अतिशय मोठे नसावे. मुद्रण दोष टाळावे.

**20. चित्र:**

एक चित्र हजार शब्दाचे कार्य करते. आशय प्रभावीपणे स्पष्ट करण्याकरिता चित्र अतिशय उपकारक ठरते. प्राथमिक स्तरावर चित्र अतिशय सहायक व उपकारक ठरते.

**21. बांधणी :**

पाठ्यपुस्तकाची बांधणी मजबूत असावी. लहान विद्यार्थ्यास हाताळण्यास योग्य असावी.

**22. आवरण :**

पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ आकर्षक असावे. मुखपृष्ठ व मलपृष्ठ याचा कागद व बांधणी मजबूत व उत्कृष्ट असावा.

**23. मूल्य :**

पाठ्यपुस्तकाची किंमत योग्य असायला हवी. जेणेकरून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना खरेदी करणे आर्थिक दृष्ट्या परवडणारे असेल.

उपरोक्त वैशिष्ट्ये असलेले पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तके असने विद्यार्थ्यांच्या भाषा विकासाकरिता उपयुक्त असते.

### 5.2.3 पाठ्यपुस्तकांची समीक्षा व तुलनात्मक विश्लेषण

महाराष्ट्र राज्य मध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे (महाराष्ट्र राज्य) द्वारे इयत्ता 1 ते 12 पर्यंतच्या अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांची रचना व निर्मिती करते. अभ्यासक्रम तयार झाल्यानंतर तो अभ्यासक्रम निर्मितीच्या तत्त्वानुसार तयार झाला आहे वा नाही हे पहाणे म्हणजे पाठ्यपुस्तकांची समीक्षा होय. आदर्श पाठ्यपुस्तकांच्या निकषानुसार पाठ्यपुस्तकाची तपासणी करणे म्हणजे पाठ्यपुस्तकांची समीक्षा व तुलनात्मक विश्लेषण करणे होय.

**पाठ्यपुस्तकांची समीक्षा व तुलनात्मक विश्लेषण :**

पाठ्यपुस्तक हे मातृभाषेच्या अध्ययन-अध्यापनाचे प्रभावी साधन आहे "मुद्रित स्वरूपातील शिक्षक" म्हणूनच पाठ्यपुस्ताकचे वर्णन प्रामुख्याने केले जाते. पाठ्यपुस्तके ही अभ्यासक्रमाचा मूळ आधार असते. समग्र शिक्षण प्रक्रिया विद्यार्थी केंद्रित असल्याने पाठ्यपुस्तकाची रचना करतांना बालक हाच केंद्रस्थानी मानला जातो. आदर्श पाठ्यपुस्तकाचे अंतरंग आणि बहिरंग यासंबंधीच्या निकषाच्या आधारे दर्जेदार पाठ्यपुस्तके निर्माण केली जातात. बहिरंगातून आनंदप्राप्ती आणि अंतरंगातून ज्ञानप्राप्ती मिळविणे पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीचे ध्येय असते. पाठ्यपुस्तकाच्या अंतरंग व बहिरंगाच्या वैशिष्ट्याच्या आधारे पाठ्यपुस्तकाची समीक्षा व तुलनात्मक विश्लेषण करता येईल.

**पाठ्यपुस्तकाचे बहिरंग -**

**1) पाठ्यपुस्तकाचा आकार -**

पाठ्यपुस्तकाचा आकार, लांबी-रुंदी, जाडी ही पुस्तक हाताळण्याच्या दृष्टिने सोयीची असावी. आकाराकडे पाहाताच ते विद्यार्थ्यांना आकर्षक वाटावयास हवे. पाठ्यपुस्तकाचा आकार प्रथमता विद्यार्थ्यांना पुस्तकाकडे आकर्षित करतो.

**2) पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ -**

मुखपृष्ठ व मलपृष्ठ साधे, मनोवेधक, रंगीत असावे. मुखपृष्ठावर पुस्तकाचे नाव, चित्र वा आकृती असावी. ज्यावरून पुस्तक कशाचे आहे ते पटकन ओळखता येईल. चित्र आकृती त्या-त्या वर्गानुरूप असावी. अर्थातच पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ आकर्षक असावे.

**3) पाठ्यपुस्काचा कागद** –

पाठ्यपुस्तकाचा कागद पांढरा शुभ्र, जाड, गुळगुळीत, शाई न फुटणारा तसेच बरेच दिवस टिकणारा असावा आणि पांढराशुभ्र असावा. याचा लाभ पाठ्य मजकूर वाचणे सोपे व सोयीचे जाते. विद्यार्थ्याच्या डोळयांना त्रास होत नाही.

**4) पुस्काचा टाईप आणि सुबक छपाई** –

अक्षरांचा टाईप त्या- त्या वयोगटातील विद्यार्थ्यांनुसार लहान-मोठा असावा. अक्षरांचा आकार, पुस्तकातील पानांची संख्या, ओळींची संख्या, प्रत्येक ओळीमधील अंतर, दोन शब्दातील अंतर, पानाच्या चारही बाजूस सोडावयाचा समास, मागच्या पानावरील छापलेल्या मजकुराचे ठसे पुढील पानावर दिसणार नाहीत या सर्व गोष्टींची खबरदारी पुस्तकाची छपाई करतांना घेतली पाहिजे.

**5) पाठ्यपुस्तकाची बांधणी** –

पाठ्यपुस्तकाची बांधणी मजबूत व टिकाऊ असायला हवी. पक्क्या दोऱ्याने पुस्तक शिवले तर ते अधिक दिवसपर्यंत हाताळता येते. पुस्तकाच्या बांधणीवर पुस्तकाचे आयुष्य अवलंबून असते. बांधणी करतांना आतील अक्षरे शिवतांना दबली जाणार नाहीत याची काळजी घ्यायला हवी.

**6) पाठ्यपुस्तकाच्या पानांचा सुवास** –

पाठ्यपुस्तक उघडताच त्यांच्या पानांचा सुरेख वास आल्यास विद्यार्थ्यांचे मन प्रसन्न होवून ते पुस्तक उघडून पहाण्याची इच्छा त्यांच्या मनात निर्माण होते. प्रसन्न मनाचा प्रभाव विषयाकडे आकर्षित होण्याकरिता होतो.

**7) पाठ्यपुस्तकाची किंमत** –

पाठ्यपुस्तकाची किंमत ही सर्व विद्यार्थ्यांना परवडेल अशी असावी. पाठ्यपुस्तक हे प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ असणे आवश्यक असल्याने ते श्रीमंत, गरीब सर्व विद्यार्थ्यांना परवडणारे असावे.शिक्षनाचे सार्वत्रीकरण करण्यात याची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

एकंदरीत पाठ्यपुस्तकाचे बहिरंग आकर्षक असले तरच अंतरंगात काय असेल हे जाणण्याची उत्सुकता विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होते.

**पाठ्यपुस्तकाचे अंतरंग -**

पाठ्यपुस्तकाचा दर्जा हा त्याच्या बहिरंगापेक्षा अंतरंगावरच अवलंबून असतो. म्हणून अंतरंगाच्या निकषाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

**1) अभ्यासक्रम डोळ्यासमोर ठेवून तयार केलेला आराखडा** –

पाठ्यपुस्तक लेखनाचे सर्वात अवघड काम म्हणजे अभ्यासक्रमाच्या तत्त्वनुसार केलेली पाठाची रचना होय. अभ्यासक्रमाची व्याप्ती लक्षात घेऊन कोणत्या भागावर किती लिहायचे याचे तारतम्य पाठ्यपेुस्तक तयार करणा-यांनी ठेवले पाहिजे. यासाठी सर्वात प्रथम पाठ्यपुस्तकाचा आराखडा तयार करावा. अभ्यासक्रम हा पाठ्यपुस्तक निर्मितीचा आरसा असतो. त्यात पाठांची संख्या, त्या पाठांचा क्रम, पृष्ठसंख्या, पाठात येणाऱ्या

आकृत्या, चित्रे व तपशील याचा विचार व्हावा. आराखडा लवचिक पण विचारपूर्वक तयार केलेला असावा. अर्थातच आराखडा सर्वसमावेशक असावा.

**2) वेच्यांची निवड** –

मुलांची वाङ्यीन आवडनिवड लक्षात घेऊन पाठांची योजना चोखंदळपणे करावयास हवी. वेच्यामध्यून द्यावयाच्या बिनचूक विषयज्ञानाची निश्चित माहिती करून दीली पाहिजे. निवडलेले पाठ हे मनोरंजक, उद्बोधक व संस्कारक्षम असायला हवेत. पाठ्यपुस्तकातील मजकूर विद्यार्थ्यांच्या वय, क्षमता, रुचीनुसार असायला हवा. पाठातून वाङमयीन मूल्ये, जीवनविषयक मूल्यांचा विचार व्हावा. विद्यार्थ्यांच्या आकलन शक्तीचाही विचार करणे अत्यावश्यक ठरते. एकंदरीत संपादनाची सम्यक दृष्टी असल्याशिवाय दर्जेदार पाठ्यपुस्तक निर्माण करता येणार नाही.

**3) पाठ्यपुस्तकातील पाठांची मांडणी** –

विद्यार्थ्यांचे लक्ष मजकूराकडे केंद्रित करण्याकरिता पाठ्यपुस्तकातील मजकूराची मांडणी तर्कशुद्ध व आकर्षक असणे महत्त्वाचे आहे. मजकूर परिच्छेदातून प्रभावी व आकर्षकरित्या मांडला गेला पाहिजे. एका मुद्द्यातून दुसरा मुद्दा सहजपणे मांडत मांडत वैचारिक पातळी उत्तरोत्तर वाढविता आली पाहिजे. मुद्द्यातील विचार स्पष्टपणे सुयोग्य भाषेत मांडले गेलेले असले पाहिजेत. पाठाची मांडणी करतांना कालानुक्रम पाळला गेला पाहिजे. मूल्यामापनाच्या दृष्टिने घटकानुसार मांडणीचे तंत्र मातृभाषेच्या पाठ्यपुस्तकातही सांभाळायला हवे.

**4) पाठ्यपुस्तकातील वेच्यांची भाषा** –

पाठ्यपुस्तकातील वेच्यांची भाषा विद्यार्थ्यांच्या वयानुसार असावी. लहान वयातील विद्यार्थ्यांसाठी सोपी व साधी भाषा व वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी थोडी वाङमयीन गुणांनीयुक्त अशी भाषा वापरावयास हवी.. भाषेतील रुक्षपणा टाळून ती रंजक असावी. इयत्तावार श्रेणीबद्ध शब्दसंपत्तीचा विचार पाठ्यपुस्तकातील भाषेच्या बाबतील करणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांची ग्रहण व आकलनशक्ती आणि वय विचारात घेऊन भाषा वापरली जावी. प्रमाणित भाषा वापरणे आवश्यक असते. व्याकरण शुद्धता असावी.

**5) पाठ्यपुस्तकातील चित्रे आकृत्या** –

"one picture is worth a thousend words" अर्थात एका चित्रातून हजार शब्दाचा आशय व्यक्त करत येतो. चित्रंभाषा ही भाषेच्या आधी समजते. चित्रात योग्य तऱ्हेने आशय मांडण्याचा प्रयत्न केला तरच आशय विद्यार्थ्यांना सहज समजू शकतो. पाठ्यपुस्तकातील चित्रे काढतांना पाठातील संपूर्ण मजकूर चित्रकाराला माहित असायला हवा. चित्रे ही पाठ्यपुस्ताकाची शोभा व विद्यार्थाची आकलन क्षमता वाढविते. अभिव्यक्तीचे साधन म्हणूनही चित्रे उपयुक्त आहे..

**6) पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय, रसास्वाद** –

पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनाचे महत्त्वाचे कार्य साधक असल्याने त्यातील स्वाध्यायाचे स्वरूप कसे असावे ह्याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. विद्यार्थ्याचे अध्ययन सुकर व्हावे म्हणून त्यातील स्वाध्याय व प्रश्न मानसशास्त्रीय बैठकीवार आधारित असावे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या दृष्टिनेही स्वाध्यायचे महत्त्व कदापि विसरता येणार नाही. स्वाध्यायातून विद्यार्थ्याच्या क्रियाशीलतेला वाव मिळाला पाहिजे. स्वाध्यायातील प्रश्नात भाषाभ्यासही समाविष्ट असावा. स्वाध्यायाच्या खाली तळटिपा व संदर्भ देखील असावेत ज्यामुळे शिक्षकाला देखील विषय समजावून देणे सोपे जाईल. स्वाध्यायातून विद्यार्थ्यांचे ज्ञान,

आकलन, उपयोजन, कौशल्य इत्यादिचेही मापन व्हावे. विद्यार्थ्यांना पूरक वाचानाद्वारे इतर माहिती मिळविण्याची जिज्ञासा त्यातून वाटावयास हवी. त्यातील प्रश्न तिन्ही प्रकारातील म्हणजे लघुत्तरी, वस्तुनिष्ठ आणि निबंधवजा असावेत. विद्यार्थ्याच्या कृती, क्षमता, छंद, कल्पना, नव निर्मिती इ. च्या वाढीस पोषक ठरतील असे स्वाध्याय पाठ्यपुस्तकात द्यावे.

**7) पाठ्यपुस्तकातील मानसशास्त्रीय दृष्टिकोण** –

आजची शिक्षण पद्धती मानसशास्त्रीय तत्वावर अधिष्टीत आहे. ज्या मुलांना शिकवायचे त्यांचा विचार आधी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा वयोगट, पूर्वज्ञान, शब्दसंग्रह, संस्कार इ. चा विचार करून पाठाची नियोजन केले पाहिजे. पाठ्यपुस्ताकतील पाठ वाचून मुलांना सतत विचार प्रवृत केले पाहिजे. पाठ्यपुस्तके मुलांनी आवडीने वाचवीत असे पाठ्यपुस्तकातील लेख, कविता, स्फुटलेखन, वैचारिक लेख असावयास हवे.

एकंदरीत कोणत्याही आदर्श पाठ्यपुस्तकाचे परीक्षण करतांना खालील गोष्टी लक्षात घ्यायला पाहिजे.

1) लेखकांची पात्रता 2) विषय प्रतिपादन 3) अभ्यासक्रमानुसार केलेला आराखडा 4) मजकूराचा विस्तार 5) निर्दोषता 6) वाचनीयता. एकंदरीत बहिरंग व अंतरंगाचा समग्र विचार करता पाठ्यपुस्तक हाताळतांना विद्यार्थ्यांना आनंदप्राप्ती उपभोगता आली पाहिजे.

## मराठीच्या प्रचलित पाठ्यपुस्तकाचे आदर्श पाठ्यपुस्तकांच्या निकषानुसार परीक्षण

## कुमारभारती - इयत्ता 10 वी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी मराठी प्रथम भाषा यासाठी 08 वीच्या स्तरावर बालभारती या पाठ्यपुस्तकाची निर्मिती करण्यात आली. या पाठ्यपुस्तकाचे सखोल वाचन केल्यानंतर आदर्श पाठ्यपुस्तकाच्या निकषानुसार खालील बाबी क्रमवार लक्षात घेण्यासारख्या आढळून आल्यात.

**बहिरंग -**

**1) पाठ्यपुस्तकाचा आकार** –

बालभारती या पाठ्यपुस्तकाचा आकार, लांबी, रुंदी, जाडी पुस्तक हाताळण्याच्या दृष्टिने सोयीची आहे. आकाराकडे पाहाताच ते आकर्षक वाटते.

**2) पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ** –

पाठ्यपुस्तकाच्या मुखपृष्ठावर लहान बालके पुस्तकाचे अवलोकन करतांना दिसत आहे. अभ्यासात रुची वाढविणारे मुखपृष्ठ आहे. बालभारती या पाठ्यपुस्तकावर लहान बालकांचे चित्र आकर्षक व लक्षवेधक आहे. लहान बालकाचे अध्ययनरत चित्र पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगाची चिकित्सा वाढविणारी आहे.

**3) पाठ्यपुस्तकाचा कागद** –

पाठ्यपुस्तकाचा कागद पांढरा शुभ्र आहे. पाठ्यपुस्तक सतत हाताळावे लागत असल्याने कागद मजबूत व टिकाऊ आहे.. 08 वीची मुलें लहान असल्याने पाठ्यपुस्तक हाताळाण्यास योग्य आहे. त्यामुळेच कदाचित पाठ्यपुस्तकाचा कागद उच्च प्रतीचा वापरला आहे.

**4) पुस्तकाचा टाईप आणि सुबक छपाई –**

अक्षराचा टाईप विद्यार्थ्याच्या वयानुसारच आहे. पुस्तकातील पानांची संख्या अक्षरांचा आकार, ओळींची संख्या, प्रत्येक ओळीतील अंतर, दोन शब्दातील अंतर, पानाच्या चारही बाजूस सोडावयाचा समास, यादृष्टिने पाठ्यपुस्तक योग्य आहे. पुस्तकात आशययुक्त रंगीत चित्र रेखाटली आहे.

**5) पाठ्यपुस्तकाची बांधणी –**

पाठ्यपुस्तकाची बांधणी मात्र मजबूत व टिकाऊ आहे. पुस्तकाकरिता वापरलेला कागद उच्च प्रतीचा आहे.

**6) पाठ्यपुस्तकाची किंमत –**

सर्व स्तरातील विद्यार्थ्याना पाठ्यपुस्तक उपलब्ध व्हावे सर्व शिक्षा अभियानांतर्गत विनामूल्य वितरणास उपलब्ध केलेले आहे. पाठ्यपुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याजवळ असणे अनिवार्य आहे.

तात्पर्य, इयत्ता 8 वी करिता निर्धारित 'बालभारती' या पाठ्यपुस्तकाच्या बहिरंगाचा विचार करता बहिरंग निश्चितच आकर्षक आहे. अंतरंगात शिरल्यानंतर प्रथमच लक्ष वेधून घेते ती भारतीय संविधानाची उद्देशिका. उद्देशिकेतून भारतीय जनतेच्या आशा –आकांक्षा प्रतिबिंबित होते. नंतरच्या पृष्ठावर प्रतिज्ञा मुद्रित केली आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांची प्रस्तावना दिलेली आहे. शिक्षक व पालकाकरिता भाषेची सर्वसामान्य उद्दिष्ट्ये दिलेली आहे. गद्य व पद्य विभागात वर्गीकृत केलेली अनुक्रमणिका दिलेली आहे. तर महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे –

**1) अभ्यासक्रम डोळ्यासमोर ठेवून तयार केलेला आराखडा –**

पाठ्यपुस्तक तयार करतांना पाठांची संख्या, पाठांचा क्रम, पृष्टसंख्या, इ. चा आराखडा नियोजनपूर्वक केल्या गेला आहे. भाषेतील विविध विचारप्रकार याचा परिचय विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी गद्य व पद्य साहित्याचा अंतर्भाव प्रचलित पाठ्यपुस्तकात केला आहे.

**2) वेच्यांची निवड –**

मराठी साहित्याचा विविधांगी व प्रातिनिधिक स्वरूपात परिचय करणे, विद्यार्थ्यांमध्ये वाङमयीन अभिरूची निर्माण करणे, विद्यार्थ्यांचे भावविश्व संपन्न करणे, विद्यार्थ्यात निकोप जीवनदृष्टी विकसित करणे, सामाजिक जाणीव विकसित करणे, आपली मातृभाषा समाज व राष्ट्र यांच्या विषयी अभिमान वृद्धिंगत करणे, नैतिक संस्कार करणे अशा सर्वंकषदृष्टिने इयत्ता 8 वी करिता पाठ्यपुस्तकातील गद्य- पद्याची निवड करण्यात आली आहे.

**3) पाठ्यपुस्तकातील पाठांची मांडणी –**

पाठ्यपुस्तकातील पाठांची मांडणी करतांना कालानुक्रम पाळला आहे. वैचारिक निबंध, आत्मचरित्र रूपककथा, व्यक्तिचित्रे, विचारधन, दलितकथा, ललितलेख, लघुकथा, विचारधन असा कालानुक्रम पाळला आहे. काव्याच्या संदर्भात देखील संत तुकाराम, जनाबाई यांची संतवाणी, महात्मा फुलेचे अखंड काव्य, राष्ट्रभक्ती, निसर्गकाव्यापासून इंदिरा संत यांच्या पंचारती पर्यन्त कवितांचा योग्य क्रम सांभाळला गेला आहे.

**4) पाठ्यपुस्तकातील वेच्यांची भाषा -**

पाठ्यपुस्ताकतील पाठ्यांशाची भाषा विद्यार्थ्यांच्या वयानुसार आहे. भाषा सहज, सोपी व प्रभावी आहे. पाठातील आशय जीवनाशी संबंधित मांडल्यास आकलनास सोपा जाईल. काही कवितांना योग्य चाली

लावून रसास्वाद निर्माण करता येईल. शिक्षकाने पाठ वा कवितेचे अध्यापन करतांना स्वत: त्याचा संदर्भ अभ्यासला तर विद्यार्थ्यांपर्यंत आशय पोहोचविण्यास तो सक्षम होईल.

**5) पाठ्यपुस्तकातील चित्रे व आकृत्या –**

पाठ्यपुस्तकातील चित्रे व आकृत्या समाविष्ट आहे. आशयगर्भित चित्रे दिलेली आहे. वाङमयीन जाणीव निर्माण होण्यासाठी कोणत्या अनुभावातून ती कलाकृती सादर केली याचे दर्पणातून वाङमयीन अभिरूची व अभिवृती वाढण्यास मदतच होईल.

**6) पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय, व्याकरण, रसास्वाद –**

विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या दृष्टिने स्वाध्याय प्रश्न प्रत्येक पाठाच्या शेवटी दिलेले आहेत. तसेच स्वाध्याय प्रश्नाशिवाय कृतीशिलतेला वाव मिळावा म्हणून उपक्रमावरही भर दिला आहे. व्याकरणाचा अभ्यासही सोबत –सोबत केलेला आहे. भाषा व्याकरणशुद्ध असावी हाही नियम पाळलेला आहे. विविध काव्य व साहित्य प्रकारातून विद्यार्थ्यांची रसास्वाद क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न केला आहे.

तात्पर्य, बहिरंग व  अंतरंगाच्या दृष्टिकोणातून सर्वांगाने विचार करता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी मराठी प्रथम भाषा यासाठी 08 वीच्या स्तरावर बालभारती या पाठ्य पुस्तकाची उत्कृष्ट निर्मिती केली आहे. पाठ्य पुस्तकांच्या शेवटी शब्दार्थ दिलेले असल्याने शब्दाचा अर्थ स्पष्ट होण्यास निश्चित मदत होईल.

खाली पाठ्यपुस्तकातील गद्य विभाग व पद्य विभागातून गाभाभूत घटकांनुसार वर्गीकरण कसे केले आहे ते स्पष्ट केलेले आहे –

**अभ्यासक्रम (इयत्ता 8 वी - बालभारती)**

गद्य विभागाचा अभ्यासाच्या दृष्टिने पाठय पुस्तकातील 16 गद्य पाठांचा अभ्यास, त्याचे साहित्यानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे करावयाचे आहे.

**1) गद्य विभाग -**

निलू , वाहिनीची वेल, संगणकाचा महिमा, खेळ गावाकडचे, अंदमान राष्ट्रीय तीर्थस्थान, नाण्यांचा इतिहास.

**2) कथा –**

घड्याळाचे गुलाम

**3) व्यक्तिचित्रे –**

वेळेचे गणित, मोठ्या दिलाचा राजा-राजश्री शाहू महाराज, साध्य आणि साधने, तारुण्यातील तीन ‘त’ कार.

**4) आत्मवृत्त**

माझी शाळा, माझा माझ्याशी संवाद, मी वक्ता कसा झालो, दुसऱ्या संधीचे सोने, सप्तसुरांचे जीवनगाणे.

**5) प्रवासवर्णन**

रशियातील भ्रमंती

**6) पद्य विभाग**

संतवाणी, निसर्गकाव्य, पंचारती.

याप्रमाणे पाठ्यपुस्तकाच्या निकषानुसार इयत्ता 8 वी करीताच्या बालभारती या पाठ्यपुस्तकाची रचना केली आहे.

### 5.2.4 अभ्यासपुरक कार्यक्रम

'शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकास' हे ध्येय सर्वमान्य झाल्यानंतर विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेच्या दृष्टीने तयार करणे एवढेच शिक्षणाचे उद्दिष्ट नसून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या उपजत क्षमतांचा विकास करणे अभिप्रेत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अभ्यासपूरक कार्यक्रमांचा आधार सहायक ठरतो. व्यक्तिमत्त्वाची योग्य जडणघडण बोधात्मक, भावात्मक व क्रियात्मक पातळीवरही करण्यासाठी अभ्यासपूरक कार्यक्रमाची जोड दिली जाणे आवश्यक ठरते. या कार्यक्रमांना अभ्यासेतर वा अभ्यासानुवर्ती कार्यक्रम असे न म्हणता अभ्यासपूरक कार्यक्रम असे म्हणतात.

अभ्यासपूरक कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये म्हणजे विविधता व नावीन्य होय. दैनंदिन अध्यापनातील रुक्षपणा कमी करून चैतन्यपूर्ण वातावरण निर्मितीकरिता अभ्यासपूरक कार्यक्रम उपयुक्त ठरतात. विद्यार्थ्यांच्या क्रियाशीलतेला वाव देवून विद्यार्थ्याचा सक्रीय सहभाग वाढविता येते. कारण शिक्षणात विद्यार्थी कृतीशील असणे आवश्यक आहे. या दृष्टिणे अभ्यासपूरक कार्यक्रमाचे आयोजन करणे महत्त्वाचे व उपयुक्त आहे.

मराठी भाषेच्या अध्यापनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खालील अभ्यासपूरक कार्यक्रम आयोजित करता येईल.

**1) अवांतर वाचन –**

विद्यार्थ्यात वाङमयाविषयी अभिरूची वाढविण्यास अवांतर वाचन करणे आवश्यक आहे. पाठ्यांशाचे अर्थपूर्ण आकलन होण्यास अवांतर वाचन उपयुक्त आहे. अभ्यासक्रमाच्या दृष्टीने योग्य पूरक पुस्तकांचे वाचन विद्यार्थ्यांना करण्यास प्रोत्साहित करावे. विद्यार्थ्यांना आपली मते प्रगल्भ व व्यापक करून योग्य प्रकारे मांडता येतील. अवांतर वाचनामुळे ज्ञानप्राप्तीचा आवाका वाढविता येतो. वर्तमानपत्रे, मासिके, पाक्षिके, विशेषांक इत्यादीतील लेख पाठ्यपुस्तकातील पाठ्यांशासी संबंधित असल्यास त्याचे पूरकवाचन सहाय्यभूत ठरते.

**2) चर्चा –**

विद्यार्थ्यांना पूरक वाचानाकरिता जे पुस्तक वाचावयास दीले त्यावर चर्चाही घडवून आणता येते. चर्चेत विद्यार्थी आपली मते मुक्तपणे अभिव्यक्त करू शकतात. चर्चेसाठी शिक्षकाने पुढाकार घ्यावा. चर्चेत शिक्षकही सहभागी होवू शकतात. शिक्षकाने चर्चेचे सुयोग्य नियोजन करावे. सर्व विद्यार्थ्यांच्या सहभागाने चर्चा यशस्वी करता येते. संकुचित वृत्तीचे विद्यार्थी चर्चेत सहभागी होऊ शकतात.

**3) भाषण, वक्तृत्वस्पर्धा, कथाकथन, वादविवाद इत्यादी –**

आपले विचार इतरांसमोर व्यवस्थितपणे मांडण्यासाठी विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास विकसित करावा लागतो. प्रमुख पाहुण्यांचा परिचय, कार्यक्रमाचे संचालन, आभारप्रदर्शन इ. कार्यक्रम विद्यार्थ्याकडे सोपवावेत. त्यानंतर विद्यार्थ्यांना कथाकथन, अनुभव कथन, प्रसंगवर्णन इ. सांगावयास संधी द्यावी. संभाषण

चातुर्य असणाऱ्या विद्यार्थ्यासाठी वक्तृत्वस्पर्धा, समयस्फूर्त भाषणस्पर्धा, वादविवाद स्पर्धा इ. कार्यक्रम आयोजित करावेत. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून सहभागी होण्यास प्रोत्साहित करावे.

**4) काव्य गायन** –

संगीत शिक्षकाच्या मदतिने कवितांना योग्य चाली लावून गायन केल्यास विद्यार्थ्यात रसग्रहण क्षमता वाढते. काही कवितांच्या ध्वनीमुद्रिका उपलब्ध असतात. उपलब्ध ध्वनिमुद्रिका विद्यार्थ्यांना ऐकवाव्यात. आकाशवाणीवरील काव्य गायनाच्या कार्यक्रमाचे नियोजन वेळापत्रकात करावे. कवीसंमेलन, काव्यदर्शन कार्यक्रमांला उपस्थित रहाण्यास विद्यार्थ्यांना प्रेरित करावे. विद्यार्थ्यांच्या स्वरचित कवितांचे कविसंमेलन आयोजित करता येईल.

**5) नाटयवाचन** –

मराठी पाठ्यपुस्तकात नाटक हा अभ्यासक्रमाचा अभिन्न अंग आहे. विद्यार्थ्यात वाङमयीन अभिरुची विकसित करण्यासाठी नाट्य वाचन व नाट्य अभिनय उपयुक्त ठरते. नाटकातील आशययुक्त उतारा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी नेमलेला असतो. वाङ्मयीन दृष्टिकोणातून नाटक या साहित्यप्रकाराची ओळख व्हावी म्हणून पाठ्यपुस्तकातील नाट्य उताराची निवड केलेली असते. नाटयप्रवेश ज्या नाटकातून घेतला आहे त्याचेही वाचन विद्यार्थ्याकडून करवून घेता येते. त्यातील प्रसंगचे प्रत्यक्ष सादरीकरण करवून घेता येईल. अर्थातच विद्यार्थ्यामध्ये नाट्याभिरूचीचा विकास घडवून आणता येईल.

**6) हस्तलिखिते** –

विद्यार्थ्यामध्यें कल्पनाशक्ती, सृजनशीलता निर्माण करण्याचे एक यशस्वी व प्रभावी साधन म्हणजे हस्तलिखिते होय. दैनिक, साप्ताहिक, मासिक, वार्षिक हस्तलिखित काढून विद्यार्थ्यात सर्जनशीलता विकसित करता येते. वर्गपरत्वे व विषयपरत्वे हस्तलिखित प्रकाशित करणे नवोपक्रम ठरेल. हस्तलिखिताकरिता स्वरचना निर्माण करून जास्तीत जास्त विद्यार्थ्याचा सहभाग करू शकतो. घटना, व्यक्ती, विषय क्षेत्र, प्रसंगांवर आधारित देखील हस्तलिखित काढता येईल. उदा. स्वातंत्र्य विशेषांक, पर्यावरण विशेषांक, मानवी हक्क विशेषांक, साहित्यिक परिचय.

**7) स्पर्धा** –

विविध स्पर्धा प्रकाराचा उपयोग करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक, भावात्मक, क्रियात्मक विकासाला मदत करता येते. स्पर्धातून विद्यार्थ्यांना कार्यप्रेरणा मिळते. विविध स्पर्धातून विद्यार्थ्यात विजीगिशु वृत्ती विकसित करता येते. त्यांच्यात भाषिक कौशल्याचा विकास घडवून आणता येतो. उदा. हस्ताक्षर, शब्दकोडे, शुद्धलेखन, निबंध, वाचन, कथाकथन, वक्तृत्व इ.

**8) इतर उपक्रम** –

विद्यार्थ्याकडून पाठांतर करवून घेणे, साहित्यिकांच्या जयत्या-पुण्यातिथ्या साजऱ्या करणे, साहित्याचे प्रदर्शन भरविणे, साहित्यिकांची भाषणे ठेवणे, भाषादिवस आयोजित करणे, भाषा खेळ आयोजित करणे, उपक्रमाचे आयोजन विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासात पोषक व महत्त्वपूर्ण ठरते. मराठी भाषेची निर्धारित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अभ्यासपूरक कार्यक्रमाची निवड, नियोजन, आयोजन करण्याची मुख्य जबाबदारी मराठी भाषा शिक्षकाची आहे. अभ्यासपूरक कार्यक्रम अभ्यासक्रमाइतकेच महत्त्वाचे आहे.

**9) पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय, रसास्वाद –**

विद्यार्थ्यात स्वयं अध्ययन क्षमता विकसित करणे, विद्यार्थ्यात पूरक वाचनाची सवय वृद्धींगत करणे, वाङमयीन अभिरुची व अभिवृत्ती विकसित करणे, साहित्य व साहित्तीकाची ओळख समजून घेणे, रसग्रहण क्षमता विकसित करणे इ.उद्दिष्टाची पूर्तता करण्याकरिता विविध उपक्रम, अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचे आयोजन करून विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास घडवून आणता येईल.

### 5.2.5 मराठीत प्रसार माध्यमाची भूमिका

भारत बहुभाषिक राष्ट्र असल्याने प्रत्येक राज्याची स्वतंत्र भाषा आहे. महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून मराठीचा स्वीकार केला आहे. प्राथमिक स्तरापासून उच्च शिक्षणापर्यंत मराठीतून शिक्षण देण्याची सोय महाराष्ट्र शासनाने केली आहे. त्रिभाषा सूत्रानुसार आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून इंग्रजी, राष्ट्रीय भाषा म्हणून हिंदी व प्रादेशिक भाषा म्हणून महाराष्ट्रात मराठी भाषेचा स्वीकार केला आहे. मातृभाषा आणि शिक्षण यांचा अतिशय जवळचा संबध आहे. सर्वांगीण विकासाच्या मुळाशी मातृभाषा असते. शिक्षणाचे सर्वोत्कृष्ठ माध्यम मातृभाषा होय. शालेय अभ्यासक्रमात मातृभाषा मराठीला महत्त्वाचे व मानाचे स्थान आहे. आत्मप्रगटीकरण, व्यावहारिक विकास, वैचारिक विकास, सामाजिक विकास, सांस्कृतिक विकास, भावनिक विकास, व्यक्तित्व विकास, शैक्षणिक विकास इ. च्या दृष्टीने मातृभाषा शिक्षण महत्त्वपूर्ण आहे.

आजच्या गतिमान युगात शिक्षण क्षेत्रात प्रचंड क्रांती होऊन ज्ञानाच्या कक्षा वृद्धींगत होत आहे. ज्ञानदानाचे कार्य गतिमान, अर्थबोधक, प्रभावी होणे अपरिहार्य आहे. “one picture is worth a thousend words” अर्थात एका चित्रातून हजार शब्दाचा आशय व्यक्त करत येतो. दृकश्राव्य साधनाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. वृत्तपत्र, मासिके, पाक्षिके, वार्षिकांक, विशेषांक, ध्वनिमुद्रिका, रेडीओ, दूरदर्शन, मोबाईल, संगणक, सोशल मिडिया साईट्स या साधनाचाही योग्य उपयोग करून भाषा विकास घडवून आणता येतो. ‘दर्पण’ हे मराठी भाषेचे आद्य वृत्तपत्र होय. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांना मराठी भाषेचे पाणिनी म्हणतात. मराठी भाषा विकासात विविध भाषा संस्थाचाही महत्त्वपूर्ण वाट आहे.

**मराठी भाषा विकासात प्रसार माध्यमांची भूमिका :**

मराठी भाषा विकासात प्रसार माध्यमांची भूमिका खालील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**भाषा विकास :**

भाषा विकासास प्रसार माध्यमांची भूमिका अनन्यसाधारण आहे. मराठी भाषा विकासाकरिता भाषण, वाचन, श्रवण, लेखन, संभाषण इ. कौशल्याचा विकास अवलंबून असतो. भाषा प्रयोगशाळा भाषा विकासाचे महत्वाचे व प्रभावी केंद्र होय.

**अभिरुची व अभिवृत्ती विकास :**

मराठी भाषा विकासाकरिता विद्यार्थ्यांत वाङ्मयीन अभिरुची व अभिवृत्ती विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या विकासात विषय रुची व अभिवृत्ती महत्त्वपूर्ण ठरते. प्रसार माध्यमांची विविध साधने अभिरुची व अभिवृत्ती विकासाकरिता सहायभूत ठरतात.

**कौशल्य विकास :**

मराठी भाषा विकासात भाषण, वाचन, श्रवण, लेखन, संभाषण इ. कौशल्याचा विकास करणे अभिप्रेत आहे. वृत्तपत्र, मासिके, पाक्षिके, वार्षिकांक, विशेषांक, ध्वनिमुद्रिका, रेडीओ, दूरदर्शन, मोबाईल, संगणक, सोशल मिडिया साईट्स इत्यादी साधनाच्या सहायाने विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे विकसन करता येते.

**रसास्वाद :**

मराठी भाषा विकासात कविता, नाटक, कादंबरी यांच्याद्वारे रसास्वाद निर्माण करता येते. ध्वनिमुद्रिकाच्या सहायाने काव्याभिरुची विकसित करता येते. रसग्रहण क्षमता विकसित करण्याकरिता शिक्षकाने विशेष पुढाकार घ्यावा.

वृत्तपत्र, मासिके, पाक्षिके, वार्षिकांक, विशेषांक, ध्वनिमुद्रिका, रेडीओ, दूरदर्शन, मोबाईल, संगणक, सोशल मिडिया साईट्स इत्यादी माध्यमाचा प्रभावी उपयोग करता येतो. शिक्षकाच्या अध्यापन कार्याला सहायक कार्य प्रसार माध्यमाचे आहे. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणजे प्रसार माध्यम होय. या दृष्टीने प्रसार माध्यमाचे महत्त्व मोठे असून शैक्षणिक विकासात ही सर्वाधिक महत्त्व आहे.

**5.3 सारांश :**

माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील मराठी पाठ्यपुस्तकाची निर्मिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे (महाराष्ट्र राज्य) यांच्याद्वारे केली जाते. इयत्तेनुसार निर्धारित मराठी भाषेचे पाठ्यपुस्तक म्हणजे ज्ञान प्राप्तीचे महत्त्वपूर्ण साधन होय. पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाचे महत्त्व ही अनन्यसाधारण आहे. निर्धारित उद्दिष्टाची पूर्तता कितपत झाली याचे परीक्षण करणे आवश्यक आहे. अभ्यासपुरक कार्यक्रमाचे ज्ञान व आयोजन महत्त्वाचे आहे. व्यक्तिमत्व विकासात अभ्यासपूरक कार्यक्रमाचे स्थान उच्च आहे. मराठीत प्रसार माध्यमाची भूमिका महत्वाची आहे.

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

मराठी पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगाचे परीक्षणाचे निकष स्पष्ट करा ?

मराठी पाठ्यपुस्तकाच्या बहिरंगाचे परीक्षणाचे निकष स्पष्ट करा ?

आदर्श पाठ्यपुस्तकाचे निकष वर्णन करा ?

**5.4 आपल्या प्रगतीच्या पडताळणीकरिता अपेक्षित उत्तरे :**

**आपल्या प्रगतीची पडताळणी :**

**उत्तर :** मुद्दा क्र. 5.2 अभ्यासा.

## 5.5 शब्दावली :

**अभ्यासक्रम :**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे द्वारे इयत्तानिहाय केलेली पाठ्यांशाची रचना म्हणजे मराठी भाषेचा अभ्यासक्रम होय.

**पाठ्यपुस्तक :**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे द्वारे इयत्तानिहाय निर्धारित केलेले पुस्तक म्हणजे मराठी भाषेचे पाठ्यपुस्तक होय.

**पूरक पुस्तक :**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे द्वारे इयत्तानिहाय निर्धारित केलेल्या पाठ्यांशाच्या आकलनास सहायक पुस्तके म्हणजे मराठी भाषेचे पूरक पुस्तक होय.

**पाठ्यपुस्तकाची समीक्षा :**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे द्वारे इयत्तानिहाय निर्धारित केलेल्या पाठ्यपुस्तकाची पाठ्यपुस्तक निकषाच्या आधारे केलेली मुल्यांकन वा समीक्षा म्हणजे मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकाची समीक्षा होय.

**अभ्यासपूरक कार्यक्रम :**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे द्वारे इयत्तानिहाय निर्धारित केलेल्या पाठ्यपुस्तकातील आशयाच्या आकलनाकरिता विविध उपक्रम म्हणजे मराठी भाषेचे अभ्यासपूरक कार्यक्रम होय.

**प्रसार माध्यम :**

विचार, भावना, माहिती याचे आदान-प्रदान करण्याचे साधन म्हणजे प्रसार मध्यम होय.

## 5.6 कार्य वितरण :

मराठी भाषा विकासाकरिता उपयुक्त अभ्यासपूरक कार्यक्रम सुचवा ?
मराठी भाषेच्या विकासात प्रसार माध्यमाची भूमिका स्पष्ट करा ?

## 5.7 कार्य :

मराठी भाषा पाठ्यपुस्तक व पूरक पुस्तकाचे महत्त्व व वैशिष्ट्ये सांगा ?
मराठी भाषा पाठ्यपुस्तकाची समीक्षा व तुलनात्मक विश्लेषण करा ?

## 5.8 प्रकरण अभ्यास (केस स्टडी) :

माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील मराठी पाठ्यपुस्तकाचे परीक्षण करा ?

**5.9 संदर्भ पुस्तके** :


- अकोलकर, ग. वि. आणि पाटणकर, ना. वि., (1970), "मराठीचे अध्यापन", पुणे, व्हीनस प्रकाशन.
- इंदुरकर, कल्याणी, (1998), "मराठीचे अध्यापन", नागपूर, मंगेश प्रकाशन.
- करंदीकर, सुरेश आणि मंगरुळकर, मीना, (2004), "मराठी –आशय अध्यापन पद्धती", पुणे, फडके प्रकाशन.
- कुंडले, म. बा., (1974), "मराठीचे अध्यापन", पुणे, विद्या प्रकाशन.
- घोरमोडे, कला, (2008), "मराठी अध्यापन पद्धती", नागपूर, विद्या प्रकाशन.
- पवार, ना. ग., (2006) "मातृभाषा मराठीचे आशययुक्त अध्यापन", पुणे, नित्य नूतन प्रकाशन.


- **संदर्भ पुस्तक सूची** :


- अकोलकर, ग. वि. आणि पाटणकर, ना. वि., (1970), "मराठीचे अध्यापन", पुणे, व्हीनस प्रकाशन.
- इंदुरकर, कल्याणी, (1998), "मराठीचे अध्यापन", नागपूर, मंगेश प्रकाशन.
- करंदीकर, सुरेश आणि मंगरुळकर, मीना, (2004), "मराठी –आशय अध्यापन पद्धती", पुणे, फडके प्रकाशन.
- कुंडले, म. बा., (1974), "मराठीचे अध्यापन", पुणे, विद्या प्रकाशन.
- घोरमोडे, कला, (2008), "मराठी अध्यापन पद्धती", नागपूर, विद्या प्रकाशन.
- पवार, ना. ग., (2006) "मातृभाषा मराठीचे आशययुक्त अध्यापन", पुणे, नित्य नूतन प्रकाशन.
- पाईकराव, विजय कुमार आणि साळुंके, कविता, (2005), " मराठी भाषेचे आशययुक्त अध्यापन", लातूर, संस्कार प्रकाशन.
- संपादक मंडळ, (2015), "मराठी मातृभाषा पाठ्यपुस्तक (इयत्ता 8- 12 वी)," पुणे, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ.


**निवेदन-** विगत कुछ वर्षों से सेवारत शिक्षकों के लिए अध्यापक शिक्षा कार्यक्रम उथल पुथल के दौर से गुजरा है। इस संदर्भ में नयी पाठ्यचर्या को लागू करना और उसके अनुसार समय की सीमा के अन्तर्गत अध्येताओं को सामग्री उपलब्ध करवाना एक चुनौती भरा कार्य था। इस चुनौती को जिन लेखकों और संकलनकर्ताओं की मदद से सुगम किया गया, वे सब बधाई के पात्र हैं। प्रत्येक अध्ययन सामग्री में जिन मूल पुस्तकों का सहयोग लिया गया है, उनका यथासंभव संदर्भ ग्रन्थों के रूप में उल्लेख किया गया है। लेखक और संकलनकर्ता मूल ग्रन्थों के लेखकों के उद्यम और बौद्धिक सक्रियता का सम्मान करते हैं और इनके प्रति आभार ज्ञापित करते हैं। यदि यह ज्ञात होता है कि किसी मूल ग्रन्थ का नामोल्लेख रह गया है तो उसे भी हम साभार सम्मिल्लित करेंगे। पाठकों से अनुरोध है कि वे अपना फीडबैक उपलब्ध कराते रहे जिससे इस सामग्री को उत्तरोत्तर गुणवत्ता संपन्न किया जा सके।